

मासिक वार्तापत्र • अंक 26 • एप्रिल 2022 • सहयोग मूल्य - रु. 5 • 16 पाने

# कामगार बिगुल

नव्या समाजवादी क्रांतीचा उद्घोषक

पंजाब निवडणूक: योग्य पर्यायाच्या अभावी जनतेकडून 'आप' च्या छद्म पर्यायाची निवड 3

सी.यु.सी.ई.टी.: उच्च शिक्षणाला गरीबांपासून वंचित करण्याचे अजून एक पाऊल! 7

भाजपात सामील व्हा, स्वतःच्या भ्रष्टाचारी चारित्र्यावर प्रामाणिकतेचा मुलामा चढवून घ्या!! 13

## महागाईचा प्रचंड कहर!

## अजून किती 'अच्छे दिन' दाखवणार मोदी सरकार ?

संपादक मंडळ

वाढत्या महागाईने पुन्हा एकदा कामगार-कष्टकरी वर्गाचे जगणे मुश्किल केले आहे. संपूर्ण देशभरात आज महागाईचे सावट तीव्र होत आहे. इंधन, दूध, अन्नधान्य, औषधे, पाकिटबंद खाद्यपदार्थ, दैनंदिन वापराच्या वस्तू, आरोग्य-शिक्षण-वाहतूक-वीज-पाणी इत्यादी सेवा, सगळ्यांचे भाव गगनाला भिडले आहेत आणि कामगार-कष्टकऱ्यांसहित मध्यमवर्गाच्याही खिशाला त्याची तीव्र झळ बसत आहे. असंघटित क्षेत्रात काम करणारे, शेतमजूर, छोटे शेतकरी आणि एकंदरीतच कामगार-कष्टकरी जनतेसाठी या महागाईने 'दुष्काळात तेरावा महिना' अशीच परिस्थिती करून ठेवली आहे. 'अच्छे दिन आयेंगे', 'पेट्रोल, डिझेल, गॅस चे भाव कमी होतील', 'बहुत हुई महंगाई की मार, अब की बार मोदी सरकार' अशा घोषणा देत सत्तेत आलेल्या मोदी सरकारने लोकांच्या तोंडातला घास काढून घेण्याचे काम चालवले आहे. मोदी सत्तेत येण्यापूर्वी सर्व आलबेल होते व जनता सुखात नांदत होती असे तर अजिबातच नाही. उलट काँग्रेस सरकारच्या काळातील वाढती बेरोजगारी, महागाई या समस्यांना कंटाळून विकासाच्या नावावर जनतेने भाजपला मतदान केले. परंतु 'आगीतून निघून फुफाट्यात पडावे' अशी अवस्था सामान्य जनतेची झाली आहे.

खाद्यतेलाचे दर 200 रुपयांच्या जवळपास जाऊन थोडेसे कमी झाले आहेत. कोव्हिड नंतर अन्नधान्याच्या वाढलेल्या भावांच्या परिणामी पावापासून ते आट्यापर्यंत सर्वच वस्तूंचे भाव 50 टक्क्यांपर्यंत वाढले आहेत. पारले, नेस्टले, हिंदुस्थान लिव्हर सारख्या सर्व कंपन्यांनी पाकिटबंद मालाचे भाव 10 टक्क्यांवर वाढवले आहेत किंवा किमती त्याच ठेवत मालाचे प्रमाण कमी केले आहे. दूध 60 रुपयांवर गेले आहे. पेट्रोल डिझेल ने तर सर्व दरांचे उच्चांक मोडले आहेत. पाच राज्यांमधील निवडणुका संपल्यानंतर मोदी सरकारने इंधन तेलाचे दर वाढवण्यात हात अजिबात आखडता घेतलेला नाही. 26 मार्च ते 3 एप्रिल या एका आठवड्यात पेट्रोलचा दर 5 रुपयांनी वाढून 118 रुपये प्रति लिटर झाला आहे तर डिझेल सुद्धा 5 रुपयांनी वाढून 102 रुपयांवर पोहोचले आहे. पेट्रोल डिझेल वरील कराच्या माध्यमातून मोदी सरकारने 26 लाख कोटी रुपयांची कमाई गेल्या आठ वर्षात केली आहे. पेट्रोल ची खरी किंमत 40 रुपये म्हणजे एकूण रकमेच्या केवळ 36 टक्केच आहे. आपण चुकवत असलेल्या पेट्रोल डिझेल च्या किमतीपैकी 37 टक्के रक्कम केंद्र सरकारला आणि 23 टक्के रक्कम राज्य सरकारला कराच्या माध्यमातून जाते. 3-4 टक्के रक्कम डिलर चे कमिशन इत्यादी म्हणून जाते. इंधनांच्या या वाढलेल्या दराचा परिणाम इतर वस्तूंच्या किंमती वाढण्यावरही होतो कारण वाहतूक खर्च वाढतो.

### कामगार कष्टकऱ्यांवर महागाईचा मारा

असंघटित क्षेत्रात काम करणारे कोट्यवधी कामगार दिवसाला 12-12 तास काम करून सात ते आठ हजार रुपये महिन्यात स्वतःची व कुटुंबाची गुजराण करतात. त्यांचे आधीच हलाखीचे जीवन या महागाईच्या चटक्यांमुळे अधिक भीषण झाले आहे. महागाईचा प्रश्न मध्यमवर्गासाठी केवळ थोडीफार बचत कमी होण्याचा मुद्दा असतो; परंतु महागाई कोट्यवधी गरीब कामगार कष्टकऱ्यांसाठी जीवनमरणाचा प्रश्न आहे, कारण कमाईचा मोठा हिस्सा त्यांना जीवनावश्यक मालावरच खर्च करावा लागतो. त्यामुळे बचत करणे तर दूरच, रोजचा दिवस कसा सरेल ही चिंता सर्वात मोठी आहे. कपड्यांपासून तर औषधांपर्यंत आणि अन्नधान्यापासून तर तेल, साखर इत्यादी किराणा वस्तूंपर्यंत सर्वच वस्तूंच्या किमती गगनाला भिडल्या आहेत; पण या वाढलेल्या किमतींच्या प्रमाणात मजुरी मात्र वाढलेली नाही.

महागाईचा फटका मोठ्या प्रमाणावर बाहेर राहून शिक्षण घेणाऱ्या, स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना सुद्धा

पान 6 वर

## रशिया-युक्रेन युद्धात भारताची भुमिका 'दलाल' नव्हे 'स्वतंत्र' भांडवलदार वर्गाची भुमिका

अभिजित

भारतातील कम्युनिस्ट चळवळीत आज निरर्थक ठरवला जावा इतका ठळकपणे दिसून येणारा, परंतु तरीही वाद-चर्चेचा बनून राहिलेला मुद्दा म्हणजे भारतातील भांडवलदार वर्ग (आणि पर्यायाने देशातील राज्यसत्ता ) अमेरिकन भांडवलाचा 'दलाल' (काँप्रोडोर) आहे की स्वतंत्र आहे, हा. रशिया-युक्रेन युद्धातील भारताच्या भुमिकेने पुन्हा एकदा सिद्ध केले आहे की भारतातील भांडवलदार वर्गाचे चरित्र एका स्वतंत्र भांडवलदार वर्गाचे आहे आणि तो अमेरिका वा इतर कोण्या साम्राज्यवादी देशांचा 'दलाल' भांडवलदार वर्ग नाही.

### आजवरचा प्रवाद

अमेरिका आणि अमेरिकाप्रणीत जागतिक बँक, आय.एम.एफ. यांच्या दबावाखाली भारताची अर्थव्यवस्था चालते, जागतिकीकरणाचे धोरण हे भारत सरकारवर 'थोपवले' गेले आणि 'हात पिरगाळून' भारताला 'लज्जास्पद' अटी मानाव्या लागल्या, आणि इथपर्यंत की दिल्लीत काय व्हावे याचे निर्णय वॉशिंग्टन मध्ये घेतले जातात याप्रकारच्या भुमिका सतत जागतिकीकरणाचे, देशाच्या आर्थिक धोरणांचे टीकात्मक विश्लेषण करणाऱ्या उदारवाद्यांकडून, समाजवाद्यांकडून आणि कम्युनिस्टांच्याही काही गटांकडून समोर आल्या आहेत. यामागे गृहीतक हे आहे की भारतातील भांडवलदार वर्ग, आणि म्हणूनच भारतातील राज्यसत्ता, हा अमेरिकन भांडवलाचा 'दलाल' आहे. युक्रेन-रशिया युद्धातील भारताच्या भुमिकेने या समजदारीचे वाभाडे तर काढले आहेतच; परंतु हे सुद्धा समजणे गरजेचे आहे की ही करणाऱ्या अपवादात्मक घटना म्हणून नाही तर स्वातंत्र्यापासूनच देशातील भांडवलदार वर्गाने आपले स्वतंत्र धोरण पुढे नेत आपले स्वतंत्र अस्तित्व जपले आहे आणि तो कोणत्याही साम्राज्यवादी देशाचा वा गटाचा दलाल नव्हता.

### युक्रेन-रशिया युद्धात भारताची भुमिका

रशिया युक्रेन युद्धामध्ये भारताने अमेरिकेचा दबाव न मानता, तथाकथित 'तटस्थ' भुमिका अवलंबली आहे. भारताने रशियाचा निषेध करण्यास नकार दिला आहे. रशियाविरोधातील ठरावावर संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेमध्ये मतदानात भारत अनुपस्थित राहीला, इतकेच नाही तर रशियाने दिलेल्या प्रस्तावांवरही आणि रशियाला मानवाधिकार परिषदेतून काढण्याच्या प्रस्तावावरही भारताने मतदान केलेले नाही. युक्रेनच्या भारतातील राजदूतांनी मोदींवर कौतुकाच्या शब्दांचा वर्षाव करत, पुराणातले दाखले देत हस्तक्षेपाचे आवाहन केले परंतु त्याकडे मोदी सरकारने दुर्लक्ष केले. भारत सरकारने रशियासोबत आर्थिक संबंध चालू ठेवले इतकेच नाही, तर युद्ध चालू असतानाच अमेरिकेने रशियाचे तेल विकत घेणे बंद करताच भारताने रशियाकडून

पान 15 वर

# श्रीलंका: नवउदारवादाच्या आगीत होरपळतोय आणखी एक देश

पान 14 वरून

आहे आणि पर्यायी राजकीय व्यवस्थेच्या समजदारीचाही अभाव आहे. त्यामुळे या आंदोलनाचा प्रभाव तात्कालिकरित्या सत्ताबद्दल किंवा काही नवीन कायदे, किंवा अगदी नवीन भांडवली राज्यघटना बनवण्यापर्यंत पडू शकतो; आणि एका क्रांतिकारी कम्युनिस्ट पक्षाची अनुपस्थिती असल्यामुळे कोणतेही निर्णायक क्रांतिकारी परिवर्तन होणार नाही हे सुद्धा स्पष्ट आहे.

आर्थिकरित्या स्वावलंबी नसलेल्या श्रीलंकेसमोर सध्यातरी भारत, चीन, अमेरिकेसारख्या इतर भांडवली देशांकडून आर्थिक मदत, आणि त्यासोबतच लादलेल्या अटी, स्विकारूनच महागाई-मंदीच्या दलदलीतून बाहेर पडण्याचा मार्ग आहे. त्यानंतरही नव-उदारवादी धोरणे सतत अशा संकटांना जन्म देत राहतील.

## दुरुस्तीवाद व राष्ट्रवादाच्या दलदलीत रुतलेली श्रीलंकेतील डावी चळवळ

देशातील जनता इतक्या बिकट परिस्थितीतून जात असताना, स्वयंस्फूर्तपणे इतके मोठे आंदोलन करत असताना त्या देशातील कामगारवर्गीय शक्ती काय करत आहेत हा प्रश्न उत्पन्न होणे साहजिकच आहे.

श्रीलंका स्वतंत्र होण्याआधीच त्या देशात दोन डावे पक्ष - ट्रॉट्स्कीवादी असलेला लंका सम समाज पक्ष, आणि लंकेचा कम्युनिस्ट पक्ष, कार्यरत होते. परंतु श्रीलंका स्वतंत्र झाल्यानंतर काही वर्षातच हे दोन्ही पक्ष संसदवाद आणि सुधारवादाच्या दलदलीत रुतु लागले. इतर भांडवली पक्षांबरोबर युती करून सत्तेत देखील आले. ह्या दोन्ही पक्षांनी आज जनतेचा विश्वास गमावलेला आहे. सध्या चालू असलेल्या आंदोलनाचे नेतृत्व आपल्याकडे घेण्याचा प्रयत्न हे दोन्ही पक्ष करत असले तरी अद्याप त्यांना त्यात यश आलेले नाही, आणि यश आले तरी कोणत्याही क्रांतिकारी परिवर्तनाची अपेक्षाच नाही कारण हे पक्षच क्रांतिकारी नाहीत.

1970 च्या दशकातील आर्थिक संकटाच्या पार्श्वभूमीवर जनता विमुक्ती पेरुमाना (जविप) नावाचा तिसरा मार्क्सवादी-लेनिनवादी म्हणवणारा गट उदयास आला, जो राष्ट्रवादाच्या भांडवली विचाराने ग्रसित राहिला. ह्या गटाने अत्यंत झंझावाती काम केले व 1971 मध्ये एक मोठा जनउठाव श्रीलंकेत घडवून आणला. परंतु संघटनेचे कार्यकर्ते दीर्घकाळ संघर्षातून प्रशिक्षित झाले नसल्याने, तसेच सिद्धांत, कार्यदिशा व रणनीती ह्यांबद्दल पुरेशी स्पष्टता नसल्याने ते सत्तेचा ताबा घेण्यात अयशस्वी ठरले. त्यानंतर 1987 मध्ये श्रीलंकन सरकारने लिट्टेच्या विरोधात भारताशी करार करून भारतीय लष्कराची मदत घ्यायची ठरवली तेव्हा जविपने ह्या संधीचा फायदा घेऊन श्रीलंकेतील कामगार कष्टकरी जनतेत राष्ट्रवाद भडकावला. त्यानंतर 1989 पर्यंत, पुढची तीन वर्षे जविप कार्यकर्त्यांनी देशभरात कामकऱ्यांचे मोठे संप घडवून आणले. ह्या दरम्यान मोठी हिंसा देखील झाली. जविप व श्रीलंकन सैन्य दोघांनी मिळून 60,000 पेक्षा जास्त हत्या केल्या असल्याचा अंदाज आहे. ह्यानंतर जविप सिंहल अतिराष्ट्रवादी संघटना बनली, व महिंदा राजपक्षेंनी लिट्टेच्या केलेल्या खात्म्याला तिने समर्थन दिले.

आज श्रीलंकेतील वस्तुगत परिस्थिती जरी क्रांतीसाठी अनुकूल असली तरी मनोगत शक्ती ह्या अशा भरकटलेल्या असल्यामुळे आज श्रीलंकेत कामगारवर्गीय क्रांती होणे अशक्य आहे. डाव्या चळवळीचा समाहार करून पुन्हा एकदा कामगार वर्गाची एक झुंजार, प्रामाणिक, आणि आंतरराष्ट्रीयतावादी पार्टी संघटित करायला घेणे हेच आज श्रीलंकेतील सर्व प्रामाणिक कम्युनिस्टांचे प्रथम कर्तव्य आहे.

## भारतातील कामगार कष्टकऱ्यांकरीता श्रीलंकेतून महत्त्वाचे धडे

भारतातील कामगार कष्टकऱ्यांनी आपले आंतरराष्ट्रीयतावादी कर्तव्य पार पाडत श्रीलंकेतील आंदोलनरत जनतेला समर्थन दिले पाहिजे व श्रीलंकन सरकारचा निषेध केला पाहिजे. परंतु एवढेच करून थांबणे पुरेसे नाही. श्रीलंकेतील घडामोडींमधून भारतातील कामगार कष्टकऱ्यांनी देखील काही धडे घेणे आवश्यक आहे.

सर्वप्रथम म्हणजे अशा प्रकारची आर्थिक संकटे हा भांडवलशाही आणि तिचे अपत्य असलेल्या नवउदारवादाचा एक मूलभूत घटकच आहे. तेजीचे कितीही बुडबुडे आले तरी ही व्यवस्था आपल्याला चिरकाल तेजी देऊ शकणार नाही; मंदी, महागाई, बेरोजगारी मात्र कायमस्वरूपी परिघटना आता झालेल्या आहेत. दुसऱ्या शब्दात सांगायचे झाले तर अच्छे दिनांच्या आशा सोडा! अच्छे दिन आता कागदावर देखील शक्य नाहीत. दुसरे म्हणजे मंदी, बेरोजगारी, महागाई निमूटपणे सोसणे बंद करण्याची आवश्यकता आहे. श्रीलंकेतील आर्थिक संकट गेल्या दोन वर्षांपासून चालूच आहे. परंतु जनतेने त्याविरोधात व्यापक आंदोलन केले तेव्हा कुठे तो प्रश्न जागतिक पटलावर ऐरणीवर आला, व अनेक देशांनी तत्परतेने श्रीलंकेला मदत पाठवली. भारतातील भांडवली आर्थिक परिस्थिती आणि आर्थिक संरचना श्रीलंकेच्या तुलनेने बरीच मजबूत असली तरी जागतिक अर्थव्यवस्थेचे चढ-उतार अशाप्रकारच्या अतिमहागाई आणि अति-तुटवड्याची परिस्थिती भारतातही भविष्यात निर्माण करतील. अशा लढ्यांना योग्य दिशा देण्यासाठी, कामगार वर्गाचे योग्य नेतृत्व करू शकणाऱ्या कम्युनिस्ट पक्षाची बांधणी आपले मुख्य कर्तव्य ठरते.

साथींनो

'कामगार बिगुल' आपले स्वतःचे वृत्तपत्र आहे. हे वृत्तपत्र अधिक चांगले बनवण्यासाठी आपल्या सूचनांचे आम्ही स्वागत करतो. त्याच बरोबर आपण जर देशभरातील कामगारांपर्यंत आपल्या कारखान्यातील, ऑफिस मधील परिस्थिती, मालक वर्गाकडून केली जाणारी लूट, संसदीय राजकीय पक्षांचा श्रीमंत धार्जिणेपणा, पोलिस व मालकांच्या खाजगी गुंडांकडून केले जाणारे अत्याचार, तुमच्या रहिवासी वस्त्यांमधील खराब परिस्थिती, शिक्षण, आरोग्य यांसारख्या सुविधांचा अभाव इत्यादी विषयी आपली मतं पोहचवू इच्छित असाल तर आम्हाला आपले लेख किंवा प्रतिक्रिया पाठवू शकता. आपण आम्हाला खालील पत्त्यावर पत्र पाठवू शकता किंवा फोन करून सुद्धा संपर्क साधू शकता.

- रूम नंबर 209, हिरानंदानी बिल्डिंग-7-बी, लल्लुभाई कंपाऊंड, मानखुर्द (वेस्ट) मुंबई 400043 मो. - 9619039793, 9082861727
- अहमदनगर : 74992 64646
- पुणे : 8669735643

## 'कामगार बिगुल'चे स्वरूप, उद्देश आणि जबाबदाऱ्या

**1. 'कामगार बिगुल' व्यापक कष्टकरी जनतेमध्ये क्रांतिकारी राजकीय शिक्षक व प्रचारकाची भूमिका पार पाडेल. हे वृत्तपत्र कामगारांमध्ये क्रांतिकारी वैज्ञानिक विचारधारेचा प्रचार करेल आणि खऱ्याखुऱ्या सर्वहारा संस्कृतीचा वाहक बनेल. हे वृत्तपत्र जगभरातील क्रांत्यांचा इतिहास आणि त्यांच्यातून घ्यावयाचे शिक्षण, आपल्या देशातील वर्ग संघर्ष, कामगार चळवळीचा इतिहास आणि त्यातून घ्यावयाचे धडे यांच्याशी कामगार वर्गाला परिचित करेल. त्याच बरोबर समस्त भांडवली अफवा-दुष्प्रचारांचा भांडाफोड करेल.**

**2. 'कामगार बिगुल' भारतीय क्रांतीचे स्वरूप, मार्ग आणि समस्यांविषयी क्रांतिकारी कम्युनिस्टांमध्ये चालणाऱ्या विविध चर्चा नियमित रुपात छापेल आणि देश-विदेशातील राजकीय घटना आणि आर्थिक परिस्थितीचे योग्य विश्लेषण मांडून कामगार वर्गाला शिक्षित करण्याचे काम करेल.**

**3. 'कामगार बिगुल' स्वतः अशा चर्चा चालवेल जेणे करून कामगारांचे राजकीय शिक्षण होईल. तसेच त्यांच्यामध्ये योग्य राजकीय कार्यदिशेची समज विकसित होऊन ते क्रांतिकारी पार्टी बनवण्याच्या प्रक्रियेमध्ये सहभागी होऊ शकतील आणि त्यातून व्यवहारामध्ये योग्य कार्यदिशेच्या सत्यापनाचा आधार तयार होऊ शकेल.**

**4. 'कामगार बिगुल' कामगार वर्गामध्ये राजकीय प्रचार आणि शिक्षणाचे कार्य चालवत सर्वहारा क्रांतीच्या ऐतिहासिक जबाबदारीशी त्याला परिचित करेल, त्याला आर्थिक संघर्षांसोबतच त्याच्या राजकीय अधिकारांसाठी लढायला शिकवेल, चार आणे-आठ आण्याच्या किरकोळ आर्थिक लढायांमध्ये कामगारांना अडकावून टाकणाऱ्या नकली कम्युनिस्टांपासून आणि भांडवली राजकीय पक्षांचे शेपूट असलेल्या किंवा व्यक्तिवादी-अराजकतावादी ट्रेड युनियन्स पासून सावध करत त्याला हरतऱ्हेच्या अर्थवाद व सुधारवादाविरुद्ध लढायला शिकवेल, त्याच बरोबर त्यांच्यात सच्ची क्रांतिकारी चेतना निर्माण करेल. 'कामगार बिगुल' सर्वहारा वर्गाच्या फळ्यांमधून क्रांतिकारकांची भरती करण्याच्या कामात सहाय्यक बनेल.**

**5. 'कामगार बिगुल' हे वृत्तपत्र कामगार वर्गाचा क्रांतिकारी शिक्षक, प्रचारक आणि आवाहनकर्ता ह्या भूमिकांबरोबरच क्रांतिकारी संघटनकर्ता व आंदोलनकर्त्याची भूमिका सुद्धा पार पाडेल.**

### बिगुल व्हॉट्सअ‍ॅप चॅनेल

**जर तुम्ही आमच्याशी व्हाट्सअ‍ॅप वर जोडून घेऊ इच्छिता, तर या लिंक वर जाऊन आमचा व्हॉट्सअ‍ॅप चॅनेल जॉईन करावा - http://www.marathi.mazdoorbigul.net/whatsapp**

**चॅनेल जॉईन करण्यामध्ये काही समस्या असेल तर या नंबर वर आपले नाव आणि जिल्हा लिहून पाठवावा - 9892808704**



**बुर्झ्वा वृत्तपत्रे भांडवलाच्या विशाल ढिगांच्या बळावर चालतात, कामगारांची वृत्तपत्रे स्वतः कामगारांनी गोळा केलेल्या पैशावर चालतात.**

**लेनिन**


# कामगार बिगुल

खाजगी वितरणासाठी

संपादक मंडळ : निखील एकडे, बबन ठोके

संपादकीय कार्यालय : रुम नंबर 209, हीरानंदानी बिल्डिंग - 7-बी, लल्लुभाई कम्पाउण्ड, मानखुर्द (वेस्ट), मुंबई 400043

संपर्क : 8669735643 , 9619039793

ईमेल : kamgarbigul@gmail.com

सहयोग राशी : रु. 5 (एका अंकासाठी)

वार्षिक : रु. 100 (टपाल शुल्कासह)

# चुकीच्या कार्यदिशेमुळे पुन्हा एकदा एस.टी. कामगार आंदोलनाच्या पदरी पुन्हा निराशाच!

## मोर्चाला 'हल्ला' म्हणत कामगारांच्या दमनात मविआ सरकार मोदी सरकारच्या स्पर्धेत!

✎ अभिजित

उच्च न्यायालयाच्या निकालानंतर 'विलिनीकरणाच्या' न्याय्य मागणीला घेऊन चालू असलेल्या साडेपाच महिन्यांच्या प्रदीर्घ, चिवट, ऐतिहासिक एस.टी. कामगार आंदोलनाच्या पदरी पुन्हा एकदा निराशाच पडली आहे. आम्ही 'कामगार बिगुल' मध्ये या अगोदर दिलेला इशारा पुन्हा खरा ठरला आहे. सरकारी समितीचा अहवाल विरोधातच येणार आहे हा पहिला इशारा पूर्वीच खरा ठरला होता, आणि आता न्यायालयाकडून विलिनीकरण मिळणार नाही हा दुसरा इशारा सुद्धा खरा ठरला आहे आणि कामगारांच्या पदरी पुन्हा अपेक्षाभंग आला आहे. त्याचवेळी महाविकास आघाडी(मविआ) सरकारने चालवलेल्या आंदोलनाच्या दमनातून पुन्हा एकदा हे सुद्धा दिसून आले आहे की कामगारांच्या दमनात शिवसेना-राष्ट्रवादी-काँग्रेस सुद्धा भाजप किंवा 'आप' सारख्या पक्षांच्या मागे नाहीत!

प्रचंड त्याग आणि धैर्याने लढलेल्या या लढाईनंतरही पदरी पडलेल्या या अपेक्षाभंगामागे कारण आहे चुकीची कार्यदिशा, योग्य राजकीय समजदारीचा अभाव, कामगार चळवळींच्या ऐतिहासिक अवलोकनाचा अभाव, अलोकशाही प्रवृत्तींद्वारे नेतृत्व, भाजपबद्दलचे भ्रम, न्यायव्यवस्थेबद्दल आणि वकिलांबद्दल भक्तिभावापर्यंत जाणारा अतिविश्वास.

### न्यायालयांबद्दल भ्रम

भांडवली लोकशाही व्यवस्थेमध्ये न्यायव्यवस्थेचे कार्य हे कायद्याचे, म्हणजेच व्यवस्थेच्या चौकटीचे रक्षण करणे असते. विलिनीकरणासारखे धोरणात्मक निर्णय हे कार्यपालिकेचे, म्हणजे मंत्रीमंडळाचे काम आहे, ना की न्यायालयांचे. भांडवलदारांच्या सरकारने नेमलेल्या समितीचा अहवाल कामगारांच्या विरोधात आणि खाजगीकरणाच्या बाजूनेच येणार होता, आणि तो तसा आल्यानंतर न्यायालयांनी त्या विरोधात भुमिका घेण्याचा प्रश्नच नव्हता; खरे तर न्यायालयासमोर विलिनीकरण व्हावे की नाही हा मुद्दा कधी नव्हताच, परंतु या बाबीकडे कामगारांनी सतत दुर्लक्ष केले आहे आणि नेतृत्वाने फसवण्याचे काम केले आहे. आंदोलनामध्ये टिकलेली एकता आणि सरकारवर आणलेला थोडाफार दबाव याच आंदोलनाच्या जमेच्या बाजू होत्या, ना की न्यायालयासमोरचा युक्तिवाद.

आजवर न्यायालयांनी कामगारांच्या हितामध्ये निर्णय दिल्याची उदाहरणे अपवादात्मकच आहेत, आणि खाउजा धोरणांच्या गेल्या 30 वर्षांच्या इतिहासात तर अशी उदाहरणे शोधूनही सापडणे मुश्किल. ज्या काळात न्यायालये कामगार धार्जिणे निकाल देत होती, तेव्हा सुद्धा ते निकाल कामगार चळवळीने निर्माण केलेल्या प्रचंड जनरेट्याच्या दबावाखालीलच दिले गेले होते. यासंदर्भातील सविस्तर तथ्यांसहीत आम्ही या अगोदरही मांडणी केली होती. एस.टी. कामगार आंदोलनाचे नेतृत्व करणाऱ्या भांडवली युनियन्सनी पळ काढल्यानंतर नेतृव करणाऱ्या वकिल सदावर्ते यांनी मात्र निष्क्रियतेची कार्यदिशा लागू करत, "संपा"ला दुखवटा म्हणत कामगारांच्या हातातील महत्वाचे हत्यार काढून घेत, न्यायालयांच्या भरवशावर कामगारांना बसवून ठेवत, पावला-पावलाने निम्मे कामगार मागे परतले असतानाही भावनिक आवाहने करत व खोटी आशा दाखवत आंदोलनाला कमजोर स्थितीत नेत, अप्रत्यक्षपणे भाजपचे समर्थन करत, चळवळीला पंगू करण्याचे काम केले.

### चुकीच्या नेतृत्वाची परंपरा चालूच

कामगारांनी आजवर ज्या युनियन्सकडे आशेने पाहिले, त्यापैकी एकही युनियन खऱ्या अर्थाने कामगार वर्गीय जाणीवा वाढवणारी, योग्य कामगार वर्गीय कार्यदिशा लागू करणारी नव्हती आणि या ना त्या भांडवली पक्षाच्या दावणीला बांधलेली होती. अशा युनियन्सचे वर्गचरित्र, नेतृत्वाची राजकीय आणि वैचारिक बांधिलकी न समजता, बाजारी अर्थव्यवस्थेच्या नफ्या-तोट्याच्या तर्काला बळी पडून आणि भांडवलधार्जिण्या मागण्या पुढे करून, खाजगीकरणाच्या विरोधात कोणताही निर्णायक लढा न उभारून कामगारांनी नेहमीच नेतृत्वावर अंधविश्वास ठेवला आणि वेळोवेळी धोकेबाजीलाच समोर जावे लागले. सदावर्तेंच्या बाबतीतही हाच भक्तिभाव कामगारांना महाग पडला. भाजपधार्जिण्या भुमिका घेणाऱ्या परंतु स्वत:ची अराजकीय प्रतिमा बनवू पाहणाऱ्या, जय श्रीराम, एक मराठा लाख मराठा, आणि जयभीम सारखे विरोधाभासी नारे एकत्र देत कामगारांना फक्त अस्मितावादी प्रतिकांमध्ये अडकवू पाहणाऱ्या, राणा भीमदेवी घोषणा आणि अतिआत्मविश्वासपूर्वक छातीठोक भाषणे करत असताना कामगारांना तथ्य आणि तर्कांच्या आधारावर कधीच शिक्षित न करणाऱ्या, एकतर्फी निर्णय घेत लोकशाही प्रक्रिया न पाळणाऱ्या या वकिलांना आंदोलनाचे नेतृत्व देणे ही त्याच जुन्या चुकांची पुनरावृत्ती होती.

न्यायालयाने सर्व कामगारांना कामावर हजर होण्याचा, म्हणजेच संप संपवण्याचा आदेश दिला आहे. या निकालाच्या आधारावर मविआ सरकारने आपले खरे वर्गचरित्र दाखवत कामगारांचे दमन चालू केले आहे. शरद पवारांच्या घरावर निघालेल्या मोर्चाला 'हल्ला' म्हणत सदावर्ते आणि जवळपास 110 कामगारांना अटक केली आहे. या कामगारांच्या बडतर्फीची प्रक्रिया सुरू केली आहे. सदावर्तेंचे नेतृत्व जरी अयोग्य असले तरी अशाप्रकारचे दमन हा कामगारांच्या संघटित होण्याच्या, विरोध करण्याच्या लोकशाही-नागरी अधिकारांवर हल्ला आहे आणि या प्रकारच्या दमनाचा सर्वांनी तीव्र निषेध करणे आणि कामगारांच्या अधिकारांच्या बाजूने उभे राहणे गरजेचे आहे. नुकतेच दिल्लीमध्ये आंगणवाडी कामगारांच्या संपाच्या विरोधात केजरीवालच्या 'आप'ने आणि मोदींच्या 'भाजप'ने एकत्र येऊन 'एस्मा' कायदा लागू करून संप बेकायदेशीर ठरवला आहे आणि कामगारांवर केसेस दाखल करून दमनचक्र चालू केले आहे. यावरून कामगार वर्गाने हे समजले पाहिजे की वरवर कामगारांप्रती सहानुभूती दाखवणारे हे सर्व भांडवली पक्ष वास्तवात एकाच माळेचे मणी आहेत.

### फक्त सरकार नाही तर भांडवलदार वर्गाच्या विरोधातील लढा!

विलिनीकरणाची मागणी ही या सर्व पक्षांच्या खाजगीकरणाच्या धोरणाच्या विरोधातील मागणी आहे. कामगारांच्या एका गटाला सरकारी सेवेत समावून घेणे म्हणजे इतर कामगारांच्या या मागणीला बळ देणेच आहे. भांडवली व्यवस्थेची गरज आहे की स्वस्तात कामगार उपलब्ध व्हावेत जेणेकरून मालकांच्या नफ्याचा दर वाढावा. अशामध्ये विलिनीकरणासारख्या पावलांमुळे एकंदरीतच कामगारांची मजुरी वर जाऊन नफ्याचा दर घसरतो. इतकेच नाही तर खाजगी प्रवासी वाहतूकदारांचे हित सुद्धा सार्वजनिक वाहतूक मजबूत झाल्यामुळे धोक्यात येते. त्यामुळे मोठे भांडवलदार, खाजगी प्रवासी वाहतूक करणारे भांडवलदार, बिल्डर, ठेकेदारांसारख्या भांडवलदार वर्गाच्या सर्व हिस्स्यांना अशा मागण्यांना विरोधच आहे आणि याच त्यामुळेच वर्गाच्या निधीवर पोसलेल्या मनसे, भाजप, राष्ट्रवादी, शिवसेना, काँग्रेस सारख्या पक्षांचाही. आपला लढा कोणाविरोधात आहे, आणि कोणत्या हितसंबंधांविरोधात आहे हे समजू न शकणे नेहमीच लढ्याला मागे नेते.

### मनसे, भाजपने दिला धोका

आंदोलनामध्ये मनसेने तोंडदेखली भेट घेऊन सहानुभूती दाखवणे सोडून काही केले नाही. पडळकर-खोत यांच्या माध्यमातून संधीसाधूपणे नेतृत्व घेऊ पाहणाऱ्या भाजपने तुटपुंजी पगारवाढ समोर येताच आंदोलनातून पळ काढला. नंतरही सतत राष्ट्रवादीला निशाणा बनवत फक्त राजकीय पोळी भाजण्याचे काम यांनी केले ; आणि जेव्हा भाजपचे सरकार होते तेव्हा विलिनीकरण का नाही केले या मुद्यावर पडदा टाकला. सदावर्तेंनी सुद्धा राजकीयदृष्ट्या फक्त भाजपचे कौतुक करून आपला राजकीय कल दाखवला आहे.

### व्यापक जनसमर्थनाचा अभाव

या सर्व आंदोलनादरम्यान राज्य सरकारने खाजगी वाहतुकदारांना प्रचंड प्रोत्साहन दिले. गावाखेड्यांकडील गरिब जनतेला अपार त्रास झाला, पण त्याची पर्वा सरकारांना कधी होती? खाजगी वाहतूक करणारे कामगार अशाप्रकारे सार्वजनिक वाहतुक करणाऱ्या कामगारांविरोधात वापरले गेले, कारण कामगार वर्गामध्ये व्यापक एकतेच्या जाणीवेचा अभाव. आज संपूर्ण प्रवासी वाहतूक व्यवस्था हे एक क्षेत्र मानले तर रिक्षा, ओला-उबर, एस.टी, खाजगी बस, इत्यादींमधील कामगारांच्या विविध गटांमधील ही रस्सखेच भांडवली व्यवस्थेच्या आणि लढे मोडण्याच्या कामीच येते.

संपूर्ण आंदोलनादरम्यान जनतेच्या व्यापक हिस्स्यांना आपल्या मागण्यांभोवती आणण्याचे तोकडे प्रयत्न केले गेले. एस.टी. कामगारांच्या एका हिस्स्याने हे प्रयत्न केले असले तरी वेळोवेळी बदललेल्या नेतृत्वापैकी कोणीही या मुद्याला जोर लावला नाही. परिणामी बाजारी मीडियाच्या माध्यमातून जनतेच्या एका मोठ्या हिस्स्याला एस.टी. कामगारांच्या विरोधात उभे करण्यात सरकार यशस्वी झाले.

आंदोलनाच्या या सर्व अनुभवातून योग्य राजकीय निष्कर्ष काढणे हे भविष्यातील लढ्यासाठी अपरिहार्य आहे. भांडवली पक्षांचे कामगार विरोधी चरित्र ओळखणे, न्यायालयांच्या मर्यादा ओळखणे, लोकशाही तत्वावर आधारित संघटना पुर्नबांधणी करणे आणि खाजगी-सार्वजनिक प्रवासी वाहतूक कामगारांच्या व्यापक एकजुटीकडे जाणे ही भविष्यातील योग्य कार्यदिशा आहे.

# पंजाब निवडणूक: योग्य पर्यायाच्या अभावी जनतेकडून छद्म पर्यायाची निवड

✎ निखिल

पंजाबच्या निवडणुकांत दणदणीत विजयानंतर आम आदमी पक्ष काँग्रेसचा राष्ट्रीय पर्याय आणि भाजपचा संभाव्य प्रमुख विरोधक म्हणून चित्रित केला जाऊ लागला आहे. हे करण्यात अनेक उदारमतवादी मंडळी आणि भांडवली माध्यमंही बरीच सक्रिय झालेली आहेत. पण खरंच आम आदमी पक्षाकडे पंजाब आणि एकंदर देशातील कामकरी जनता पर्याय म्हणून बघू शकते का?

'आप'चे कामगार विरोधी चरित्र आणि ढोंग समजण्यासाठी आधी आप च्या पंजाबमधील विजयाची पार्श्वभूमी समजणे आवश्यक आहे.

### पंजाबची सामाजिक-आर्थिक स्थिती एक आढावा

पंजाब राज्याची एकूण लोकसंख्या 2.8 कोटी आहे ज्यात 55 लाख कुटुंब आहेत. हे तुलनेने विकसित भांडवली शेती होणारे राज्य आहे. ज्यात जवळपास 11 लाख शेतकी कुटुंब आहेत ज्यात 2.04 लाख (18.7%) सीमांत शेतकरी, 1.83 लाख (16.7%) छोटे शेतकरी आहेत आणि 7.06 लाख (64.6%) शेतकऱ्यांजवळ 2 हेक्टर पेक्षा जास्त जमीन आहे. पंजाबमध्ये एकंदर देशाच्या तुलनेत मध्यम व श्रीमंत भांडवली मालक शेतकऱ्यांची संख्या जास्त आहे. पण शेतीमध्येही शेती उत्पादनाचा वृद्धी दरही देशाच्या तुलनेत सलग आणि वेगाने घसरला आहे. 1971-72 ते 1985-86 च्या दरम्यान पंजाबचा विकास दर 5.70% होता तर देशाचा 2.31%; तोच दर 1986-87 ते 2004-05 ह्या काळात पंजाबचा 3% तर देशाचा 2.94 % आणि 2005-06 ते 2014-15 ह्या काळात पंजाबचा 1.61% तर देशाचा 3.5% होता. किमान हमी भावाच्या व्यवस्थेमुळे फक्त गहू आणि तांदूळ मोठ्या प्रमाणात पिकवले गेले व त्याद्वारे मध्यम आणि श्रीमंत मालक शेतकरी तसेच कुलकांनी मोठा नफा मिळवला. पण हमी भावासाठीच्या शेतीमुळे पीक विविधता संपली, जमिनीची गुणवत्ता खूप खालावली, तांदूळासारख्या जास्त पाणी लागणाऱ्या पिकामुळे भूजल पातळी खालावली (ह्याचा फटका इतरांच्या तुलनेत छोट्या शेतकऱ्याला आणि कामकरी जनतेला जास्त बसतो). शेतीत मुख्यतः भूमिहीन दलित शेतमजूर आणि उत्तरप्रदेश, बिहार मधून आलेले शेतमजूर काम करतात.

शिक्षणाचे इतर राज्यांप्रमाणेच मोठ्या प्रमाणात व्यापारीकरण झालेले आहे तसेच पंजाब देशातील सर्वात जास्त बेरोजगार वरच्या पाच राज्यांपैकी एक राज्य आहे. वर्ष 2017 पासून 2021 पर्यंत पंजाबमध्ये बेरोजगारी दर सरासरी क्रमशः 5.61%, 8.15%, 10.3%, 10.98%, 7.1% होता. 2019 आणि 2020 मध्ये पंजाबचा बेरोजगारी दर भारताच्या सरासरी बेरोजगारीच्या दराच्या वरती होता. ह्या सर्व स्थितीमुळे पंजाबमधून कॅनडा, ऑस्ट्रेलिया, न्यूझिलंड मध्ये शिक्षण आणि रोजगारासाठी मोठ्या प्रमाणात पलायन होते. राज्यात उरलेल्या तरुणाईपुढील अशा विदारक स्थितीमुळे पंजाबमध्ये नशेखोरीचे पीक आलेले आहे. पंजाबची तरुणाई कुठल्याही वास्तविक मार्गाअभावी निराशेतून

पान 4 वर

# पंजाब निवडणूक: योग्य पर्यायाच्या अभावी जनतेकडून छद्म पर्यायाची निवड

पान 3 वरून

विमनस्क बधिरतेकडे ढकलली गेली आहे.

तसेच पंजाबमध्ये सार्वजनिक आरोग्य सेवेचे खच्चीकरण आणि खाजगीकरण देशाच्या सरासरी स्थितीपेक्षा वाईट म्हणावे लागेल कारण भारतात एकूण खाजगी आरोग्य सेवा घेणाऱ्या लोकसंख्येचा सरासरी आकडा 58% तर तोच ग्रामीण पंजाबमध्ये 70% आहे. पंजाबमध्ये रासायनिक शेतीमुळे वाढलेल्या कॅन्सरच्या उपचारासाठी पंजाब मधून हरियाणा, राजस्थानाला तुलनेने थोडी स्वस्तात आरोग्य सेवा असल्यामुळे मोठ्या प्रमाणात लोक जातात त्यामुळे तिकडे जाणाऱ्या ट्रेनला विशेष कॅन्सर ट्रेन संबोधले जाते.

पंजाबमध्ये दलितांची लोकसंख्या इतर राज्यांच्या तुलनेत सर्वाधिक 33 टक्के आहे. पंजाबच्या ग्रामीण भागात हे प्रमाण 37 टक्यांपर्यंत जाते. दोआबा क्षेत्राच्या काही भागात हे प्रमाण 45 ते 50% पर्यंत जाते. पंजाब मधील दलितांतील मुख्य जातींमध्ये रामदासिए, मजहबी आणि वाल्मीकि प्रमुख आहेत. दलितांची मोठ्या संख्या भूमिहीन शेतमजूरांची आणि ग्रामीण भागातील सर्वात शोषितांची आहे.

### काँग्रेस आणि अकाली दलातील सत्ताहस्तांतरणाचा वीट

पंजाब राज्याच्या निर्मिती पासून पंजाब राज्य सरकार आलटून पालटून काँग्रेस आणि शिरोमणी अकाली दलाचे राहिलेले आहे. 2007 ते 2017 च्या काळात शिरोमणी अकाली दल आणि भाजपा सत्तेत होते. ह्या 10 वर्षांच्या काळात राज्यात एकंदरीत खाउजा धोरणांच्या रेट्यासोबतच अंमली पदार्थांची तस्करी, बेकायदेशीर खणन, स्थानिक अकाली नेत्यांची गुंडशाही ह्यासर्वांच्या विरोधात त्रस्त जनतेने 2017 ला काँग्रेसला निवडले. काँग्रेस कडून प्रचारात अनेक अभियानांमध्ये एक 'हर घर कॅप्टन अभियान' चालवले गेले, ज्यात प्रत्येक घरात एका व्यक्तीला रोजगार व बेरोजगाराला 2500 बेरोजगारी भत्ता देण्याचे आश्वासन दिले. तसेच शेतकऱ्यांचे सर्व कर्ज माफ करण्याचे आणि मुख्यमंत्री पदाचे उमेदवार अमरिंदर सिंहाने स्वतः "चार हफ्ते बिच नशे दा लत तोड के छड्डू" असे आश्वासन दिले. परंतु ही सर्व निवडणुकीसाठीची जुमलेबाजी होती हे स्पष्ट होते. त्यामुळे अकाली आणि काँग्रेस ह्यांच्या आलटून पालटून येणाऱ्या सरकारांपासून जनता खुप त्रस्त होती. त्यात केंद्र सरकारच्या तीन कृषी कायद्यांविरोधात मोठे शेतकरी आंदोलन (कुलक तसेच मध्यम व श्रीमंत मालक शेतकऱ्यांच्या मागण्या घेऊन) उभे झाले. त्यामुळेही मुख्य धारेच्या भांडवली पक्षांविरुद्ध वातावरण निर्मिती झाली.

### आम आदमी पार्टीचा छद्म पर्याय!

आम आदमी पक्ष जिंकण्यामागचे मुख्य कारण प्रस्थापित मुख्य भांडवली राजकीय पक्ष काँग्रेस आणि शिरोमणी अकाली दलासारख्या जनविरोधी आणि लुटारू व माफियांच्या विरुद्धचा राग हेच आहे. हे दोन्ही पक्ष कमी अधिक शीख धार्मिक अस्मितेचा वापर करत राहिले आहेत. निवडणुकीच्या तोंडावर शेतकरी आंदोलनाचा चढलेला पारा लक्षात घेऊन अकाली दलाने भाजपा सोबतची युती तोडली आणि भाजपाकडून मिळणाऱ्या हिंदू मतांची भरपाई दलित मतांनी करण्याच्या अपेक्षेने बहुजन समाज पार्टी सोबत संधीसाधू युती केली. काँग्रेस नेत्यांमध्ये चालू असलेली सत्तेसाठीची कुत्तरओढ कॅप्टन अमरिंदर सिंहाचा राजीनामा घेतल्यापासून चव्हाट्यावर आली आणि निवडणूक होईस्तोवर सुरु राहिली.

अशा स्थितीत आम आदमी पक्षाने फसव्या "दिल्ली मॉडेलचा" प्रतिमा निर्मितीसाठी जोरदार प्रचार केला. निवडणुकीच्या आधी केजरीवालने स्थानिक उद्योगपती व व्यापाऱ्यांना अनेक टाऊन हॉल मीटिंगच्या माध्यमातून दिल्लीप्रमाणे श्रमाच्या खुल्या लुटीसाठी योग्य वातावरण निर्मितीचे आश्वासन दिले आणि सोबतच उद्योगाचे प्रतिनिधी (म्हणजे भांडवलदार) आणि उद्योग-मंत्री ह्यांची एक समिती तयार करून उद्योगासंबंधातील सर्व निर्णय घेण्याचे अधिकार ह्या समितीला देऊ आणि हे निर्णय सरकारवर बंधनकारक राहतील असे आश्वासन दिले. आपच्या निम्न भांडवली प्रतिक्रियावादी चरित्रामुळे आणि कुलक व धनी मालक शेतकऱ्यांच्या हितासाठीच्या घोषणांमुळे त्यांना शेतकऱ्यांचाही ठिक-ठाक पाठिंबा मिळाला. छोटे व सीमांत शेतकरी व कामगारांचा एक हिस्साही योग्य राजकीय शिक्षणाच्या अभावामुळे लोकरंजकतेत वाहून गेला.

पंजाब मालवा, दोआबा, माझा अशा तीन प्रांतात विभागला जातो. उत्तर पश्चिमेला रावी आणि बियास दरम्यान माझा प्रांत, बियास आणि सतलज नदी दरम्यान दोआबा प्रांत आणि सतलज नदीच्या दक्षिणेला मालवा प्रांत आहे. ह्यातील सगळ्यात मोठा प्रांत ज्यात विधानसभेच्या 58% जागा येतात, तो मालवा प्रांत आहे. ह्याच प्रांतात शेतकरी आंदोलनाचा प्रभाव सगळ्यात जास्त होता. मालवा प्रांताला 'जमीनदारी पट्टा' सुद्धा म्हटले जाते. एका अंदाजानुसार ह्या भागात 10 एकरच्या वर जमीनधारणा असणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या 27.5% एवढी जास्त आहे. सोबतच मालवा छोट्या शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचाही पट्टा आहे. पंजाबमध्ये 1990 नंतरच्या काळात झालेल्या 97 टक्के आत्महत्या ह्याच भागात झाल्या. मालवा भाग शेतकरी आंदोलनाचे केंद्र होते कारण ह्या भागात सगळ्यात जास्त कुलक व धनी आणि उच्च मध्यम जाट शेतकरी आहेत. ह्या भागात 'आप'ला 69 पैकी 66 जागा मिळाल्या आहेत. 2017 ला विधानसभा निवडणुकीत सुद्धा मुख्यतः ह्याच भागातून 'आप'ला 20 जागा मिळाल्या होत्या. मालवा 'डाव्यांच्या' संघर्षाचे क्षेत्र राहिलेले आहे. ह्यातील दुरुस्तीवादी आणि काही क्रांतिकारी गट सुद्धा कुलक व श्रीमंत मालक शेतकऱ्यांच्या हितांसाठी संघर्ष करत आलेले आहेत. ह्या वर्गसहयोगवादामुळे आणि विचारधारात्मक दिवाळखोरीमुळे आपबद्दल योग्य भूमिका घेण्यात त्यांनीही चूक केली आहे. माझा आणि दोआबा मध्ये आप ला 48 पैकी 26 जागा मिळाल्या. अशाप्रकारे 117 पैकी 92 सीट आम आदमी पक्षाला मिळाल्या.

### कोट्यधीश धंदेबाज 'आम आदमी'!

आपने विधानसभा निवडणुकीत 40 पेक्षा जास्त अशा उमेदवारांना तिकीट दिले जे काँग्रेस व अकाली सारख्या पक्षांतून आलेले होते. पंजाब विधानसभेतील आम आदमी पार्टी चे 69% उमेदवार कोट्यधीश होते. एवढेच नाही तर घोषित 238 कोटी संपत्ती असणारे कुलवंत सिंह हे पंजाब विधानसभा निवडणुकीतील सर्वात श्रीमंत उमेदवार आम आदमी पक्षाचे होते. 'आप'चे संयोजक केजरीवाल आणि पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान स्वतः कोट्यधीश आहेत. केजरीवालची घोषित संपत्ती 3.5 कोटी आहे.

### दलित मतांसाठी सर्व पक्षांकडून अस्मितावादाची जोरदार कवायत!

एकंदर पंजाबमध्ये दलित लोकसंख्या इतर भारताच्या तुलनेने सर्वाधिक म्हणजे 32 टक्के आहे, ज्यात दोआबा प्रांतात 37 टक्के, मालवा प्रांतात 31 टक्के आणि माझा प्रांतात 29 टक्के आहे. ग्रामीण भागातील भूमिहीन दलितांना जट्ट शेतकऱ्यांकडून होणाऱ्या जातीय अत्याचारांना तोंड द्यावे लागते. शेतकरी आंदोलनाच्या दरम्यान सिंघू बॉर्डर वर निहंग शिखांकडून एका दलित व्यक्तीची दोन्ही हात कापून पाशवी हत्या करण्यात आली. धार्मिक ग्रंथाच्या अपमानाचे कारण देत ही घटना घडली. अशा 'बेअदबी' च्या नावावर झुंडीद्वारे होणाऱ्या हत्यांना सरकार आणि सर्व भांडवली पक्षांकडून दुर्लक्षित ठेवले जाते आणि दोषींना कुठलीही शिक्षा होत नाही. पंजाब व्हिलेज कॉमन लँड्स ॲक्ट(PVCLR Punjab Village Common Lands (Regulation) Act) 1961 नुसार ग्रामसभेच्या भूमीमधील एक तृतीयांश जमिनीवर दलितांचा कायदेशीर हक्क आहे. परंतु जाट शीख जमिनीवर नियंत्रण ठेवून आहेत व जमिनीच्या कायदेशीर अधिकारासाठी संघर्ष केलेल्या दलितांच्या जातीय हिंसाचारातून अनेक हत्या झालेल्या आहेत. परंतु ह्यावर कुठलाच भांडवली पक्ष आणि दलित अस्मितावादीही कुठलीच भूमिका घेत नाहीत.

दलितांची मतं मिळवण्यासाठी मात्र चढाओढ सर्व पक्षांत लागली होती. काँग्रेसने ह्यासाठी पंजाबला पहिला दलित मुख्यमंत्री चरंजीतसिंह चन्नी दिला. तर अकाली दल आणि बसपा आघाडीने उपमुख्यमंत्री पद दलित व्यक्तीला देण्याचे आश्वासन दिले. तर भाजपाने बहुमत मिळाल्यास दलित मुख्यमंत्री बनवू असे आश्वासन दिले. ह्या प्रतिकवादातही 'आप'ने मुसंडी मारली. आधीच्या विधानसभेत हरपाल सिंह चिमांना विरोधी पक्ष नेता केले आणि निवडणुकीच्या काळात भगतसिंहासोबत डॉ आंबेडकरांच्या प्रतीकाचा जोरदार वापर केला. कोरोना काळात सुद्धा धनिक शेतकऱ्यांनी पंचायती बोलावून शेत मजुरांच्या मजुरीवर सीलिंग लावण्याचे निर्णय पारित केले आणि कुठल्याही दुसऱ्या गावात जाऊन काम केल्यास सामाजिक बहिष्काराच्या घोषणा केल्या. ह्या शेतमजुरांमध्ये बहुसंख्य दलित शेतमजूर आहेत. तसेच भारताच्या वेगवेगळ्या भागातून पंजाबात आलेल्या कामगारांचेही शोषण आणि दमन करण्यात हे कुलक आणि धनिक शेतकरी कुठलीच कसर सोडत नाहीत. अशा सर्व प्रसंगी सरकार आणि 'आप' आणि इतर सर्व भांडवली पक्ष ह्याकडे कानाडोळा करतात. अस्मितावादी भांडवली राजकारण करणारे वोट बँक म्हणून जाती उपजातींना असेच वापरतात परंतु जातीय अत्याचार आणि दलित कामकरी जनतेच्या प्रश्नावर मूग गिळून गप्प बसतात.

आम आदमी पक्षाने जनतेच्या मनातील काँग्रेस व अकाली दलाबद्दलचा राग तसेच धार्मिक बहुसंख्यांकवाद, नरम राष्ट्रवाद, लोकरंजक लोककल्याणवादाच्या आधारावर ही निवडणूक जिंकली. ह्यांच्या सत्तेत आल्याने सामान्य जनतेला काय मिळेल हे बघण्यासाठी 5 वर्षांची वाट बघणे गरजेचे नाही 'आप' ची वर्ग पक्षधरता, विचारधारा, दिल्लीतील धोरणांचा इतिहास समजणे पुरेसे आहे.

### 'आप'चे वर्गचरित्र

'आप'चे राजकारण आणि वर्ग चरित्राचा विचार केला तर इतर भांडवली पक्षांप्रमाणेच 'आप'चे पूर्ण राजकारण भांडवली सुधारवाद, एनजीओ वाद आणि लोकरंजक जुमलेबाजीवर टिकेलेले आहे. 'आप' छोट्या आणि मध्यम भांडवलदारांचे प्रतिनिधित्व करतो. तसेच मोठ्या भांडवलाचीही सेवा भांडवली व्यवस्थेचे रक्षक बनून आणि जनतेला व्यवस्थेअंतर्गत नवीन पर्याय देऊन करतो. 2019-20 मध्ये 'आप'ला 37 कोटी 52 लाख रुपये निवडणूक निधी मिळाला ज्याचा मोठा हिस्सा टाटा-बिर्ला-अंबानी-अडाणी सारख्या भांडवली घराण्याच्या निवडणूक ट्रस्टकडूनच आला. त्याव्यतिरिक्त क्षेत्रीय भांडवलदार, छोटे मालक आणि उच्च मध्यम वर्गाकडूनही 'आप' ला निधी मिळतो. 'आप' पूर्णतः खाऊजा धोरणांची समर्थक आहे आणि ह्या धोरणांना भ्रष्टाचारातून मुक्त करण्याचे स्वप्न विकतो. दिल्लीतील सरकारने फॅक्टरी मालकांना श्रम विभागाकडून आणि विक्री करातून पूर्ण सूट दिलेली आहे ह्यातून हे स्पष्ट होते. शिक्षण क्षेत्रातही 500 नवीन शाळा आणि 20 नवीन कॉलेजचे आश्वासन कधी जमीनीवर उतरलेच नाही. कंत्राटी कामगार, गेस्ट टीचर, राज्य वाहतूक चालक-वाहक, आरोग्य कर्मचारी ह्यांची कंत्राटी पद्धतीने भरती संपवून त्यांना कायमस्वरूपी रोजगार देण्याचे आश्वासनही पाळले गेलेले नाही. कामगारांच्या सर्व अधिकारांना धाब्यावर बसवणाऱ्या केंद्र सरकारच्या 3 कामगार कायद्यांचा कुठलाही विरोध केला नाही. उलट केजरीवालने धंद्यात बाधा आणणारे सर्व कायदे बदलण्याचे आणि कामगारांच्या रक्ताचा शेवटचा थेंबही शोषून घेता येण्याची व्यवस्था करण्याचे आश्वासन पाळले आहे. दिल्लीतील 22,000 अंगणवाडी सेवक आणि मदतनीस आपल्या न्याय्य हक्कांसाठी संघर्ष करत असतांना भाजपाच्या सहकार्याने 'हेस्मा' सारखे काळे कायदे वापरून कामगार-महिलांचे दमन करण्याची भूमिका घेतली आहे हा 'आप' चा खरा चेहरा आहे.

200 युनिट वीज जनतेच्या कराच्या पैशातूनच दिली जाते, खाजगी वीज कंपन्यांना मात्र बाजार भावाने पैसे दिले जातात. सरकारी वीज कंपन्यांचे खाजगीकरण करण्यात 'आप' चीच भूमिका राहिलेली आहे. काही मॉडेल शाळा आणि काही मोहल्ला क्लिनिक उभे करून, कोट्यवधी खर्चून केलेल्या कंठाळ प्रचाराने केजरीवालने आपली लोककल्याणकारी असण्याची प्रतिमा निर्मिती केली आहे. केजरीवालच्या दिल्ली सरकाने मार्च 2020 पासून जुलै 2021 पर्यंत आपल्या खोट्या प्रचार-जाहिरातींवर 490 कोटी रुपये वाहवले आहेत. ह्यांचा मागील 7 वर्षाचा जाहिरातींवरील खर्च हजारो कोटींच्या घरात जातो. हा आहे 'दिल्ली मॉडेल' चा खरा चेहरा.

ह्याव्यतिरिक्त केजरीवालच्या आम आदमी पक्षाने बहुसंख्यकवाद आणि राष्ट्रवादाचाही जोरदार वापर केलेला आहे.

जनतेचे पैसे मोफत तीर्थयात्रा आणि सरकारच्या पूर्ण कॅबिनेट सोबत मोठ्या स्टेडियम मध्ये पुजा-अर्चनेत उडवले आहेत. हे सर्व हिंदु वोट बँकेला आकृष्ट करण्यासाठी करण्यात येते हे कोणीही समजू शकेल. पंजाबमध्येही त्यांनी शीख धार्मिक अस्मितेच्या वापरासोबतच हिंदू मत बांधणीचे कामंही केले. पंजाबमध्ये एकूण लोकसंख्येच्या 38% हिंदू आहेत. त्यांचे मत मिळवण्यासाठी 'आप'ने भाजपच्या बहुसंख्यांकवादी प्रचाराच्या खेळीचा वापर नम्रतेने केला. ह्यात हिंदू बहुल पठानकोट, गुरदासपुर व जालंधर सारख्या हिंदू बहुल मतदारसंघात तिरंगा यात्रा आयोजित करणे, राष्ट्रीय सुरक्षा आणि पाकिस्तानच्या मुद्द्यावर पूर्णतः प्रतिक्रियावादी भूमिका घेत भाजपचीच भाषा बोलणे, प्रचारा दरम्यान जालंधर येथील एका पत्रकार परिषदेत केजरीवालने सक्तीने धर्मांतरणाच्या विरोधात एका कडक कायद्याची गरज आहे असे म्हणणे आणि त्यासाठी उदाहरण देतांना उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश आणि हिमाचल प्रदेशने असे कायदे आणले आहेत असे म्हणणे, ही उदाहरणे स्पष्ट दाखवतात की राष्ट्रवादाचा वापर करण्यात 'आप' भाजपपेक्षा मागे नाही.

अशा रितीने भाजपाची बी-टीम बनून सुद्धा पाखण्डी केजरीवाल आणि आम आदमी पक्षाने समाजवादाचे प्रखर चिंतक आणि झुंजार योद्धा भगतसिंहाला आपल्या घाणेरड्या भांडवली प्रचारासाठी वापरले. धार्मिक प्रतीकं नाकारून 'मी नास्तिक का आहे' हे सांगणाऱ्या भगतसिंहाची धार्मिक पिवळी पगडीधारी प्रतिमा प्रचारित केली. सोबतच व्हीआयपी संस्कृतीला व माफियांना विरोध, आम आदमीचा विकास असे लोककल्याणकारी धोरणांचे लोकरंजक नारे सामान्य कामकरी जनतेला भुलवून तिच्या वर्गीय भावनांना साद घालण्यासाठी वापरले. परंतु ह्यात अत्यंत चतुराईने कामगार-कष्टकऱ्यांचे सर्व ठोस वर्गीय मुद्दे गायब करण्यात आलेले आहेत.

उलट क्षेत्रीय छोटे-मध्यम उद्योगपती, व्यापारी, भांडलवदार, व्यावसायिक ह्यांच्यासाठी व्यवसाय करण्यास सुलभ वातावरण निर्माण करणे, त्यासाठी लालफितशाही संपवणे, मोफत वीज, कर माफी, भांडवल संचयाला बाधा असलेल्या

पान 5 वर

# अमेरिकेत अमेझॉन कंपनीत लेबर युनियनची स्थापना

## रिटेल क्षेत्रातील कामगारांनो एक व्हा!

✒ सुस्मित

1 एप्रिलला अमेरिकेतील न्यूयॉर्कच्या स्टॅटन आयलंड या भागात ऐतिहासिक घटना घडली. येथील अमेझॉन वेअरहाऊस मधील कामगारांनी आपसात मतदान आयोजित करवून बहुमताने युनियन बनवण्याचा निर्णय घेतला. 1 वर्षाच्या अथक प्रयत्नांनंतर, युनियन बनवण्याच्या प्रयत्नाविरोधातील कारवाया हाणून पाडत, भाडोत्री गुंडांना सामोरे जात, अमेझॉन लेबर युनियन (ALU) ही युनियन बनवणे शक्य झाले. ही अमेरिकेतल्या अमेझॉन कंपनीतील कामगारांची पहिलीच युनियन आहे. कामगारांच्या या विजयाने अमेझॉन, वॉलमार्ट सारख्या बलाढ्य रिटेल कंपन्यांमधील इतर कामगारांना तसेच रिटेल क्षेत्रातील इतर कामगारांना संघटित होण्यासाठी दिशा तसेच आत्मविश्वास मिळेल. भारतात सुद्धा अमेझॉन, फ्लिपकार्ट, स्नॅपडील, मिंत्रा सारख्या रिटेल क्षेत्रातील कंपन्या वाढल्या आहेत. भारतातही या क्षेत्रातील कामगारांना अत्यंत कठीण परिस्थितीत काम करावे लागते. अमेझॉन मध्ये कामगार युनियन बनण्याच्या प्रक्रियेतून, आणि त्यांच्या मागण्यांमधून शिकवण घेत आज भारतातील रिटेल क्षेत्रातील कामगारांनी संघटित होण्याची गरज आहे.

### रिटेल क्षेत्रातील कामाची परिस्थिती

अमेझॉन, वॉलमार्ट या रिटेल क्षेत्रातील जगभरातील सगळ्यात मोठ्या कंपन्यांमध्ये येतात. आजच्या घडीला मध्यमवर्गातून येणाऱ्या ग्राहकाला कुठलीही गोष्ट एका क्लिक द्वारे मिळवण्याची सवय या कंपन्यांनी लावली आहे. ग्राहकांना एका क्लिकवर मिळणाऱ्या या सेवेमागे रिटेल क्षेत्रातील वेअरहाऊस (कोठार) आणि डिलीव्हरी करणाऱ्या कामगारांचे हाडं गळवणारे काम आहे. वेअरहाऊस मधल्या वस्तू पॅक करणाऱ्या कामगारापासून ते घरापर्यंत आणून देणाऱ्या "डिलिव्हरी बॉय" पर्यंत अनेक कामगारांच्या हातातून जाऊनच वस्तू घरपोच मिळते.

एकीकडे कंपन्यांचा नफा कोटीच्या कोटी उड्डाणे घेत असताना याच कंपन्यांच्या कामगारांची परिस्थिती अतिशय वाईट आहे. अमेझॉन, वॉलमार्ट सारख्या बलाढ्य कंपन्यांचा नफा अनेक लहान प्रगत देशांपेक्षाही जास्त असतो. उदाहरणासाठी कोरोना महामारीपूर्वी 2019 मध्ये अमेझॉनचा नफा 92,640 कोटी रुपये इतका होता, तोच 2021 संपताना 2,64,000 कोटी रुपये इतका प्रचंड झाला. या कंपन्यात काम करणारे कामगार मुख्यतः कंत्राटी पद्धतीने नेमले जातात. अमेझॉन तर एका कामगाराला 3 वर्षाच्या पलीकडे कामावर ठेवत नाही तसेच कामगारांची बढती न करता मुख्यतः बाहेरून व्यवस्थापनातली माणसं नेमली जातात. कामगारांनी जास्तकाळ कंपनीत राहू नये याकरिता 3 वर्षांनंतर कामगारांना कंपनी सोडण्यासाठी बोनस सुद्धा दिला जातो. याद्वारे तरुण कामगारांची संख्या जास्त राहून कामाची उत्पादकता वाढते आणि सोबतच कामगारांचे पगार सुद्धा कमी ठेवले जातात. यात जे कामगार तासानुसार काम करतात त्यांना अमेरिकेमध्ये तासाचे फक्त 15 ते 18 डॉलर इतके पगार दिले जातात (याला रुपयात बदलवून पगाराचा अंदाज घेऊ नये, कारण अमेरिकेमध्ये खर्चही डॉलर मध्ये करावा लागतो. उदाहरणार्थ पाण्याची बाटली 1डॉलरखाली मिळत नाही. तेव्हा हा पगार अमेरिकेत आत्यंतिक गरिबीचाच पगार ठरतो). याशिवाय कामगारांवर सतत पाळत ठेवली जाते. थोडा जरी वेळ तुम्ही विश्रांती घेतली तर तो "निष्क्रिय वेळ" धरला जातो आणि लगेचच मॅनेजर ची बोलणी खावी लागतात. यात पाणी पिण्याचा वेळ सुद्धा धरला जातो! असे सातत्याने होत राहिले तर तुम्हाला कामावरून काढूनही टाकले जाते. कामगारावर कामाचा इतका ताण असतो की वेळ वाचवायला अनेक कामगार मुतारी वा शौचालयात न जाता कामाच्या ठिकाणीच प्लास्टिकच्या बाटलीचा वापर करतात! याशिवाय 10 तासाच्या शिफ्ट मध्ये 15 मिनिटांचे दोन ब्रेक आणि जेवणाचा 30 मिनिट ब्रेक एवढीच विश्रांती मिळते. अमेझॉन सारख्या कंपन्यांचे वेअरहाऊस हे अतिप्रचंड म्हणजे 10-15 फुटबॉल मैदाने मावतील एवढे असते त्यामुळे चालत जाण्याचा वेळ वाचवण्यासाठी जेवणाच्या ठिकाणी जाणे सुद्धा कामगार टाळतात आणि कामाच्या ठिकाणीच जेवण करतात. कामाच्या ठिकाणी बसायला खुर्च्याच नसतात आणि 10-12 तास उभे राहावे लागते.

वेअरहाऊसमध्ये मोठमोठी यंत्रे, मालाच्या वाहतुकीसाठी ट्रॉलीज यांचा भरणा असतो. यात अपघात ही नित्याचीच बाब आहे. यात एकच काम सतत केल्याने हाडांचे-स्नायूंचे (मसक्युलो-स्केलेटल) आजार होतात. पण या कंपन्यांसाठी फक्त आणि फक्त नफाच महत्वाचा असल्याने माणसाच्या जीवाची पर्वा यांना नसते. कामाच्या ठिकाणच्या सुरक्षिततेसाठी नियमावली असतानाही याकडे दुर्लक्ष केले जाते. सणासुदीच्या काळात जेव्हा बाजारात या कंपन्या 'सेल' लावतात तेव्हा तर सुरक्षिततेचे नियम धाब्यावर बसवले जातात. कोरोना काळात जेव्हा लोक घराबाहेर निघायला घाबरत होते तेव्हा वस्तू विकत घ्यायला लोक ऑनलाईनच वस्तूंची खरेदी करत होते. त्या काळात सर्व कामगारांना सक्तीचा ओव्हरटाईम होता. यात कहर म्हणजे कोरोना काळात वेअरहाऊसमध्ये कोरोनाचा रोगी आढळलेला असूनही कामगारांपासून हे लपवून ठेवले गेले, कामाच्या ठिकाणी मास्क, सॅनिटायझर ची व्यवस्था करण्यात नाही आली आणि कामगारांचा जीव धोक्यात घातला गेला. क्रीस स्मॉल्सने, जो नवीन अमेझॉन लेबर युनियनचा अध्यक्ष आहे, जेव्हा ही परिस्थिती व्यवस्थापनाच्या सतत निदर्शनास आणून दिली आणि काहीच होत नाही पाहून इतर 60 जणांसोबत काम बंद करून मीडिया समोर ही परिस्थिती सांगितली, तेव्हा त्याला कामावरून काढून टाकण्यात आले.

ही झाली वेअरहाऊसमधल्या कामगारांची परिस्थिती. यानंतर या संपूर्ण साखळीत येतात "डिलिव्हरी बॉईज" जे आपल्याला वेअरहाऊसमधून घरापर्यंत वस्तू आणून देतात. या कामगारांची परिस्थिती त्यांच्या वेअरहाऊसमधल्या साथींपेक्षा फार काही वेगळी नाही. या "डिलिव्हरी बॉईज" ना तर कंपनीचे कामगार सुद्धा समजले जात नाही यांना "स्वतंत्र रोजगारी व्यक्ती" समजले जाते. दिवसाचे कामाचे तास ठरलेले नसतात. महिन्याला 10-15 हजार रुपयांसाठी 10-12 तास काम करावेच लागते. प्रत्येक डिलिव्हरी मागे फक्त 10-15 रुपये मिळतात बाकी सगळे या कंपन्या हडप करतात. याशिवाय डिलिव्हरी लवकरात लवकर पोहोचवण्याचा मानसिक ताण वेगळाच! डिलीव्हरी कामगारांचा मुद्दा एक स्वतंत्र लेखाचाच मुद्दा बनतो.

या सगळ्यातून हे स्पष्ट होते की या मोठमोठ्या आंतरराष्ट्रीय कंपन्या कामगारांच्या शोषणावरच उभ्या आहेत. या शोषणाविरुद्ध, भांडवलाच्या ताकदीपुढे जर लढायचे असेल तर कामगारांची युनियनरूपी एकजूट हे पहिले पाऊल तर उचलावेच लागेल.

### अमेझॉन लेबर युनियनच्या मागण्या

अमेझॉन लेबर युनियनच्या मागण्या प्रामुख्याने खालील प्रमाणे आहेत. तासाला किमान 30 डॉलर पगार, कामाच्या ठिकाणी सुरक्षितता, शिस्तभंगाच्या मीटिंग मध्ये युनियनचे प्रतिनिधित्व, सक्तीचा ओव्हरटाईम काढून ऐच्छिक ओव्हरटाईम, 30 मिनिटांचे 2 ब्रेक, 1 तासाचा जेवणाचा ब्रेक, मोबाईलचा वापर करण्याची मुभा, आणि पगारी रजा या आहेत. ही युनियन सध्यातरी कुठल्याही भांडवली पक्षाच्या किंवा मालकांच्या मांडीवर जाऊन बसलेली नाहीये आणि कामगारांची एक स्वतंत्र युनियन आहे. अशी युनियनच खऱ्या अर्थाने कामगारांच्या हक्कांचे रक्षण करू शकते.

### कामगारांची परिस्थिती सगळीकडे सारखीच

वर वर्णिलेली परिस्थिती ही आज जगातल्या सगळ्या कामगारांची आहे. कामगार चळवळींच्या पिछाडीवर जाण्याचाच परिणाम आहे की 21व्या शतकातल्या कामगार चळवळीच्या मागण्या आणि 20 व्या शतकातल्या चळवळीच्या मागण्या त्याच आहेत, कारण कधीकाळी लढून मिळवलेले अधिकार पुन्हा मिळवण्यासाठी आज संघर्ष करावे लागत आहेत. दिडशे वर्षांपूर्वी "8 तास काम, 8 तास आराम आणि 8 तास मनोरंजन" या मागणीसाठी लढा उभा करून कामगारांनी आंदोलन उभे केले आणि मागणी काही प्रमाणात पदरात पाडून घेतलीही, पण आज चक्र उलटी फिरत आहेत आणि कामगारांना पुन्हा याच प्रकारच्या मागण्यांसाठी लढे उभे करावे लागत आहेत.

युनियन बनवणे ही कामगार वर्गाच्या दीर्घकालीक लढ्याची पहिली पायरी असते. अमेझॉन कामगारांच्या युनियनच्या निर्मितीने पुन्हा एकदा दाखवून दिले आहे की कामगारांची वर्गीय चेतना जिवंत असतेच. पण फक्त आर्थिक-वर्गीय मागण्यांनी क्रांतिकारी परिवर्तन होऊ शकत नाही, तर मार्क्सवादी, क्रांतिकारी वैज्ञानिक कामगार वर्गीय विचाराच्या आधारावर राज्यसत्तेच्या वर्गचरित्राच्या प्रश्नापर्यंत कामगारांची चेतना विकसित करवून आणि क्रांतिकारी आंदोलनाचा भाग बनूनच ते होऊ शकते. अमेझॉनच्या युनियनच्या एकंदरीत घडणीमध्ये योग्य मार्क्सवादी समजदारीवर आधारित नेतृत्वाचा अभाव असल्यामुळे ही युनियन सुद्धा अर्थवादाच्या घेऱ्यातच अडकून पडण्याची शक्यता मोठी आहे.

# पंजाब निवडणूक: योग्य पर्यायाच्या अभावी जनतेकडून छद्म पर्यायाची निवड

पान 4 वरून

सर्व कायद्यांना रद्द करण्यात येईल इत्यादी सरळ वर्गीय मागण्यांच्या पूर्तीचे आश्वासन दिले. आम आदमी पक्ष क्षेत्रीय आणि छोट्या मालकांच्या हितांना एकत्रित करण्याचे आणि त्यांच्या लुटीत कुठलीही बाधा येऊ नये म्हणून प्रशासकीय भ्रष्टाचारापासून मुक्त करण्याचे काम करतो. म्हणून केजरीवाल मालकांना नेहमी सांगतो की तुमची कामे करून घेण्यासाठी द्यायला लागणारी चिरीमिरी मी बंद करवेल (ह्यात तो प्रशासनाच्या तोंडावर पैसे मारून आपली कामं करून घेण्याऱ्या मालकांना बिचारे म्हणून प्रस्तुत करतो!).

### आप कॉंग्रेसचा राष्ट्रीय पर्याय आणि भाजपा चा मुख्य विरोधक?

भांडवली राजकारण जनतेसमोर खोटे पर्याय उभे करून त्यातून कोणाची तरी निवड करण्याची सक्ती करते. 'आप' विचारधारात्मकरित्या भाजपाला अत्यंत पूरक असा प्रतिक्रियावादी पक्ष आहे. भाजपच्या विचारधारात्मक हल्ल्यांचे 'आव्हान' भाजपाच्याच विचारधारात्मक मर्यादांमध्ये राहून, म्हणजे बहुसंख्यकवाद आणि राष्ट्रवादाचा वापर करून, हाताळण्याचे अत्यंत भयंकर काम 'आप' करत आहे. आप भाजपा समोर कुठल्याही निवडणुकीत राष्ट्रीय मुद्यांवर, महत्वाच्या सामाजिक-सांस्कृतिक मुद्यांवर व लोकशाही नागरी अधिकारांच्या दमनासारख्या मुद्यांवर कुठलाही विचारधारात्मक प्रतिवाद उभा करत नाही आणि करूही शकत नाही. 'आप' अशा सर्व मुद्यांवर एक तर भाजपाच्या समर्थनार्थ किंवा मौनाची भूमिका घेतो. दिल्लीत आप कडून जवळपास 6 कोटी खर्चून शासकीय दिवाळी उत्सव केला जातो आणि त्याचे प्रसारण सर्व मुख्यधारेच्या मीडियावर केले जाते, मुख्यमंत्री तीर्थ यात्रा योजना, आर्टिकल 370 आणि 35-अ हटवणे आणि काश्मीरच्या दमनाचे समर्थन, एन.आर.सी.-सी.ए.ए. विरोधी (शाहीनबाग आंदोलन हे मुख्यतः विद्यार्थी तरुण आणि महिलांचे अत्यंत शांततेने चाललेले आंदोलन होते) आंदोलन बंद करवण्यासाठी अमित शहा आणि दिल्ली पोलिसांना मीडियातून सतत आवाहन करणे, जे.एन.यू. आणि जामिया मिलिया इस्लामीया वरील हल्ले आणि दमनावर एकही शब्द न बोलणे, 2020 ची दिल्लीतील दंगल व हिंसेविरोधात कुठलीही ठोस भूमिका न घेणे, त्या दंगल प्रकरणात गोवल्या गेलेल्या उमर खालिद ह्यांच्यावरील खोट्या कारवाईला परवानगी देणे असे कित्येक मुद्दे सांगता येतील. आत्ता 'द काश्मीर फाईल्स' सिनेमावरही 'आप'ने तोंडदेखली भूमिका घेतली आहे, आणि उलट हिंदुत्ववादी प्रचाराला शरण जात काश्मिरच्या एकंदरीत मुद्यावर न बोलता, फक्त काश्मिरी पंडितांच्या पुनर्वसनाचा मुद्दा लावून धरला आहे. एकंदरीत आपकडून भाजपाच्या विरोधासाठी फक्त स्थानिक आणि प्रशासनिक मुद्दे उपस्थित केले जातात. ह्यातून राजकीय व सांस्कृतिक चर्चा व वाद-विवादांचा अवकाश आणि समाजमन अजून उजवीकडे ओढले जाते आणि हिंदुत्ववाद अजून सशक्त होतो.

केजरीवाल "मला आणि आम आदमी पक्षाला राजकारण येत नाही तर काम करायला येते" म्हणतो. आम आदमी पक्षाचे राजकारण उत्तर आधुनिकतावादाच्या काळातील उत्तर-राजकारण आणि उत्तर-विचारधारेच्या काळातील राजकारण आहे. पण ह्या उत्तर-राजकारणाचं वर्गचरित्र काय आहे? आम आदमी पक्ष भ्रष्टाचाराचा मुद्दा उचलतांना भ्रष्टाचाराची सर्व जबाबदारी सरकार, पक्ष आणि प्रशासकीय यंत्रणेवर टाकून भांडवलदार वर्गाला पापमुक्त करण्याचे काम करतो. 'आप'च्या राजकारणात भांडवलदार वर्ग शासक वर्ग नाहीये. मग शासक वर्ग कोण आहे?

पान 6 वर

# अजून किती 'अच्छे दिन' दाखवणार मोदी सरकार ?

पान 1 वरून

बसत आहे. महागाईने साहजिकच बजेट कोलमडल्यामुळे पालकांवर ताण येऊन त्याचा परिणाम पाल्यांच्या शिक्षणावरील खर्च कपातीत होतो. शहरातील झोपडपट्ट्यांमध्ये राहणाऱ्या कुटुंबांची परिस्थिती या बाबतीत प्रचंड वाईट आहे. मुलांमध्ये शाळा सोडण्याचे प्रमाण वाढते आहे. ऑनलाइन शिक्षणाची सोय न करू शकल्याने विद्यार्थ्यांचे अतोनात शैक्षणिक नुकसान झाले आहे. पेट्रोल डिझेल दरवाढीमुळे वाहतुकीचा खर्च सुद्धा प्रचंड वाढला आहे.

आज वाढलेल्या प्रचंड महागाईमागे एक सर्वात महत्वाचे तात्कालिक कारण आहे रशिया-युक्रेन मधील युद्ध.

## रशिया-युक्रेन युद्ध आणि महागाई

आज इतकी प्रचंड महागाई वाढण्याचे आणि विशेषत: पेट्रोल-डिझेल मधील दरवाढीचे एक महत्वाचे कारण आहे रशिया-युक्रेन युद्ध. रशिया जगातील महत्वाचा तेल उत्पादक देश आहे. रशिया-युक्रेन युद्धामुळे अमेरिकेने रशियन तेल खरेदी बंद केली आहे आणि रशियन तेलावर निर्बंध लादले आहेत. परिणामी 'ओपेक' या तेल निर्मात्या देशांच्या संघटनेवर दबाव आणून रशियाने तेलाचे जागतिक भाव वाढवण्याचे काम केले आहे. कच्च्या तेलाचे भाव वाढल्यामुळे स्वाभाविकपणे पेट्रोल-डिझेलचे दर सुद्धा वाढले आहेत, आणि त्यामुळे वाहतुकीचा खर्च वाढून इतर सर्व वस्तूंचे भाव सुद्धा.

युक्रेन हा जगातील सर्वात मोठा गहू उत्पादक देश आहे. त्यामुळे जगभरात गव्हाचे भाव जवळपास 30 टक्के वर गेले आहेत. भारताचे गव्हाच्या आयातीवर अवलंबित्व कमी आहे, त्यामुळे भारताची गरज जरी भारतातीलच उत्पादनामुळे पुरी होत असली, तरी भारतातील गहू व्यापाऱ्यांनी आता युक्रेनची जागा घेण्यासाठी गहू निर्यातीचा जोरदार प्रयत्न चालवला आहे. परिणामी देशांतर्गत बाजारातही गव्हाचे भाव थोडे का होईना वाढले आहेत आणि येत्या भविष्यात ते अजून वाढतील अशी चिन्हे आहेत.

याशिवाय रशिया-युक्रेन युद्धामुळे जागतिक पुरवठा साखळीवर (सप्लाय-चेन) विपरित परिणाम झाला आहे आणि अनेक मालांच्या निर्मितीसाठी लागणाऱ्या कच्च्या मालाच्या पुरवठ्यामध्ये आलेले अडथळे सुद्धा किमतींना वर नेत आहेत.

## वाढती विषमता

एका बाजूला शिक्षण, आरोग्य, रोजगार या बाबतीत विदारक परिस्थिती असताना या देशात अब्जाधीशांची संख्या 102 वरून 142 वर गेली आहे. अलीकडेच प्रसिद्ध झालेल्या 'इनईक्वालिटी किल्स इंडिया रिपोर्ट 2022' ने भारतातील भीषण विषमतेचे वास्तव समोर ठेवले आहे. सर्वात वरच्या 98 अब्जाधीशांकडे भारतातील सर्वात गरीब 55.2 कोटी लोकांएवढी संपत्ती जमा झाली आहे. याउलट 84 टक्के कुटुंबांच्या उत्पन्नामध्ये घसरण झाली आहे. ही विषमता रोज 21,000 मृत्यूंसाठी कारणीभूत ठरत आहे. महामंदीच्या काळात मार्च 2020 पासून नोव्हेंबर 2021 पर्यंत भारतातील अब्जाधीशांची संपत्ती 23.14 लाख कोटींवरून 53.16 लाख कोटी एवढी म्हणजेच दुप्पट झाली आहे, तर याच काळात 4.6 कोटी भारतीय भीषण गरिबीमध्ये ढकलले गेले आहेत. वरील आकडेवारीवरून हे अगदी स्पष्ट आहे की महागाईचे चटके कुठल्या वर्गाला बसणार आहेत. विषमतेचे कारण आहे भांडवली उत्पादन व्यवस्था जिच्यामध्ये कामगारच सर्व संपत्ती निर्माण करतात पण कामगारांना मिळते जगण्यापुरती मजुरी आणि उरलेली सर्व संपत्ती मालक नफ्याच्या रूपाने खिशात घालतात. परिणामी संपूर्ण संपत्तीचे सृजन करणाऱ्या कामगारवर्गाजवळच जगण्यासाठी खरेदी करू शकेल एवढे पैसे अनेकदा नसतात.

## महागाई म्हणजे काय, महागाई का वाढते?

फक्त वस्तूंचे भाव वाढणे म्हणजे महागाई नाही. कामगार वर्गासाठी महागाई वाढण्याचा अर्थ आहे जीवनावश्यक गोष्टींचे भाव मजुरीच्या तुलनेत जास्त वेगाने वाढणे, म्हणजे तेवढ्याच पगारात पूर्वीपेक्षा कमी माल विकत घेता येणे. मजुरी तेवढीच राहून वस्तूंचे भाव वाढले तर परिणाम तोच होतो जो मजुरी कमी झाल्यावर होतो. एका सोप्या केलेल्या उदाहरणावरून समजून घेऊ. उदाहरणार्थ समजा आज मजुरी रु. 10,000 आहे आणि दुधाचा दर रु. 50 आहे; तर उद्या मजुरी रु. 20,000 झाली आणि दुधाचा भाव रु. 50 च राहिला तर दूध तुलनेने स्वस्त आहे; तेच जर मजुरी रु. 10,000 राहिली आणि दुधाचा भाव रु. 100 झाला तर दूध महाग झाले आहे; आणि जर मजुरी व दूध दोन्ही दुप्पट झाले तर दूध तुलनेने महाग झालेले नाही. तेव्हा मजुरीच्या तुलनेत मालाचे भाव महागाई ठरवतात, ना की वस्तूंचे स्वत:हून ठरणारे भाव. या उदाहरणात फक्त दूध या एका वस्तूची किंमत मोजलेली आहे, परंतु वास्तवात जीवनावश्यक वस्तूंच्या एका समुहाला हे गणित लागू करूनच महागाईचे मोजमाप केले जाते.

मालाचे भाव वाढत असताना जीवनाचा भौतिक स्तर आहे तोच टिकवण्यासाठी मजुरी सुद्धा त्याच प्रमाणात वाढावी लागते, परंतु मालक वर्ग स्वत:हून तातडीने कधीच मजुरी वाढवत नाही. राज्यसत्तेच्या संचालनाकरिता आवश्यक असलेल्या सरकारी कर्मचारी वर्गाचे पगार हे महागाईशी सरळ जोडलेले असतात आणि महागाई भत्त्याच्या रूपाने त्यांच्या पगारातील वाढीची हमी दिली जाते. परंतु इतर सर्व कामगार वर्गाकरिता, सहसा मजुरीतील वाढ महागाईच्या मागेच रेंगाळते व परिणामी बराच काळ कामगार वर्गाचा जीवनाचा स्तर अधिक घसरलेला राहतो. मजुरीतील वाढ ही बाजाराच्या कारकांसहित, कामगार वर्ग आणि भांडवलदार वर्ग यांच्यातील वर्ग संघर्षातून ठरते.

मार्क्सवादी राजकीय अर्थशास्त्रानुसार कोणत्याही वस्तूची, दैनंदिन जीवनात अनुभवाला येते ती बाजारातील किंमत ही तिच्या मूल्याभोवती फिरते. एखाद्या वस्तूचे मूल्य म्हणजे तिच्या उत्पादनाकरिता लागलेले सामाजिकदृष्ट्या आवश्यक अमूर्त श्रम. हे मूल्य जेव्हा चलनाच्या मूल्याच्या रूपात सांगितले जाते, तेव्हा ती असते वस्तूची किंमत. बाजारातील किंमत वस्तूच्या मूल्यरूपी किमतीभोवती खालीवर होत असते. बाजारातील किमतीला प्रभावित करणारे अनेक घटक आहेत, उदाहरणार्थ, मागणी, पुरवठा, सरकारी नियंत्रण, मक्तेदारी, इत्यादी. जर एखाद्या मालाची बाजारातील किंमत त्याच्या मूल्यापेक्षा खूपच जास्त वर जात असेल तर तो माल ग्राहकांसाठी सहसा अप्रचलित होण्याकडे जातो. भांडवलशाहीत इतर सर्व मालांप्रमाणे कामगारांची श्रमशक्ती सुद्धा बाजारात खरेदी-विक्रीसाठी उपलब्ध असते, म्हणजेच ती सुद्धा एक माल असते. त्यामुळे मजुरीला सुद्धा किमतीचा तोच नियम लागू होतो, जो इतर मालांना लागू होतो. त्यामुळे कामगारांना मिळणारी मजुरी म्हणजे त्यांच्या श्रमशक्तीचे मूल्य होय. श्रमशक्तीचे मूल्य म्हणजे कामगारांच्या श्रमशक्तीच्या पुनर्निर्मितीसाठी, म्हणजेच कामगारांचे जीवन किमान स्तरावर चालत रहावे याकरिता, लागणारे सामाजिक दृष्ट्या आवश्यक श्रम. कामगारांची मजुरी सुद्धा मागणी, पुरवठा, कामगारांचा वर्गसंघर्ष इत्यादी कारणांमुळे तिच्या मूल्याच्या भोवती खाली-वर होत राहते. थोडक्यात सांगायचे तर कामगारांचे व त्यांच्या कुटुंबाचे जीवन चालू रहावे याकरिता आवश्यक असलेल्या, म्हणजेच जीवनावश्यक मालांची (ज्यांना 'व्हेज गुड्स' असेही म्हटले जाते) किंमत हा मजुरीच्या आधारभूत किमतीचा निकष मानला जातो.

भांडवली उत्पादन व्यवस्थेमध्ये भांडवलदार वर्गाकडून स्पर्धेत टिकून राहण्यासाठी सतत यांत्रिकीकरण, नवनवीन शोध, स्वयंचलन (ऑटोमेशन) याद्वारे उत्पादनाचा दर वाढवण्याचा प्रयत्न केला जातो. परिणामी प्रति एकक मालाच्या निर्मितीसाठी लागणारा वेळ कमी होत जातो आणि त्याचे मूल्य घसरत जाते. थोडक्यात भांडवली उत्पादन व्यवस्थेची गती ही मालाचे मूल्य, आणि त्यामुळेच त्याची बाजारातील किंमतही कमी करण्याकडेच असते. उदाहरणार्थ, तुम्ही पाहू शकता की बिस्किटाच्या पुड्यासारख्या वस्तूची किंमत आज रु. 5 आहे किंवा पेनाची किंमत रु. 10 आहे कारण 100 वर्षांपूर्वीच्या तुलनेत आज यांत्रिकीकरणामुळे त्यांना बनवण्याकरिता लागलेले मानवी श्रम फार कमी आहे. मजुरीलाही हाच नियम लागू होतो. दीर्घ काळात मजुरी ठरवणाऱ्या 'व्हेज गुड्स' मध्ये मोजल्या जाणाऱ्या मालांचे मूल्य, व त्यामुळेच त्यांच्या बाजारातील किमती सुद्धा घसरण्याकडेच जातात, म्हणजेच श्रमशक्तीचे मुल्य सुद्धा कमी होण्याकडेच जाते. भाव सर्वच वस्तूंचे खाली वर होत राहतात, परंतु चैनीच्या गोष्टींच्या भावांपेक्षा कामगार वर्गाकरिता जीवनावश्यक वस्तूंचे भावच महागाई ठरवण्यात निर्णायक भुमिका निभावतात.

बाजाराच्या अर्थव्यवस्थेतील विविध कारणांच्या चढउतारांमुळे जीवनावश्यक वस्तूंच्या किमती जर मजुरीपेक्षा वेगाने वाढत असतील तर महागाईचा फटका कामगार वर्गाला बसतो. उदाहरणार्थ एखाद्या वस्तूचा पुरवठा जर कमी उत्पादन, दुष्काळ, दळणवळणातील अडचणी, आंतरराष्ट्रीय संबंध बिघडणे, युद्ध, अपघात, काळाबाजार, जमाखोरी अशा कारणांमुळे तुलनेने कमी झाला तर बाजारातील भाव वाढतात; जर एखाद्या वस्तूचा पुरवठा देशांतर्गत जास्त-उत्पादन, आयात, सरकारी साठे खुले होणे, इत्यादींमुळे वाढला तर भाव कमी होतात.

अशामध्ये अनेक मालांची रुपयातील किंमत सतत वाढताना दिसते (उदाहरणार्थ मजुरी पूर्वी रु. 12,000 होती आणि आज रु.15,000 झाली आहे, दूध पूर्वी रु. 50 प्रति लिटर होते आणि आज रु. 60 झाले आहे, इत्यादी) ही बाब विरोधाभासी वाटू शकते. यामध्ये हे समजले पाहिजे की इतर मालांप्रमाणे चलन सुद्धा एक माल असते आणि चलनाचा (नोटा, नाणी, इत्यादी) पुरवठा सुद्धा कमी जास्त होत असतो (सहसा तो वाढतच असतो). चलनाचा पुरवठा अंतिमत: अर्थव्यवस्थेमध्ये किती देवाणघेवाण होत आहे यावरून ठरतो. जर एकदंरीत सर्व मालांच्या तुलनेत चलन पुरवठा जास्त असेल तर मालाची रुपयात मोजलेली किंमत वाढत जाते. त्याचवेळी जर मजुरी सुद्धा तेवढीच किंवा जास्त वाढत असेल तर वस्तूंचे भाव वाढूनही महागाई वाढलेली अनुभवास येत नाही. थोडक्यात जीवनावश्यक मालांचे मूल्य कमी होण्याची प्रवृत्ती असतानाही रुपयात मोजलेली त्याची किंमत मागणी-पुरवठा, सरकारी नियंत्रण, मक्तेदारी, रुपयाचा पुरवठा, इत्यादी कारणांमुळे वाढती दिसू शकते आणि तरीही महागाई वाढत आहे असे तेव्हाच म्हटले जाऊ शकते, जेव्हा मजुरीच्या तुलनेत ही किंमत जास्त वाढत असते. पण मजुरीतील वाढ ही सहसा मालांच्या बाजारातील किमतीच्या मागेच रेंगाळत असते कारण मालक वर्ग स्वत:हून मजुरी वाढवण्यास उत्सुक नसतोच, आणि त्यामुळे महागाई ही कामगार वर्गाकरिता सर्वसामान्य अनुभवाची एक बाब बनते.

त्यामुळेच बाजाराची अर्थव्यवस्था, माल खरेदी-विक्रीची व्यवस्था, म्हणजेच भांडवली उत्पादन व्यवस्था नष्ट केल्याशिवाय महागाईच्या संकटापासून कोणतीही निर्णायक सुटका शक्य नाही. समाजवादी व्यवस्था, उत्पादित वस्तूंना खरेदी-विक्रीची गोष्ट राहू न देता, म्हणजेच 'माल' म्हणून राहू न देता, जनतेच्या गरजा भागवणाऱ्या उपयुक्त वस्तूंच्या रूपात उत्पादित व वितरित करत जाते. त्यामुळेच महागाई विरोधातील लढा हा समाजवादी समाजनिर्मितीच्या लढ्याचाच एक भाग आहे.

# पंजाब निवडणूक: योग्य पर्यायाच्या अभावी जनतेकडून छद्म पर्यायाची निवड

पान 5 वरून

तर एक भ्रष्ट राजकीय व नोकरशाह वर्ग आहे जो कुठल्याही वर्गाचे प्रतिनिधित्व करत नसून फक्त स्वतःच्या सेवेत मग्न आहे. भांडवलदार वर्ग आणि कामगार एकमेकांचे विरोधी किंवा शत्रूतापूर्ण वर्ग नसून हे दोन्ही वर्ग पीडित वर्ग आहेत; वरती उल्लेख केलेल्या भ्रष्टाचाऱ्यांकडून पीडित. सोबत स्वतःची एक आदर्शवादी प्रतिमा निर्मित करून त्यासोबत भ्रष्टाचार-विरोध आणि अंधराष्ट्रवाद आणि बहुसंख्यावादाचे मिश्रण केले जाते. आम आदमी पक्षाचे राजकारण वास्तविकरित्या देशातील कामकरी जनतेच्या जीवनाच्या समस्यांच्या खऱ्या कारणांना लपवण्याचे काम आहे. त्यासाठी भ्रष्टाचार विरोध, देश-सेवेचा उपकरण म्हणून उपयोग करून उजवे प्रतिक्रियावादी राजकारण केले जाते.

फॅसिस्ट संकटाच्या ह्या काळात सामान्य जनतेने अशा छद्मी पर्यायाला न भुलता योग्य कामगार वर्गीय विचारधारेच्या आधारावर कामगार वर्गीय पक्ष बांधणीच्या कामाला तातडीने समोर घेऊन जाणे गरजेचे आहे. 'आप' च्या प्रतिक्रियावादी प्रतिकवादातुन भगतसिंहाला मुक्त करून भगतसिंहाचा खरा वारसा समोर घेऊन जात भगतसिंहाने म्हटल्याप्रमाणे "कष्टकरी वर्गाच्या सर्व आशा आता समाजवादावर केंद्रीत झाल्या आहेत. त्यातूनच संपूर्ण स्वातंत्र्य मिळवण्याच्या, सर्व भेदभाव व विशेषाधिकार नष्ट करण्याच्या दिशेने यशस्वी वाटचाल करता येणार आहे". ह्या उद्दिष्टासाठी कामकरी जनतेने कंबर कसणे व कामगार वर्गीय पक्ष उभा करणे गरजेचे आहे व त्यात समोर जाण्यासाठी परत भगतसिंह म्हणतो त्याप्रमाणे *"पक्षाला पद्धतशीरपणे पुढे जाण्यासाठी सर्वात जास्त जर कशाची गरज असेल तर सुस्पष्ट विचार, प्रत्यक्ष परिस्थितीचे आकलन व पुढाकार घेऊन त्वरित निर्णय घेण्याची क्षमता असलेल्या कार्यकर्त्यांची"*.

# सी.यु.सी.ई.टी.: उच्च शिक्षणाला गरीबांपासून वंचित करण्याचे अजून एक पाऊल!

✎ अभय

सी.यु.सी.ई.टी. म्हणजेच सेंट्रल युनिव्हर्सिटी कॉमन एंट्रन्स टेस्ट (Central University Common Entrance Test) शैक्षणिक वर्ष 2022-2023 साठी घेण्यात येईल असे या वर्षी मार्च महिन्यात जाहीर झाले आणि आता तर 2 एप्रिल 2022 पासून यु.जी.सी. ने त्याची नोंदणी प्रक्रिया देखील सुरू केलेली आहे. सी.यु.सी.ई.टी. अंतर्गत आता पंचेचाळीस केंद्रिय विद्यापीठांत पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी 12वी च्या बोर्ड परीक्षेचा निकाल ग्राह्य धरल्या जाणार नसून, आता या 45 विद्यापीठांसाठी नवीन सी.यु.सी.ई.टी. चा निकाल हा प्रवेशाचा निकष असेल. अद्याप अशी परीक्षा पदव्युत्तर प्रवेशाला लागू नसली तरीही ती लवकरच होईल याची दाट शक्यता आहेच. सी.यु.सी.ई.टी. ची परीक्षा राज्य विद्यापीठांना बंधनकारक नसली तरी सी.यु.सी.ई.टी. मार्फत प्रवेशप्रक्रिया ते देखील त्यांच्या मर्जीने राबवू शकतात. या परीक्षेची संपूर्ण प्रक्रिया एन.टी.ए.(National Testing Agency) म्हणजे राष्ट्रीय चाचणी संस्थेमार्फत राबवली जाईल.

सी.यु.सी.ई.टी. परीक्षेचा अभ्यासक्रम बारावीपर्यंतच्या एन.सी.ई.आर.टी. पुस्तकांवर आधारलेला असेल. या परिक्षेतून विद्यार्थ्यांच्या भाषेच्या अभ्यासाचं, ज्या विषयात त्यांना पुढील शिक्षण घ्यायचे आहे त्याच्या पायाभूत संकल्पनांची विद्यार्थ्यांना किती माहिती आहे याचं, आणि जर शिक्षण संस्थेची मागणी असेल तर विद्यार्थ्यांच्या सामान्य ज्ञान - बौद्धिक आकलन क्षमतांचं आकलन केलं जाईल. जे विद्यार्थी राज्यांमधील बोर्डांमध्ये शिकलेले आहेत, त्यांना एन.सी.ई.आर.टी. चा अभ्यासक्रम अवघड जातो हे तर सर्वज्ञात आहे. दुसरीकडे एन.सी.ई.आर.टी. चा अभ्यासक्रम शिकवणाऱ्या शाळा या इतर राज्यांमधील गरीब, कामगार-कष्टकरी वर्गातून येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आवाक्याबाहेर असतात. तेव्हा एन.सी.ई.आर. टी अभ्यासक्रमावर आधारित परिक्षा फक्त उच्चभ्रू वर्गातील विद्यार्थ्यांचे हित साधतात.

अशा स्वरूपाच्या अनेक परीक्षा यापूर्वी देखील अस्तित्वात होत्या, पण त्या प्रत्येक संस्थेच्या/विद्यापीठाच्या/महाविद्यालयाच्या आपापल्या पातळीवर चालवल्या जात होत्या, त्या प्रत्येक जागी प्रत्येक शैक्षणिक संस्थेच्या आपापल्या गरजेनुसार ठरत होत्या. आता भारतात केंद्रीय पातळीवर पहिल्यांदाच समान अशी प्रवेश परीक्षा एकीकृत पद्धतीने विभिन्न अभ्यासक्रमांसाठी आणि विविध विद्यापीठांसाठी होऊ घातलेली आहे. अनेक परिक्षा स्वत:हूनच प्रवेशामध्ये एक मोठी धोंड होत्या, परंतु एक परिक्षा झाल्यामुळे यात मोठा फरक पडणार नाहीये. परीक्षा मार्च मध्ये जाहीर झाली आहे, एप्रिल चा पूर्ण महिना नोंदणी साठी खुला आहे आणि जुलै 2022 मध्ये परीक्षा होणार आहेत. या परिक्षेमुळे कामगार-कष्टकरी वर्गातून येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाची पायरी चढणे अधिकच कठीण होणार आहे. कसे, ते पुढे पाहुयात.

मोदी सरकारने 2020 मध्ये लोकशाही प्रक्रियेला कचऱ्याची पेटी दाखवत नवीन 'राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020' लागू करवून घेतले. त्या धोरणानुसारच 2020 पासून पुढील सर्व शिक्षणासंदर्भातले निर्णय घेतले जात आहेत, ज्यांचा उद्देश आहे शिक्षणाचे नफ्यासाठी खासगीकरण आणि भारतीय भांडवलशाहीसाठी गरजेचे कुशल श्रमिक तयार करणे; वेगळ्या शब्दात सांगायचे झाले तर एन.ई.पी. 2020 च्या उगमस्थानातून जन्म घेणाऱ्या अनेक नद्या वाहत आहेत, काही छोट्या काही मोठ्या, परंतु त्या सर्वांना शेवटी जाऊन तो भारतीय भांडवलशाहीचाच समुद्र तुडुंब भरायचाय; या नद्यांच्या प्रवाहाची दिशा विद्यार्थ्यांच्या हिताच्या अगदी विपरीत आहे, त्या नद्यांचं मूळ चरित्रच असं असल्या कारणाने त्यातून इतर काही होऊही शकत नाही; या नद्या-उपनद्या म्हणजे एन.ई.पी. 2020 च्या आधारावर घेतलेले विविध निर्णय. एन.ई.पी. 2020 च्या पोटातून उगम पावलेली अशीच एक उपनदी म्हणजे सी.यु.सी.ई.टी. चा घातलेला हा घाट. खूप मोठी जरी नसली तरी या सी.यु.सी.ई.टी. नामक उपनदीचा रेटा देखील एकूण त्याच दिशेने आहे, ज्या दिशेने येत्या काळातील आणखी कित्येक निर्णय घेतले जाणार आहेत: संपूर्ण शिक्षण क्षेत्राला देशी-विदेशी भांडवलाच्या लुटीसाठी खुले करणे व त्याला भांडवलाच्या हितांसाठी सडवणे हीच ती दिशा आहे. या महापुरात व्यापकरित्या विद्यार्थ्यांचे, शिकू इच्छिणाऱ्यांचे हित बुडणार हे निश्चित आहे. 1986 च्या शिक्षण धोरणापासून सुरू झालेली नव-उदारवादी शिक्षण धोरणांची गंगा आज मोदी सरकारच्या काळात आणलेल्या एन.ई.पी. 2020 मुळे फोफावली तिला यामुळे अजून वेग मिळाला आणि कधी उच्च शिक्षण निधीपुरवठा संस्था(एच. ई. एफ. ए., HEFA), कधी राष्ट्रीय परिक्षा संस्था (एन. टी.ए., NTA) तर कधी या छोट्या सी.यु. सी.ई.टी.च्या मार्गाने आता शिक्षणाला गिळंकृत करण्यासाठी ती प्रलयंकारी वेगाने वाहत आहे.

खाउजा धोरणांच्या सुरुवातीनंतरच देशात उच्च शिक्षणासाठी स्पर्धात्मक प्रवेश परिक्षांचे पेव आले आहे. एकूणच जागतिकीकरण-उदारीकरण-खासगीकरण यांचे भारतातील आगमन बऱ्याच पद्धतीने भारताला आणि भारताच्या भांडवली व्यवस्थेला बदलत होते. मग त्याचा शिक्षण व्यवस्थेवर परिणाम होणे साहजिकच होते. भारतातील शिक्षण व्यवस्था जशी खासगी होऊ लागली तशी विविध अभ्यासक्रमांसाठी प्रवेश परीक्षा सुरु करणे भांडवलशाहीची गरज बनली. याचे कारण, प्रत्येक उद्योगक्षेत्राच्या आणि बाजाराच्या गरजेनुसार विविध प्रकारचे कामगार तयार करणाऱ्या अभ्यासक्रमांच्या जागा मर्यादित ठेवायच्या होत्या, सरकारी अनुदान संपवत विद्यार्थ्यांकडून फी वसूल करण्याचे तत्व लागू करत त्या जागांच्या फी वाढवायच्या होत्या. यानुसार अभियांत्रिकी, पाठोपाठ वैद्यकीय, मग व्यवस्थापन अशा अभ्यासक्रमांना प्रवेश परिक्षा लागू झाल्यानंतर प्रत्येक विद्यापीठाच्या स्वतंत्र प्रवेश परिक्षा, नंतर डी.एड.-बी.एड. च्या परिक्षा, वकिल झाल्यानंतरही पात्रता परिक्षा, नेट, सेट, आणि अश्या तमाम उच्चशिक्षण पदव्यांना प्रवेश घेण्यासाठी किंवा पदवी मिळाल्यावरही पात्रता सिद्ध करण्यासाठी स्पर्धा परीक्षा सुरु करून उच्चशिक्षणापर्यंत आणि त्यानंतर नोकरीच्या बाजारात पोहोचण्याच्या रस्त्यात भिंती उभारल्या गेल्या. बरीच वर्षे विविध विद्यापीठांच्या स्वतंत्र प्रवेश परीक्षा होत्या, सी.यु.सी.ई.टी. या सर्व विविध परीक्षांच्या ऐवजी केंद्रीकृत आणि एकीकृत परीक्षा, आणखी व्यवस्थात्मक आणि संस्थात्मक पद्धतीने राबवेल. एकच परिक्षा सोयीची जरी वाटत असली तरी प्रवेश परीक्षांच्या कोचिंग क्लासेसच्या बाजाराला प्रचंड वाव देणारे हे पाऊल ठरणार आहे. थोडक्यात प्रवेश परीक्षांच्या भिंतींना उंच करणारे हे पाऊल ठरेल.

आता सी.यु.सी.ई.टी. सुरु केल्याने आधीच ढिगाने असलेल्या स्पर्धा परीक्षांमध्ये आणखी एका परीक्षेची भर पडली. या स्पर्धा परीक्षेमुळे, आणि अश्या परीक्षांसाठी करावयाच्या तयारीमुळे भांडवली समाजातील स्पर्धेची मानसिकता विद्यार्थ्यांमध्ये खोलवर रुजत जाते. नको त्या अडचणींना, गोंधळाला आणि समस्यांना जन्म देणाऱ्या परिक्षा विद्यार्थ्यांसाठी मनस्तापच ठरतात. अशा परीक्षा विद्यार्थ्यांमध्ये दुसऱ्यापेक्षा वरचढ होणे, दुसऱ्याला मागे टाकणे, दुसऱ्याला हरवून फक्त स्वतःच्याच हितांसाठी आणि प्रगतीसाठी काम करणे हे मूलमंत्र म्हणून सतत बिंबवतात, आणि बऱ्याच विद्यार्थ्यांना असा विश्वास प्रदान करतात की हाच तर असतो नैसर्गिक मानवी स्वभाव, हीच तर आहेत संपूर्ण मानवी इतिहासाच्या धड्यांमधून घेता येऊ शकणारी जगण्याची आधारभूत सूत्रं! माणसाला विद्यार्थी दशेतच माणूस नव्हे गिधाड बनण्यासाठी धक्का देण्यात अशा स्पर्धा परीक्षा देखील हातभार लावतातच की!

आतापर्यंत बोर्डाच्या परीक्षेच्या तयारीचा ताण विद्यार्थ्यांवर कमीच पडत होता जणू, की आता त्यात सी.यु.सी.ई.टी. च्या तयारीचा ताण भर देण्यास पुढे येणार आहे. ही स्पर्धा परीक्षांची तयारी आणि त्यातून त्याचा जो बाजार मांडला जातो यातून एक वेगळंच जंजाळ विणलं जातं. यु.जी.सी. चेयरमन जगदीश कुमार जरी म्हणाले असतील, "या (सी.यु.सी.ई.टी.) परीक्षेसाठी कोणत्याही खास प्रशिक्षणाची गरज नाही कारण यातील सर्वच प्रश्न हे एन.सी.ई.आर.टी. अभ्यासक्रमातून घेतले जाणार आहेत" आणि या त्यांच्या म्हणण्याला सिद्ध करण्याकरिता आकड्यांचा आणि आश्वासनांचा ताळेबंद मांडू पाहत असतील तरीही आपण हे लक्षात ठेवणे गरजेचे आहे की इकडे सी.यु.सी.ई.टी. ची घोषणा झाली नाही रे झाली, तिकडे खासगी ऑनलाईन प्रशिक्षण केंद्राकडून या परीक्षेचे खास कोर्सेच जाहीर केले गेले; या पाठोपाठ सी.यु.सी.ई.टी. साठी बाजारात पुस्तके विक्रीस उपलब्ध होण्याच्या मार्गावर आहेतच.

शेवटी साधले काय? नफाकेंद्रित व्यवस्थेतील प्रत्येक निर्णय हा निर्विवादपणे बाजाराच्या गरजांना, नफ्याला, केंद्रस्थानी ठेऊनच घेतला जातो. विद्यार्थ्यांच्या खिशातून जमेल तितका जास्तीत-जास्त पैसा उकळून तो नफेखोरांच्या घशात ओतायला आता आणखी एक निमित्त सी.यु.सी.ई.टी. मुळे बाजारात आलेले आहे. ज्या परीक्षेच्या तयारीसाठी पैशाची उधळपट्टी अनिवार्य बनते अशा परीक्षांची दारं ज्यांच्याकडे पैसे नसतात त्यांच्यासाठी पुढे कमी जास्त प्रमाणात बंद होतातच.

परीक्षांचं आणि त्या पेक्षा मोठं दडपण परीक्षेच्या निकालाकडून असलेल्या अपेक्षांचं (संपूर्ण सामाजिक वर्तुळाच्या अपेक्षा) एक ओझं विद्यार्थी त्याच्या पाठीवर कायम वागवत असतोच. तयारीचा ताण, परीक्षेचा दबाव, निकालाचं आणि अपेक्षांचं दडपण आणि पुढील आयुष्याची भीती, या सगळ्याचा गाडा सगळेच विद्यार्थी ओढू शकतील असं शक्य नाही. जे पुढे ओढू शकत नाहीत ते त्या गाड्याला ओढण्याची प्रक्रिया संपवतात आणि त्यातील काही स्वतःलाच. अपयशाच्या भयाने ग्रस्त किंवा सातत्याने स्पर्धा परीक्षांमध्ये अपयशच मिळवणारे विद्यार्थी कधी नैराश्याच्या खोल अंधार दरीत कोसळतात याचा त्यांनाही सुगावा लागत नाही. स्पर्धा परीक्षांचे एकूण सर्वच पडसाद बीभत्स भयंकर असतात. सी.यु.सी.ई.टी. या स्पर्धा परीक्षेचं गाऱ्हाणं काय वेगळं असणार आहे? कमी जास्त प्रमाणात तेच बीभत्स भयंकर कथानक.

स्पर्धा परीक्षा पावलोपावली शिक्षण व्यवस्थेत लागू केल्या जातात यामागे एक महत्वाचे कारण स्पष्टच आहे; या भांडवली व्यवस्थेला सर्वांना शिक्षण देण्यात कसलाही रस नाही, दर्जेदार शिक्षण देखील ती सर्वच विद्यार्थ्यांना देते असे नाही; आधी शिक्षण तुम्हाला मिळेल की नाही याचा निर्णय, मग ते शिक्षण काय असेल याचा निर्णय आणि मग त्या शिक्षणाच्या दर्जाच्या उतरंडीत तुम्ही कुठे असाल याचा निर्णय भांडवली व्यवस्थेच्या संचालनाच्या दृष्टीनेच घेतले जातात. किती विद्यार्थ्यांना कोणते आणि कोणत्या दर्जाचे शिक्षण द्यावे याचा निर्णय तर भांडवली बाजारी व्यवस्थेच्या हितांना डोळ्यासमोर ठेवूनच, कोणत्या प्रकारच्या किती कामगारांची गरज आहे हे ध्यानात ठेवूनच घेतला जातो, पण प्रवेश न मिळाल्याचे खापर मात्र विद्यार्थ्यांच्याच डोक्यावर ही व्यवस्था फोडते. ते खापर फोडण्यासाठीचा कांगावा म्हणजे विद्यार्थीच गुणवंत नाहीत, विद्यार्थीच नालायक आहेत, हा तर्क; आणि हा तर्क सिद्ध करण्यासाठी वापरली जाते ती स्पर्धेवर आधारित प्रवेश परीक्षा. अर्थात प्रवेश परीक्षेमुळे उपस्थित सर्व समस्यांसाठी देखील तुम्ही विद्यार्थीच जबाबदार, परीक्षेच्या तयारीसाठी अपुरी संधी आणि संसाधनं न मिळाल्या बद्दलही तुम्हीच जबाबदार, प्रवेश परीक्षेसाठी अपात्र असाल तरी तुम्ही जबाबदार आणि नापास झालात तरीही तुम्हीच जबाबदार, दर्जेदार शिक्षण संस्थेत प्रवेश मिळण्या इतके गुण नाही मिळाले तरी तुम्ही विद्यार्थीच जबाबदार आणि गुण मिळूनही जर फी भरू शकला नाहीत तरी तुम्ही विद्यार्थीच जबाबदार, हेच तर ही नफेखोर व्यवस्था आपल्याला सांगू इच्छिते! यात कुठेही सर्वांना शिक्षण देण्यामधली अक्षमता, मोफत शिक्षण देऊ न शकण्याची अक्षमता आणि सर्वांनाच उन्नत दर्जाचे शिक्षण न देऊ शकण्याची अक्षमता, हे मुद्दे भांडवलशाही उपस्थित होऊ देत नाही.

आपण श्रमिकांनी, न्यायप्रिय जनतेने आणि क्रांतिकारी विद्यार्थी युवकांनी विचार केला पाहिजे की आज भारतात, 1976 पूर्वी जसे चीन मध्ये आणि 1960 पूर्वी सोविएत युनियन मध्ये झाले तसे शिक्षणातील प्रयोग आपल्या देशात आज का होऊ शकत नाहीत? शिकण्यास इच्छूक असलेल्या प्रत्येकासाठी मोफत आणि दर्जेदार शिक्षणाची पूर्ण संधी अटी शर्तींशिवाय चीन आणि सोविएत युनियन देऊ शकले तर भारतामध्ये तसे शिक्षण सर्वांना मिळण्यात काय अडथळे आहेत? असे शिक्षण आजच्या भारतात का नाही दिले जाऊ शकत? भारतासारख्या संपन्न देशामध्ये सर्वांना समान आणि मोफत शिक्षण सहजसाध्य आहे, अडथळा आहे ती फक्त बाजाराची अर्थव्यवस्था!

# सोनी सोरी - 11 वर्षाच्या संघर्षाने उघड केला सत्तेच्या दमनाचा क्रूर चेहरा

✎ बबन

15 मार्च 2022 रोजी दंतेवाडा मधील एनआयए विशेष न्यायालयाने आदिवासी अधिकारांसाठी लढणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्या सोनी सोरी यांची पोलिसांकडून लावण्यात आलेल्या खोट्या आरोपातून निर्दोष मुक्तता केली आहे. न्यायालयाने आपल्या आदेशात स्पष्ट केले आहे कि, “सोनी सोरी यांच्यावर लावलेले आरोप पोलीस सिद्ध करू शकले नाहीत. पोलिसांकडून देण्यात आलेल्या पुराव्यात विरोधाभास आहेत. त्यात सुसंगती दिसत नाही. ठोस पुराव्याच्या अभावी न्यायालय सोनी सोरी यांना सर्व आरोपातून निर्दोष मुक्त करत आहे.” सोनी सोरी यांनी संबंधित विशेष न्यायाधीश विनोद कुमार देवांगण यांना एक मार्मिक प्रश्न विचारला, “काय तुम्ही मला माझी 11 वर्ष परत करू शकता का?”

9 सप्टेंबर 2011 रोजी पोलिसांनी सोनी सोरी व लिंगाराम कोडोपी यांच्यावर एस्सार कंपनीकडून 15 लाख खंडणी घेऊन नक्षलवाद्यांना पोहचवित असल्याचा आरोप लावत दुसऱ्या दिवशी लिंगाराम कोडोपी यांना अटक केली होती. पोलिसांकडून खोट्या गुन्ह्यात अटक होण्याच्या भीतीने जीव वाचविण्यासाठी धडपडत असलेल्या सोनी सोरी ह्या बदेबिडमा येथे 11 सप्टेंबर रोजी पोहचल्या. तेव्हा वर्तमानपत्रामधून खंडणी वसुलीचे आरोप पोलिसांनी लावले असल्याचे कळाले. एकीकडे पोलीस आणि दुसरीकडे आपल्या नावावर सोनी सोरी खंडणी वसूल करत आहे अशी धारणा असलेल्या नक्षलवाद्यांनी तिचा शोध घ्यायला सुरुवात केली. अशा कठीण वेळी सोनी सोरी पोलिसांच्या नजरा चुकवत आणि आपला जीव वाचवत अगोदर सुकामा आणि नंतर उडीसातील मलकानगिरी वरून विशाखापट्टणम आणि तिथून दिल्लीला पोहचल्या. तिथे काही मानवाधिकार कार्यकर्त्यांच्या मदतीने जामीनासाठी प्रयत्न करत असतांना 4 आक्टोंबर रोजी छत्तीसगड पोलिसांनी दिल्ली पोलिसांच्या मदतीने त्यांना अटक करून तुरुंगात टाकले. त्यानंतर दिल्लीतील साकेत न्यायालयाने सोनी सोरी यांची तिहार तुरुंगात रवानगी केली. पुढे छत्तीसगड पोलिसांनी त्यांचा ताबा घेऊन दांतेवाडा तुरुंगात आणले. त्यांच्यावर दबाव टाकण्यात येत होता कि, ‘हिमांशू कुमार, मेधा पाटकर, स्वामी अग्निवेश, प्रशांत भूषण आणि कविता श्रीवास्तव सर्व लोक हे शहरी नक्षलवादी आहेत. अशा आशयाच्या कागदपत्रावर हस्ताक्षर करावे.’ अशा खोट्या बाबी असलेल्या कागदपत्रांवर सोनी यांनी हस्ताक्षर करण्यास मनाई केल्यावर पोलिसांनी त्यांना छळायला सुरुवात केली होती. त्यानंतर 8 आणि 9 आक्टोंबर रोजी न्यायालयात संबंधित आरोपाविषयी चौकशी करण्यात आली. या दरम्यान सोनी सोरी यांची तब्येत खालावल्याचे दिसून आले. त्यातच सोनी सोरी यांनी तुरुंगात पोलिसांकडून लैंगिक छळ झाल्याचा आरोप करत हकीकत सांगितली की त्यांचा छळ करताना त्यांना कपडे काढून उभे करणे, विजेचे शॉक देणे, घाणेरड्या शिव्या देणे, पुरुष पोलिसांनी हे सर्व करत असताना छातीवर मारणे, इतकेच नाही तर गुप्तांगात दगड भरण्याचे अमानुष प्रकारही केले गेले! न्यायालयाकडून वैद्यकीय तपासणीचे आदेश दिल्यावर कोलकत्ता मेडिकल कॉलेज मध्ये तपासणी अहवालात सोनी सोरी यांच्या गुप्तांगातून तीन दगड निघाले ज्यामुळे त्यांना चालण्यास देखील त्रास होत होता, तब्येत खालावली होती. या आरोपाची न्यायालयाने पुष्टी करत वैद्यकीय अहवाल पाहून लैंगिक छळ झाल्याचे मान्य केले. या नंतर सोनी सोरी यांना रायपुर येथील तुरुंगात एक वर्ष आणि जगदलपुर येथील तुरुंगात दीड वर्ष कारावासात यातना भोगाव्या लागल्या.

रायपुर येथील तुरुंगातील अनुभव सांगतांना सोनी सोरी सांगतात कि, “मला वारंवार लैंगिक छळवणुकीला सामोरे जावे लागत असे. न्यायालयातील प्रत्यक तारखेच्या अगोदर पोलिसांकडून माझे कपडे काढून मला तासनतास बसून ठेवले जात असे... त्यामागे पोलिसांचा हेतू होता कि मला अपमानित करून माझ्या आत्मसन्मानाला ठेचून, माझा मानसिक छळ करून मला वेडं केल जाव!... एकदा तर मी न्यायालयात जातांना देखील कपडे घालणार नाही, अशीच न्यायालयात येणार आहे, असे सांगितले तेव्हा कुठे पोलिसांनी माझे कपडे काढणे बंद केले.” त्या वेळेस रायपुर जेलच्या जेलर वर्षा डोंगरे सोनी सोरी यांना संबोधून बोलल्या की “ही तर वेश्या आहे. कपडे काढून न्यायालयात जायला देखील कमी करणार नाही. महिला असण्यावर ही एक प्रकारे कलंक आहे.” वरील प्रकरणात आरोप सिद्ध होऊन देखील पोलीस अधीक्षक अंकित गर्ग यांच्यावर कोणतीच कारवाई झाली नाही. उलटपक्षी काही दिवसांनीच चांगल्या कामगिरी बद्दल अंकित गर्ग यांना राष्ट्रपती पुरस्कार आणि नोकरीत पदोन्नती देत सम्मानित करण्यात आले. तर सोनी सोरी यांना तुरुंगातील प्रचंड यातनांना तोंड देत अडीच वर्षे तुरुंगवास भोगावा लागला.

सोनी सोरींचे वडील आणि कुटूंब काँग्रेस सोबत राजकारण करत आले होते आणि वडिलांनी नक्षलवाद्यांविरोधात खबरी म्हणून काम केले होते. आदिवासी कुटूंबातून येऊन शिक्षिका झालेल्या, आणि आदिवासींवर होणाऱ्या अत्याचारांना विरोध करणाऱ्या सोनी सोरींच्या राज्यसत्तेद्वारे छळवणुकीची कहाणी बऱ्याच अगोदर चालू होते.

2009 मध्ये पोलिसांनी सर्वात अगोदर नक्षलवाद्यांच्या विरोधात खबरी म्हणून काम करावे यासाठी सोनी सोरी व भाचा लिंगाराम कोडोपी यांना त्रास द्यायला सुरुवात केली. या कामाला नकार दिल्यानंतर पोलिसांनी लिंगाराम कोडोपी यांना बेकायदेशीर अटक करून दीड महिन्यापर्यंत छळले होते. या दरम्यान लिंगाराम यांना तुरुंगातील शौचालयात बंद केले जात असे. शौचालयात वापरण्यात येणाऱ्या मगामध्ये पिण्यासाठी पाणी दिले जात असे. प्रचंड वेदना देत मारहाण केली जात असे. दीड महिन्याच्या कालावधी नंतर सोनी सोरी यांनी काही सामाजिक कार्यकर्त्यांच्या मदतीने लिंगाराम यांना तुरुंगातून बाहेर काढले.

2010 मध्ये स्वातंत्र्य दिवसाच्या विरोधात नक्षलवाद्यांनी सहा सरकारी वाहनांना आग लावून जाळून टाकले. या घटनेच्या आडून आरोप करत सोनी सोरीवर नक्षलवाद्याबरोबर मिळून सरकारी मालमत्तेस हानी पोहचवणे, दंगल भडकावणे आणि राजद्रोह यासारखे आरोप लावून गुन्हे दाखल करण्यात आले. वस्तुस्थिती पाहता या घटनेच्या वेळी सोनी सोरी घटनास्थळापासून 30 किलोमीटर अंतरावर आपल्या नातेवाईकांच्या घरी होत्या.

त्यानंतर जुलै 2011 मध्ये स्थानिक काँग्रेस नेते अवधेश गौतम त्यांच्यावर प्राणघातक हल्ला झाला व यात त्यांच्या मुलाला दुखापत झाली. या घटनेच्या आरोपात पोलिसांनी खोटी केस दाखल करून सोनी सोरी यांच्या पतीसह अनेक आदिवासींना अटक करून तुरुंगात डांबले होते. त्यांच्यावर आरोप लावण्यात आला कि, “नक्षलवाद्याच्या बरोबर मिळून हा हल्ला करण्यात आला होता.” या प्रकरणात पुढे कधीच कोणत्याच नक्षलवाद्याला आरोपी म्हणून पकडले नाही उलट पकडण्यात आलेल्या जवळजवळ 40 आदिवासींना मात्र वर्षानुवर्षे पोलिसांनी खोट्या आरोपाखाली तुरुंगात शारीरिक छळवणूक केली, त्यांचे जगणे उध्वस्त केले. या दरम्यान छत्तीसगड एसआरपीएफ महानिदेशक (SRPF IG) यांनी सोनी सोरी यांना आपल्या कार्यालयात बोलावून सांगितले कि, “संबंधित सर्व आदिवासींनी आरोप मान्य करावेत, आम्ही त्यांना सोडून देऊ!” यावर खोटे आरोप मान्य करण्यास आणि पोलिसांचे खबरी बनण्यास सोनी सोरी यांनी स्पष्ट नकार देत “आम्ही सर्व निर्दोष आहोत आम्हाला सोडून द्या!” अशी भूमिका घेतली होती. अडीच वर्षाच्या कठीण तुरुंगवासातून बाहेर आल्यावर सोनी सोरी यांच्या पतीची अत्यंत खालावलेली शारीरिक परिस्थिती दिवसेंदिवस खराब होत गेली. शरीराच्या कमरेखालचा भाग हालचाल करणे बंद झाले होते. अशाच अवस्थेत त्यांचा पुढे मृत्यू झाला. पतीच्या मृत्युच्या वेळी सोनी सोरी जगदलपुर मधील तुरुंगात होत्या. पतीच्या प्रेतयात्रेत देखील सहभागी होण्याची परवानगी पोलिसांनी नाकारली होती.

2011 मध्ये सोनी सोरी यांना अटक केल्यावर सहा गुन्ह्यात आरोपी केले होते. त्यात कुवाकोंडा पोलीस स्टेशनवर हल्ला करणे, सरकारी इमारतीत बॉम्बस्फोट करणे, काँग्रेस नेता अवधेश गौतम यांच्या घरावर हल्ला करणे, नेरली घाटात गाड्यांना आग लावणे, हे आरोप होते. यात लक्षात घेण्यासारखी बाब आहे कि, हे सहा आरोप भारतीय जनता पक्ष सत्तेत असतांना करण्यात आले होते. 2014 मध्ये दंतेवाडा जिल्हा न्यायालयाने सोनी यांना खोट्या आरोपातून निर्दोष मुक्त केले पण ‘एस्सार कंपनीकडून खंडणी वसूल करणे!’ हा खोटा गुन्हा त्याच्यावर सुरूच होता, त्यात त्यांना स्थायी स्वरूपाचा जामीन मिळाला होता. सोनी सोरींसहीत अशा घटनांना पत्रकारीतेच्या माध्यमातून मांडणाऱ्या महिला पत्रकार मालिनी सुब्रमण्यम व आदिवासी अधिकारांसाठी कायदेशीर लढणाऱ्या महिला वकील शालिनी गेरा व ईशा खंडेलवाल यांनाही पोलिसांकडून त्रास दिला गेला.

अशा पद्धतीच्या लोकशाही अधिकारांच्या दमनाच्या विरोधातील एक पत्रकार परिषद आटपून घरी जात असतांना सोनी सोरी यांच्यावर मोटार सायकल वरून आलेल्या दोन जणांनी प्राणघातक हल्ला केला. या हल्ल्यात त्या कशातरी बचावल्या पण त्यांचा चेहरा पूर्णपणे जळाला होता. “हा हल्ला छत्तीसगड एसआरपीएफ आयजी कल्लुरी यांच्या सांगण्यावरून भाड्याच्या गुंडांनी केला होता.” असा आरोप सोनी सोरी यांनी केला कारण या हल्ल्यानंतर त्यांना मोठ्या प्रमाणात धमक्या यायला सुरुवात झाली होती. त्यात म्हटले जात होते कि. “यानंतर आयजी कल्लुरी यांच्या विरोधात बोलशील तर यापेक्षा जास्त मोठा हल्ला करून तुला मारून टाकू, तुझ्या मुलीवर देखील हल्ला करू आणि तिला पण मारून टाकू.”

सोनी सोरींवर असलेले खोटे आरोप एक-एक करून गळून पडले आहेत. याच साखळीत एस्सार कंपनी कडून खंडणी वसूल करण्याचा शेवटचा आरोप देखील 15 मार्च 2022 मध्ये खोटा असल्याचे न्यायालयाला देखील मान्य करावे लागले. सोनी सोरी न्यायालयाच्या निर्णयावर बोलत असतांना सांगतात कि, “मला खोट्या आरोपाखाली फसविण्यात आले होते. मला स्वत:ला निर्दोष सिद्ध करण्यासाठी एका दशकापेक्षा अधिक वेळ लागला. मी एक शालेय शिक्षिका होती. या खोट्या आरोपाने माझे आयुष्य, माझा सन्मान उध्वस्त करण्यात आले. माझ्या परिवाराला देखील अनेक यातना सहन कराव्या लागल्या.”

पुढे सरकार आणि न्यायव्यवस्थेवर प्रश्न उपस्थित करतांना त्या सांगतात कि, “माझा सन्मान आणि आयुष्यातील 11 वर्ष कोण परत करणार आहे, जे या खोट्या आरोपाच्या विरोधात लढत असतांना गेले आहेत? काय राज्य सरकार किंवा केंद्र सरकार याची भरपाई देणार आहेत? हे फक्त एकट्या सोनी सोरीच्या बाबतीत नसून बस्तर मधील अनेक आदिवासी अशा खोट्या आरोपाचा दंश झेलत आहेत.”

सोनी सोरी न्यायप्रिय आणि संवेदनशील नागरिकांना आवाहन करत असताना म्हणतात कि, “बस्तर मध्ये असे अनेक आदिवासी आहेत जे पोलिसांनी लादलेल्या खोट्या गुन्ह्यामध्ये तुरुंगात कैद आहेत. खोट्या आरोपाखाली तुरुंगात कैद असलेल्या व्यक्तीचे पूर्ण आयुष्य स्वत:ला निर्दोष सिद्ध करण्यात उध्वस्त होत आहेत. निर्दोष असून देखील पोलिसांच्या क्रूर दमनाला सहन करावे लागत आहे. बस्तर मध्ये आज सुद्धा आदिवासींचे शोषण सुरूच आहे, जोपर्यंत मी जिवंत आहे तोपर्यंत या शोषणाच्या विरोधात आवाज उठवत राहीन!”

छत्तीसगड मधील ही घटना काही एकमात्र घटना नाही. नैसगिक साधन संपत्तीची खुली लूट करून भांडवलदार वर्गाच्या मोठ्या हिश्श्याला गब्बर करण्यासाठी स्थानिक आदिवासी-कष्टकरी जनतेला दमनातून चिरडण्याचे काम जगभरात अनेक ठिकाणी चालू आहे. कार्यकर्त्यांवर खोटे खटले दाखल करून वर्षानुवर्ष तुरुंगात डांबून सडवले जात आहे. भांडवलदार वर्गाच्या तालावर नाचणाऱ्या या राज्यसत्तेच्या दमनाच्या कहाण्या सामंती राज्यसत्तांनाही लाजेने मान खाली घालायला लावतील इतक्या क्रूर आहेत. जनतेने संघर्षातून मिळवलेले नागरी अधिकार, लोकशाही अधिकार हिरावून घेतले जात आहेत. जागतिक आर्थिक संकटाला तोंड देणाऱ्या आणि त्यापायी अधिक हिंस्र होत चाललेल्या भांडवली व्यवस्थेचा क्रूर चेहरा आज सगळीकडे उघडा पडला आहे. लातिन अमेरिकेपासून दक्षिण आफ्रिका आणि आशिया खंडातील अनेक देशात देखील परिस्थिती कमी अधिक फरकाने अत्यंत भयंकर आहे. सोनी सोरीच्या प्रकरणातील कोर्टाच्या निकालाने फक्त या वास्तवाला पुन्हा एकदा नग्नपणे समोर आणले आहे. न्याय, समता, स्वतंत्रता आणि शोषणमुक्त समाजाचे स्वप्न उराशी बाळगणाऱ्या सर्वांनी हे समजणे गरजेचे आहे की आज या प्रश्नांच्या मूळाशी असलेल्या भांडवली लुटीच्या पाशवी गणितांवर प्रश्न उपस्थित केल्याशिवाय खऱ्या अर्थाने लोकशाही-नागरी अधिकार मिळणे शक्य नाही.

# पॅरिस कम्युनः पहिल्या मजूर राज्याची सचित्र कथा (दहावे पुष्प )

आज भारतातच नाही, तर संपूर्ण दुनियेत कामगार भांडवली लुटखोरांच्या वेगवान होत चाललेल्या हल्ल्यांचा सामना करत आहेत, आणि कामगार आंदोलन विखुरलेपण, साचलेपणा, आणि हताशेने ग्रासलेले आहे. अशामध्ये इतिहासाची पाने उलटून कामगार वर्गाच्या गौरवशाली संघर्षापासून शिकण्याचे आणि त्यांच्यापासून प्रेरणा घेण्याचे महत्व फार वाढते. **आजपासून 150 वर्षे अगोदर, 18 मार्च 1871 ला फ्रांसची राजधानी पॅरिस मध्ये पहिल्यांदा कामगारांनी आपले शासन कायम केले. याला पॅरिस कम्युन म्हटले गेले.** त्यांनी शोषकांद्वारे पसरवल्या जाणाऱ्या या विचारांना ध्वस्त केले की कामगार राज्यकारभार चालवू शकत नाहीत. पॅरिसच्या बहादूर कामगारांनी फक्त भांडवली सत्तेच्या रथालाच उलटवले नाही तर 72 दिवसांच्या शासनाच्या दरम्यान येणाऱ्या दिवसांचे एक छोटे मॉडेल जगासमोर प्रस्तुत केले आणि दाखवले की समाजवादी समाजामध्ये भेदभाव, असमानता, आणि शोषण कशाप्रकारे समाप्त केले जाईल. पुढे चालून 1917 च्या रशियन कामगार क्रांतीने या क्रांतीचा पुढचा टप्पा रचला.

कामगार वर्गाच्या या साहसी कारवाईने फक्त फ्रांसमधीलच नाही तर जगातील भांडवलदारांचे काळीज थरथरले. त्यांनी कामगारांच्या पहिल्या सत्तेला सुरूंग लावण्यासाठी जीवतोड प्रयत्न केले आणि शेवटी कामगारांच्या कम्युनला त्यांनी रक्ताच्या नद्यांमध्ये न्हाऊन काढले. पण कम्युनचे सिद्धांत अमर झाले.


पॅरिस कम्युनच्या पराजयातूनसुद्धा जगातील कामगार वर्गाने महत्वाचे धडे घेतले. पॅरिसच्या कामगारांचे बलिदान कामगार वर्गाला सतत आठवण देत राहील की भांडवलशाहीला नष्ट केल्याशिवाय त्यांना मुक्ती मिळू शकत नाही.

पॅरिस कम्युनला 150 वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने ‘कामगार बिगुल’ च्या मार्च 2021 अंकापासून आम्ही जगातील पहिल्या कामगार राज्याच्या सचित्र कथेची सुरूवात केली आहे. ‘मजदूर बिगुल’ मध्ये मार्च 2012 पासून प्रकाशित झालेल्या धारावाहिक कथेचा अनुवाद पुढील अंकांमध्ये आम्ही देत राहू.


या लेखमालेतील सुरूवातीच्या काही पुष्पांमध्ये आपण पॅरिस कम्युनच्या पार्श्वभूमीमध्ये जाणले की भांडवलाच्या सत्तेविरोधात कामगारांचा संघर्ष कशाप्रकारे पावलोपावली विकसित झाला. आपण पाहिले की कम्युनची स्थापना कशी झाली आणि तिच्या रक्षणासाठी कामकरी जनता कशाप्रकारे शौर्याने लढली. आपण हे सुद्धा पाहिले की कम्युनने खऱ्या लोकशाहीच्या तत्वांना इतिहासात पहिल्यांदा लागू कसे केले आणि हे पण दाखवले की “जनतेची सत्ता” वास्तवात कशी अस्ते. गेल्या पुष्पामध्ये आपण हे पहात होतो की कम्युनचा पराजय कोणत्या कारणांमुळे झाला. या चूकांनी नीट समजणे आणि भांडवलशाहीच्या विरोधात निर्णायक लढाईत त्यांच्यापासून धडे घेणे कामगार वर्गासाठी अत्यंत आवश्यक आहे.

— संपादक मंडळ

# कम्युनच्या रक्षणासाठी कामगारांनी दिला शेवटपर्यंत लढा



**1.** कम्युनचे सभासद बहुमत (म्हणजे ब्लांकीवादी, ज्याची राष्ट्रीय गार्डच्या केंद्रीय समितीत मुख्य भूमिका होती) आणि अल्पमत (म्हणजे आंतरराष्ट्रीय कामगार संघ, प्रथम इंटरनॅशनलचे सदस्य, ज्यामधे मुख्यत: प्रुधोचे समाजवादी मत असलेले अनुयायी होते) यामध्ये विभागलेले होते. ब्लांकीवाद्यांचे मोठे बहुमत केवळ क्रांतिकारी कामगारांच्या सहज-प्रवृतीमुळे समाजवादी होते. त्यांच्यापैकी काही लोकांजवळच तुलनात्मकदृष्ट्या जास्त सैद्धांतिक समज होती. त्यामुळेच ही गोष्ट समजली जाऊ शकते की आर्थिक क्षेत्रात बरेचसे असे काम झाले नाही जे कम्युनने करायला पाहिजे होते. कम्युनचे कामगार बँक ऑफ फ्रान्सच्या दरवाज्यापुढे एखाद्या देवस्थानाप्रमाणे अदबीने उभे होते या गोष्टीवर मार्क्सने आपली उद्विग्नता व्यक्त केली. ही एक मोठी राजकीय चूक होती. कम्युनच्या हातात बँक असणे म्हणजे दहा हजार कैद्यांपेक्षा अधिक मौल्यवान गोष्ट होती. असे झाले असते तर संपूर्ण फ्रेंच भांडवलदार वर्ग व्हर्साय सरकारवर कम्युनशी तडजोड करण्यासाठी दबाव टाकु शकला असता. परंतु या चुकी व्यतिरिक्त ब्लांकीवादी आणि प्रुधोवादी यांच्या द्वारे गठीत कम्युनने जे केले ते बहुतांशी योग्यच होते. कम्युनचे प्रुधोवादी सदस्य कम्युनच्या आर्थिक आदेशांसाठी, त्याच्या प्रशंसनीय आणि अप्रशंसनीय अशा दोन्ही पैलूंसाठी मुख्यतः जबाबदार होते. कम्युनच्या राजकीय कारवाया तथा चुकांसाठी मुख्यतः ब्लांकीवादी सभासद जबाबदार होते आणि मजेशीर गोष्ट ही आहे की या दोघांनीही त्यावेळेच्या परिस्थितीत आपापल्या विचारधारेच्या अगदी उलट कार्य केले.



वरः कम्युनच्या लाल झेंड्याखाली भांडवलदारांच्या सैन्याशी निकराचा सामना करण्यासाठी एकत्र आलेले नॅशनल गार्डचे सैनिक आणि पॅरिसचे शूर कामगार.

उजव्या बाजूलाः बॅरिकेड वर संघर्षासाठी तयारीत असलेली पॅरिसची कामकरी जनता. पॅरिस कम्युनच्या बहादुर रक्षकांनी शहरामध्ये कामगार वर्गाची पोलादी सत्ता कायम केली आणि बुर्जुआ वर्गाला कुठलीही सवलत दिली नाही, परंतु ते हे विसरले की पॅरिसच्या बाहेर थियेरच्या मागे फक्त फ्रांसचे नाही तर पूर्ण युरोपचे प्रतिक्रियावादी एकत्र होत आहेत. या चुकीची किंमत कम्युनला आपल्या रक्ताने चुकवावी लागली.

**2.** लहान शेतकरी आणि कारागिरांचा समर्थक प्रुधो संघबध्दतेशी कठोर घृणा करत होता. त्याचे म्हणणे होते की संघबध्दतेमध्ये चांगल्या पेक्षा वाईट गोष्टी जास्त आहेत कारण ते कामगाराच्या स्वतंत्रतेसाठी बंधन आहे. केवळ मोठ्या प्रमाणातील उद्योग आणि संस्थांमध्ये, उदाहरणार्थ रेल्वेमध्ये, ज्याला प्रुधोने अपवाद म्हटले, तिथेच कामगारांचा संघ उपयुक्त होता. परंतु 1871 मध्ये कलात्मक कारागिरीचे केंद्र असलेल्या पॅरिसमध्ये सुद्धा मोठ्या आकारातील उद्योग अपवाद राहिला नव्हता. कम्युनच्या तुलनात्मकदृष्ट्या सर्वात महत्वपूर्ण आदेशपत्राव्दारे मोठ्या आकारातील उद्योगाचे, मॅनुफॅक्चरचे सुद्धा संघटन उभे केले गेले जे केवळ प्रत्येक कारखान्यातील कामगार संघावरच आधारीत नसेल. उलट या सर्व संघांना एका मोठ्या युनियन मध्ये सामील करायचे होते, म्हणजेच एक अशी संघटना जिने अनिवार्यतः शेवटी कम्युनिझम, म्हणजेच प्रुधोच्या मताच्या अगदी उलट अशा गोष्टीच्या विकासाचा मार्ग मोकळा केला असता

# पॅरिस कम्युन: पहिल्या मजूर राज्याची सचित्र कथा (दहावे पुष्प)



3. ब्लांकीवाद्यांसाठी क्रांतीचा अर्थ होता षडयंत्र. त्यांचा हा दृष्टीकोन होता की तुलनेने थोडे दृढसंकल्प असलेले आणि संघटित लोक योग्य संधी मिळताच राज्याची यंत्रणा आपल्या हातात घेवू शकतात आणि जबरदस्त व कठोर शक्तीचे प्रदर्शन करत तोपर्यंत सत्तेला आपल्या मुठीत ठेऊ शकतात जोपर्यंत ते सामान्य जनतेला क्रांतीपर्यंत आणत नाहीत तसेच त्यांना नेत्यांच्या एका छोट्या गटाभोवती एकत्र करण्यात यश येत नाही. याचा अर्थ असा होतो की नव्या क्रांतिकारी सरकारच्या हातात संपूर्ण सत्ता कठोर स्वरूपात केंद्रीत असली पाहिजे. पण वास्तवात ब्लांकीवाद्यांचेच बहुमत असलेल्या कम्युनने काय केले? प्रांतांमध्ये वसलेल्या फ्रान्सच्या जनतेच्या नावाने केलेल्या आपल्या सर्व घोषणांमध्ये त्यांनी आवाहन केले की त्यांनी पॅरिस सोबत सगळ्या फ्रेंच कम्युनचा एक संघ बनवावा, एक अशी राष्ट्रीय संघटना बनवावी, जी प्रथमच स्वतः राष्ट्राद्वारे निर्मित केली जाईल.

5. पॅरिस कम्युन फ्रांस मधील सर्व मोठ्या औद्योगिक केंद्रांसाठी उदाहरण बनणार होते. पॅरिस तथा माध्यमिक केंद्रांमध्ये सामुदायिक शासन व्यवस्थेची एकदा स्थापना झाल्यानंतर प्रांतांमध्येसुद्धा जुन्या केंद्रीय सरकारला हटवून तेथे उत्पादकांचे स्वशासन कायम झाले असते. राष्ट्र बांधणीच्या एका प्राथमिक साच्यात, ज्याला विस्तृत बनवण्यासाठी कम्युनला वेळ मिळू शकला नाही, कम्युनने हे स्पष्ट स्वरूपात सांगितले होते की छोट्यात-छोट्या मोहल्ल्याचा राजकीय साचा कम्युन असेल आणि ग्रामीण भागात स्थायी सेनेचे स्थान राष्ट्रीय मिलीशिया घेईल, तिची सेवा अवधी अल्पकालीन असेल. प्रत्येक जिल्ह्यात ग्रामीण कम्युन आपल्या केंद्रीय नगरामध्ये, प्रतिनिधींच्या सभेद्वारे आपल्या समाविष्ट मुद्यांचे नियोजन करेल. या जिल्हा सभा पॅरिस स्थित राष्ट्रीय प्रतिनिधी सभेमध्ये आपले प्रतिनीधी पाठवतील. प्रत्येक प्रतिनिधी कोणत्याही वेळेला परत बोलावला जाऊ शकेल आणि तो आपल्या निर्वाचकांच्या औपचारिक सल्ल्यांना बांधील असेल. कम्युनच्या शासनात राष्ट्राची एकता भंग झाली नसती, उलट कम्युनच्या संविधानाव्दारे ती संघटीत केली गेली असती आणि भांडवली राज्य-सत्तेच्या विनाशाव्दारे वास्तविक राष्ट्रीय एकता कायम झाली असती. जुन्या शासन संस्थेचे जे भाग दमनकारी होते ते वेगळे केले गेले असते, पण त्यांचे कायदेशीर काम समाजाच्या प्रति जबाबदार अभिकर्त्यांच्या हातात सोपवले गेले असते. परंतु या कामांना पुढे नेण्यासाठी कम्युनला वेळ मिळाला नाही.




4. कम्युन सुरवातीपासूनच हे जाणत होता की कामगारांच्या हातात एकदा सत्ता आल्यानंतर तो जुन्या राज्य यंत्रणेद्वारे काम चालवू शकत नाही. त्यांना हे समजले होते की आपले प्रभुत्व कायम ठेवण्यासाठी कामगार वर्गाने एकीकडे आतापर्यंत त्याच्याविरुद्ध वापर केल्या जात असलेल्या जुन्या दमनकारी राज्यतंत्राला नष्ट केले पाहिजे आणि दुसरीकडे कम्युनने आपले प्रतिनिधी आणि अधिकाऱ्यांपासून स्वतःची सुरक्षा करण्यासाठी हे घोषित केले पाहिजे की ते कोणालाही, विना अपवाद, कोणत्याही क्षणी हटवू शकतात. कम्युनच्या पदाधिकाऱ्यांपासून ते अधिकारी आणि न्यायाधीशापर्यंत सगळे जनतेद्वारे निवडले जात होते आणि त्यांना हटवले जावू शकत होते.







कम्युनच्या सुरक्षेसाठी रस्त्यावर उभ्या केलेल्या बॅरिकेडची मोठी भुमिका होती. वरील चित्रात जनतेने बनवलेले एक मशिन दाखवले आहे. त्याचा उपयोग बॅरिकेड बनवण्यासाठी केला जात होता. वरील डाव्या बाजूच्या चित्रात एका बॅरिकेडवर तैनात नॅशनल गार्डचा योद्धा लाल झेंड्या सोबत.



पॅरिसच्या एका स्मशानभूमीत कामगारांनी शेवटची आघाडी लढली.

ज्या क्षणी सर्वहारा आपल्या वेगळ्या हितासाठी आणि आपल्या वेगळ्या मागण्यांना घेऊन एका वेगळ्या वर्गाच्या स्वरूपात उभे राहण्याचे धाडस करेल त्यावेळी सूड घेण्यासाठी भांडवलदार वर्ग कश्या प्रकारे वेडेपणा आणि क्रुरता यांचा नंगानाच दाखवू शकतो हे 1848 च्या क्रांतीवेळी प्रथमच भांडवलदार वर्गाने दाखवून दिले. परंतु 1871 मध्ये भांडवलदारांनी जसा रानटीपणा दाखवला त्या तुलनेत 1848 काहीच नव्हते.

6. कम्युनमध्ये मुख्यतः केवळ कामगार किंवा कामगारांचे प्रतिनिधी बसत असत. म्हणून त्यांच्या निर्णयाला, निश्चित रुपाने, सर्वहारा स्वरूप होते. कम्युनने असे अनेक आदेश जारी केले होते जे सरळ-सरळ कामगार वर्गाच्या हिताचे होते आणि काही प्रमाणात जुन्या समाजव्यवस्थेवर मोठा आघात करत होते. परंतु अशा शहरात जे सतत शत्रूच्या छायेत आहे, खूप झाले तर अशा गोष्टींना पूर्ण करण्याची सुरुवातच होऊ शकत होती. मे 1871 च्या सुरवातीपासूनच कम्युनची सर्व शक्ती व्हर्साय-सरकारच्या सतत वाढणाऱ्या सैन्याशी लढाई करण्यात गेली. पॅरिसवर सतत गोळीबार केला जात होता—त्या लोकांकडून ज्यांनी प्रशियाच्या सैन्याने या शहरावर केलेल्या गोळीबाराला धर्म-विरोधी आचरण म्हटले होते. आता तेच लोक प्रशियाच्या सरकारकडे भिक मागत होते की सेदान आणि मेत्ज मध्ये बंदी केलेल्या फ्रेंच सैनिकांना लवकर सोडा जेणेकरून ते येवून पॅरिस वर परत ताबा मिळवतील.

# पॅरिस कम्युनः पहिल्या मजूर राज्याची सचित्र कथा (दहावे पुष्प)

7. मे च्या सुरवातीला ते सैनिक हळू-हळू परत आल्यामुळे व्हर्सायच्या सैन्याची शक्ती निश्चितपणे अधिक वाढली होती. व्हर्सायच्या सैन्याने दक्षिण बाजूच्या मोर्च्यावर मूलैसाकेच्या किल्ल्याचा 3 मे ला ताबा घेतला, 9 तारखेला इस्सी-किल्ला त्यांनी ताब्यात घेतला जो गोळीबाराने पूर्णत: भग्न झाला होता, आणि 14 मेला वांव-किल्ला त्यांच्या हाती गेला. पश्चिम मोर्च्यावर ते शहराच्या भिंतींपर्यंत पसरलेल्या अनेक गावांवर आणि इमारतींवर ताबा मिळवत हळू-हळू पुढे जात ते मुख्य संरक्षक किल्ल्यापर्यंत पोहचले.



Arrestation de femmes, l'une en costume de fédéré, accusée d'avoir tué un officier.






ASSASSINAT DES OTAGES A LA PRISON DE LA ROQUETTE LE 24 MAI 1871

वरती :- स्त्री कम्युनार्डांची तुकडी पुरुषांच्या खांद्याला-खांदा मिळवत लढाईवर जाताना.


उजव्या बाजूला :- लढाईमध्ये जिंकल्यानंतर भांडवली सेनेने कामगारांचे भंयकर दमन करणे सुरु केले. कम्युनच्या लढाऊ स्त्रियांवर सैन्याने आणि अधिकाऱ्यांनी सगळ्यात जास्त राग काढला.

8. 21 मे ला गद्दारीमुळे तथा त्या जागेवर तैनात असलेल्या राष्ट्रीय गार्डच्या हलगर्जीपणामुळे व्हर्सायची सेना शहरामध्ये प्रवेश करण्यात यशस्वी झाली. पॅरिसवासियांनी त्या जागेच्या संरक्षणाचा बंदोबस्त युध्दविरामाच्या अटीवर विसंबून स्वाभाविकपणे ढिला सोडून दिला. याच्या परिणामी पॅरिसच्या पश्चिम भागात, म्हणजेच श्रीमंतांच्या खास भागात प्रतिरोध कमजोर राहिला; परंतु जसजसे आत घुसणारे सैन्य शहराच्या पूर्वेकडील अर्ध्या भागात, म्हणजेच कामगारांच्या भागाजवळ, येत गेले तसतसा खूप जोमाने त्यांचा प्रतिकार केला जाऊ लागला. पूर्ण आठ दिवसाच्या युध्दानंतर कम्युनचे शेवटचे रक्षक बेलवील आणि मेनीलमांतां येथील चढायांवर पराजित झाले. आणि तेव्हा निशस्त्र पुरुष, स्त्रिया आणि मुले यांचे हत्याकांड, जे वाढत्या प्रमाणात पूर्ण एक आठवड्यापासून चालु होते, ते अगदी टोकाला पोहोचले.




MASSACRE DES DOMINICAINS D'ARCUEIL ROUTE D'ITALIE N° 38 LE 25 MAI 1871 ... 13 VICTIMES

तोडेदार बंदुकीमुळे लोकांना लवकर मारता येत नव्हते; म्हणून शेकडोंच्या संख्येने हरलेल्या लोकांना एकाच वेळी मित्रैयोज (एक प्रकारची मशिनगन) व्दारे गोळी मारुन ठार केले जात होते. शेवटचे हत्याकांड झाले त्या पेयर-लाशेजच्या समाधीस्थळी "फेडरलांची भिंत" आजही या गोष्टीच्या मुक पुराव्याच्या स्वरुपात उभी आहे की कामगार वर्ग जेव्हा आपल्या अधिकारासाठी लढण्याचे साहस करत असतो तेव्हा शासक वर्गाच्या अंगात हिंसा संचारते.




कम्यूनच्या रक्षकांचा शेवटचा मोर्चा. पहिल्या कामगार राज्याच्या सुरक्षेसाठी ते शेवटच्या श्वासापर्यंत लढत राहिले, परंतु ते सर्व बाजूंनी घेरले गेले होते आणि शत्रू त्यांच्यापेक्षा संख्येने खूप मोठा होता.



9. जेव्हा सगळ्या लोकांना ठार मारणे अशक्य झाले तेव्हा सामान्य अटकसत्र सुरु झाले आणि कैद्यांमधून मनमर्जीने काहींना पकडून गोळ्यांनी उडवून दिले जाऊ लागले. तर काहींना मोठ-मोठ्या शिबिरात पोहचवले गेले जेथे त्यांना कोर्ट-मार्शलची वाट पहायची होती. पॅरिसच्या उत्तर-पूर्व बाजूला घेराव घातलेल्या प्रशियाच्या सैनिकांना कोणालाही पळून जाऊ न देण्याची आज्ञा होती. परंतु जेव्हा प्रशियन सैनिक या आज्ञेपेक्षा मानवी भावनेचा जास्त आदर करत होते, तेव्हा अधिकारीसुध्दा जाणून-बुजून दुर्लक्ष करत असत. यावेळी सॅक्सन सैन्य पथक विशेष रूपाने माणुसकीने वागले आणि त्यांनी अशा खूप साऱ्या लोकांना तेथून जाऊ दिले जे स्पष्टपणे कम्युनचे शिपाई होते.

...पुढील अंकात चालू

# वृत्तपत्र केवळ सामूहिक प्रचारकाचे आणि सामूहिक आंदोलनकर्त्याचेच नव्हे तर सामूहिक संघटकाचे सुद्धा काम करते



*('कामगार बिगुल' सारख्या वर्तमानपत्राची एका क्रांतिकारी कम्युनिस्ट पक्षाच्या निर्मितीसाठी काय भूमिका असते हे सांगणारा कॉ. लेनिन यांचा हा लेख, त्यांच्या जन्मदिनानिमित्त (22 एप्रिल) प्रकाशित करत आहोत. लेखामध्ये 'सामाजिक-जनवादी' म्हणून जो उल्लेख आहे तो कम्युनिस्टांबद्दल आहे कारण त्याकाळात रशियात कम्युनिस्टांना सामाजिक-जनवादी म्हटले जाई. — संपादक मंडळ)*

आमच्या मते आपल्या कामांची सुरवात, जी संघटना आपण निर्माण करू इच्छितो त्यासाठीचे पहिले पाऊल म्हणून एका अखिल रशियन राजकीय वृत्तपत्राची स्थापना हे होय. ह्याच तो मुख्य धागा असेल ज्याला पुढे नेऊन आपल्याला आपली संघटना वाढवता येईल, विस्तृत करता येईल, खोलवर रुजवता येईल. आपल्याला एका वृत्तपत्राची खूप गरज आहे; त्याच्याशिवाय सिद्धांतपूर्ण, सुव्यवस्थित आणि चौफेर प्रचार आणि आंदोलनाचे काम आपल्याला करता येणार नाही जे साधारणपणे सामाजिक-जनवाद्यांच्या प्रमुख आणि स्थायी कामांपैकी एक आहे. जनतेच्या व्यापक भागामध्ये राजकारण आणि समाजवादासंबंधित प्रश्नांबद्दल कुतूहल निर्माण झाले आहे अशा वेळी हे काम अजूनच महत्त्वाचे बनले आहे. वैयक्तिक कारवाया, स्थानिक पत्रके, पत्रिका यांच्या माध्यमातून चालणाऱ्या विखुरलेल्या आंदोलनाला एका सामान्य आणि सुव्यवस्थित आंदोलनाच्या मदतीने बळ देण्याची गरज आजपर्यंत कधीच एवढी भासली नव्हती. हे म्हणणे अतिशयोक्ती होणार नाही की ज्या वारंवारतेने आणि नियमिततेने वृत्तपत्र छापले (आणि वितरित केले) जाते त्यावरून याचा अचूक अंदाज बांधला जाऊ शकतो की आपल्या लढाऊ कारवायांच्या मुख्य आणि सर्वात महत्वाच्या अंगाला किती चांगल्या प्रकारे पूर्ण केले जात आहे. याशिवाय आपले वृत्तपत्र हे अखिल रशियन असले पाहिजे. लिखित शब्दाद्वारे जनता आणि सरकारला प्रभावित करायच्या प्रयत्नांना एकत्र करण्यात जर आपण अपयशी राहिलो तर—आणि जो पर्यंत अपयशी राहू तोपर्यंत—प्रभाव पाडणारी इतर जटिल, अवघड आणि निर्णायक माध्यमं जोडून आणि संघटित करून त्यांचा वापर करण्याचा विचार केवळ कल्पना ठरेल. छोट्या-छोट्या गटांत विखुरल्यामुळे तसेच जवळजवळ सर्वच सामाजिक जनवादी लोक स्थानिक कामात बुडून गेल्याने, आपल्या आंदोलनाला सर्वप्रथम वैचारिकरित्या तसेच व्यावहारिक आणि सांघटनिकरित्या सुद्धा नुकसान पोहोचत आहे. स्थानिक कामात सामाजिक जनवादी असे बुडून गेल्याने त्यांचा दृष्टिकोन, त्यांच्या कामाची व्याप्ती तसेच गुप्त स्वरुपात काम करण्याचे व आपली तयारी सुरु ठेवण्याचे त्यांचे कौशल्य यांमध्ये संकुचितपणा येतो. ज्या अस्थैर्याचा आणि लहरीपणाचा वर उल्लेख केला आहे त्याची खोलवर गेलेली मुळे आंदोलनाच्या याच विखुरलेल्या परिस्थितीत सापडतील. या उणिवेला दूर करण्यासाठी आणि स्थानिक आंदोलनांना एका अखिल रशियन आंदोलनाचे स्वरूप देण्यासाठी अखिल रशियन वृत्तपत्राची स्थापना पहिले पाऊल असले पाहिजे. शेवटी, आपल्याला नक्कीच एका राजकीय वृत्तपत्राची गरज आहे. राजकीय मुखपत्राशिवाय कोणत्याही राजकीय आंदोलनाची, असे कोणतेही आंदोलन जे हे नाव धारण करण्याचा अधिकारी असेल, आजच्या युरोपात कल्पनाच करता येणार नाही. अशा वृत्तपत्राशिवाय आपण आपल्या कामाला, राजकीय असंतोष आणि विरोधाच्या सर्व तत्वांना एकत्र करण्याच्या आणि त्याद्वारे सर्वहारा वर्गाच्या क्रांतिकारी चळवळीत प्राण फुंकण्याच्या कामाला कधीच पूर्ण करू शकणार नाही.

कामगार जनतेमध्ये "आर्थिक" प्रश्नांसंबंधी, कारखान्यांसंबंधी भांडाफोड करण्यासाठी चैतन्य निर्माण करून आपण पहिले पाऊल उचलले आहे, आपण आता पुढचे पाऊल टाकले पाहिजे; जे राजकीय दृष्ट्या थोडेही सजग आहेत त्या जनतेच्या प्रत्येक भागात गेले पाहिजे आणि राजकीय भांडाफोडीसाठी त्यांच्यात चैतन्य निर्माण केले पाहिजे. आज राजकीय भांडाफोडीचा आवाज अतिशय कमजोर, बुजरा आणि क्वचितच ऐकू येणारा आहे यामुळे आपण निराश होता कामा नये. याचं कारण सगळेच पोलिसांच्या दडपशाही समोर झुकलेत हे नाहीये तर ज्यांची भांडाफोड करायची क्षमता आहे आणि जे यासाठी तयार आहेत त्यांच्याकडे असा कोणताही मंच नाहीये जिथे ते बोलू शकतात, असे कोणतेही उत्सुक आणि उत्साह वाढवणारे श्रोते नाहीयेत ज्यांच्याशी ते बोलू शकतील, त्यांना जनतेत ती शक्ती दिसत नाही जिच्यापुढे ते "सर्वशक्तिशाली" रशियन सरकारची तक्रार करू शकतात.

पण सध्या हे सगळं जलद गतीने बदलत आहे. एक शक्ती अस्तित्वात आहे, ती म्हणजे क्रांतिकारी सर्वहारा वर्ग. ह्या शक्तीने फक्त राजकीय संघर्षाच्या आवाहनांना ऐकण्यात आणि समर्थन करण्यातच तत्परता दाखवली असे नव्हे तर साहसाने संघर्षात उतरण्याची सुद्धा तत्परता दाखवली आहे. झारशाही सरकारचा देशभर भांडाफोड करण्यासाठी एक मंच देण्याच्या स्थितीत आपण आहोत आणि हे काम पूर्ण करणे ही आपली जबाबदारी आहे. तो मंच म्हणजे सामाजिक-जनवादी वृत्तपत्रच असले पाहिजे. रशियन कामगार वर्ग, इतर वर्गांपासून तसेच रशियन समाजाच्या इतर स्तरांपेक्षा वेगळा आहे. राजकीय ज्ञान प्राप्त करण्यात हा वर्ग सतत रस दाखवतो तसेच बेकायदेशीर साहित्यासाठी सतत (फक्त तीव्र उलथापालथीच्या काळात नव्हे) आणि मोठ्या संख्येने मागणी करतो. जेव्हा जनतेची अशी मागणी स्पष्टपणे दिसत आहे, अनुभवी क्रांतिकारकांचे प्रशिक्षण आधीच सुरु झालेले आहे आणि जेव्हा मोठ्या शहरांतील कामगार मोहल्ल्यांमध्ये आणि कारखाण्याच्या वस्त्यांमध्ये, जनसमुदायांमध्ये केंद्रीत झाल्यामुळे तो वास्तविक रित्या त्या जागांचा मालक बनला आहे, तेव्हा कामगार वर्गाला एक राजकीय वृत्तपत्र काढणे सर्वथा शक्य बनले आहे. हे वृत्तपत्र सर्वहारावर्गाकडून शहरी निम्न भांडवलदारापर्यंत, ग्रामीण हस्तकलाकारांपर्यंत आणि शेतकऱ्यांपर्यंत पोहोचेल आणि अशा प्रकारे ते जनतेचे खरेखुरे राजकीय वृत्तपत्र बनेल.

वृत्तपत्राची भूमिका फक्त विचारांच्या प्रसारासाठी, राजकीय शिक्षणासाठी आणि राजकीय सहयोगींची भरती करण्यापर्यंत मर्यादित नाही. वृत्तपत्र केवळ सामूहिक प्रचारक आणि सामूहिक आंदोलनकर्ता नसून सामूहिक संघटक सुद्धा आहे. शेवटच्या मुद्द्यासंदर्भात याची तुलना एखाद्या बांधकाम चालू असणाऱ्या इमारती भोवती उभ्या केलेल्या मचाणाशी करता येईल, जे इमारतीची रूपरेषा स्पष्ट करते, कामगारांचा एकमेकांशी संपर्क व जाणेयेणे सुलभ करते ज्यामुळे त्यांना कामं विभागता येतात आणि त्यांनी केलेल्या एकत्रित श्रमाचे परिणाम बघता येतात. वृत्तपत्राच्या मदतीने आणि त्याच्या माध्यमातून साहजिकरित्या एक कायमस्वरूपी संघटना रूप घेईल जी केवळ स्थानिक कामांमध्ये नाही तर नेहमीच्या साधारण कामात भाग घेईल आणि त्याच्या सदस्यांना राजकीय घटनांचे काळजीपूर्वक निरीक्षण करत राहणे, त्यांचे महत्व तसेच जनतेच्या विविध भागांवर त्यांचे होणारे परिणाम समजावून घेणे तसेच क्रांतिकारी पक्षाने हस्तक्षेप करण्याची प्रभावी माध्यमं विकसित करणे याचे प्रशिक्षण देईल. वृत्तपत्राला नियमित सामग्री पुरविणे तसेच त्याचे नियमित वितरण या केवळ तांत्रिक कामाला सुद्धा स्थानिक एजंटांचे* जाळे लागेल जे एकमेकांच्या सतत संपर्कात असतील, सामान्य परिस्थितीची माहिती ठेवतील, अखिल रशियन कार्य-योजनेअंतर्गत त्यांची तपशीलवार कामं नियमित पार पाडण्याची सवय लावतील आणि विविध क्रांतिकारी कामांच्या आयोजनाच्या माध्यमातून त्यांची शक्ती तपासतील.

**हे वेगळे सांगायला नको की हे एजंट स्थानिक कमिटींच्या( गट/अभ्यासवर्ग) सोबत घनिष्ट संबंध ठेवूनच यशस्वीरीत्या काम करू शकतात. सर्वसाधारणपणे आम्ही जी योजना मांडत आहोत ती अशा स्थानिक कमिटींच्या सक्रिय समर्थनानेच पूर्णत्वाला नेली जाऊ शकते, ज्यांनी पार्टीला एकजूट करण्याचे वारंवार प्रयत्न केले आहेत आणि आम्हाला पूर्ण विश्वास आहे की आज ना उद्या ही एकजूट या मार्गाने नाही तर दुसऱ्या मार्गाने नक्कीच बनेल.*

**('व्हेअर टू बिगिन?' या लेखातून.)**

रशियाच्या सर्व भागातील कारखान्यात आणि ऑफिस मध्ये काम करणाऱ्या कामगारांची पत्रे तसेच कामगारांनी गोळा केलेला सहयोगाचा अहवाल वाचून प्रावदाच्या वाचकांना, ज्यातले जवळपास सगळेच रशियाच्या बाह्य खडतर परिस्थितीमुळे एकमेकांपासून विखुरलेले आणि दूर-दूर आहेत, याची कल्पना येईल की वेगवेगळ्या व्यवसायातले आणि भागातले कामगार कशा प्रकारे लढत आहेत, कशा प्रकारे त्यांच्यात कामगार वर्गीय लोकशाहीच्या रक्षणाची चेतना निर्माण होत आहे.

कामगारांचा जीवन वृत्तांत आता कुठे प्रावदाचा कायमस्वरूपी स्तंभ बनत आहे. यामध्ये काहीच शंका नाहीये, की कारखान्यात होणारे गैरवर्तन, सर्वहाराच्या नवनवीन हिश्श्यांमध्ये होणारी जागृती, कामगार हितांच्या या किंवा त्या कामांसाठी उभा राहणारा सहयोग यांबद्दल लिहिल्या गेलेल्या पत्रांशिवाय कामगारांचा दृष्टिकोन आणि त्यांच्या भावनांविषयी, निवडणूक अभियानांविषयी, कामगारांच्या प्रतिनिधींच्या निवडणुकांविषयी, कामगार काय वाचत आहेत, कोणत्या प्रश्नांत त्यांना विशेष रस आहे इत्यादी विषयांबद्दलचे अहवाल कामगाराच्या वृत्तपत्रापर्यंत येतील.

कामगाराचे वृत्तपत्र हा कामगारांचा मंच आहे. या मंचावरून सगळ्या रशियासमोर कामगारांनी सर्वसाधारणपणे कामगारांच्या आयुष्यातील विविध प्रश्न आणि विशेष करून कामगार वर्गीय लोकशाहीबद्दलच्या प्रश्नांना उचलले पाहिजे.

**('कामगार आणि प्रावदा' या लेखातून)**

# भाजपात सामील व्हा, स्वतःच्या भ्रष्टाचारी चारित्र्यावर प्रामाणिकतेचा मुलामा चढवून घ्या!!

**पान 13 वरून**

पक्ष बदल केल्याने जनतेला लुटण्याच्या त्यांच्या कृतीत काहीही फरक पडत नाही. कोणत्याही पक्षात जा, काम तर जनतेला लुटण्याचेच करायचे आहे! भाजपा मध्ये प्रवेश करून ह्या सर्व भ्रष्ट नेत्यांना अलभ्य लाभ झाल्यासारखंच आहे कारण आता ना कुणी विचारणारे, जाब पुसणारे ना आता कोणत्या चौकशीची भीती! म्हणूनच मणिपूर, अरुणाचल प्रदेश, जम्मू-काश्मीर, झारखंड, बिहार इत्यादी राज्यांत स्वतःच भ्रष्टाचाराचे आरोप लावलेल्या पक्षांसोबत भाजपाने युती केली किंवा त्या पक्षांमधील भ्रष्ट नेत्यांना पक्षात सामील करून घेतले, आणि तरीही भांडवली प्रसारमाध्यमांवरील नियंत्रणाच्या जोरावर जनतेमध्ये आपली स्वच्छ छबी झळकवण्यात भाजपा सर्वात पुढे आहे.

काँग्रेस, तृणमूल काँग्रेस, शिवसेना, राष्ट्रवादी सारखे भांडवली निवडणूक बाज पक्ष जे आज भाजपच्या ह्या 'चेरी पिकिंग ' भ्रष्टाचार विरोधी मोहिमे विरोधात टाहो फोडत आहेत त्यांनी देखील हे खोटं थोतांड मांडणं बंद करावं कारण जनतेला त्यांचं भ्रष्टाचारावर असलेलं प्रेम माहित आहे. वास्तवात हे सर्व एकाच माळेचे मणी आहेत! भांडवलदारांच्या हिताचे राजकारण करणाऱ्या या पक्षांमध्ये भ्रष्टाचार असणारच आहे कारण यांचे मुख्य काम कामगारांच्या शोषणातून भांडवलदारांचा नफा निर्माण करणारी व्यवस्था टिकवणे आणि चालवणे आहे, तेव्हा नफ्याच्या वाहत्या गंगेत हात धुवून का नाही घेतले जाणार? ऐतखाऊ मालक वर्गाची चाकरी करणारे हे नेते, स्वत: फुकटचे का नाही खाणार? युरोपातील तथाकथित 'प्रामाणिक' देशांमध्ये याच प्रकारच्या भ्रष्टाचाराला कायदेशीर रूप देऊन नेत्यांची 'सोय' केली जाते आणि भ्रष्टाचार नाहीच असे भासवले जाते. भ्रष्टाचाराची गंगोत्री असलेल्या भांडवली व्यवस्थेचे राजकारण असेच असू शकते.

# नौजवान भारत सभेचे पहिले महाराष्ट्र राज्य संमेलन संपन्न!

✒ बिगुल पत्रकार

क्रांतिकारक शहीद भगतसिंह, सुखदेव, राजगुरू, चंद्रशेखर आझाद, बिस्मिल, अश्फाक सारख्या क्रांतिकारकांचा वैचारिक वारसा पुढे घेऊन जाणाऱ्या नौजवान भारत सभा या युवक क्रांतिकारी संघटनेचे पहिले महाराष्ट्र राज्य संमेलन 23 मार्च 2022 रोजी, शहीद दिनानिमित्त पुणे शहरात संपन्न झाले. महाराष्ट्रातील विविध भागातील नौजवान भारत सभेच्या कार्यकर्त्यांनी सहभाग घेऊन राज्यातील व देशभरातील आत्तापर्यंतच्या एकंदरीत कामांचा आढावा घेतला, राज्य कार्यकारिणीची निवड केली, राज्य पातळीवर कामांना गती व नियमितता येण्यासाठी काही महत्वाचे प्रस्ताव देखील राज्य कार्यकारिणीच्या नेतृत्वात पारित झाले.



क्रांतिकारकांचा वारसा चालवणाऱ्या व विखुरलेल्या युवक आंदोलनाला योग्य विचाराच्या आधारावर नव्याने संघटित करण्यासाठी व त्याला जनसमुदायांच्या भांडवलशाही-साम्राज्यवादविरोधी संघर्षाचा अविभाज्य अंग म्हणून पुढे घेऊन जाण्याच्या व्यापक उद्देशाने नौभास गेले 7 वर्ष महाराष्ट्रात तरुणांना संघटित करण्याचे काम करत आहे. नौजवान भारत सभेच्या पहिल्या महाराष्ट्र राज्य संमेलनाची सुरुवात ही नौजवान भारत सभेचा ध्वज उभारून आणि स्वातंत्र्य लढ्यातील शहीदांना क्रांतिकारी अभिवादन करून केली गेली. त्यानंतर पुणे शहराचे समन्वयक रवि यांनी राज्यभरातील नौभासच्या कामांचा अहवाल सादर केला. रोजगाराच्या मुद्यावरील राष्ट्रीय पातळीवर पार पडलेले बसनेगा आंदोलन, पुरग्रस्तांचे आंदोलन, झोपडपट्टी पाडण्या विरोधातले आंदोलन, खाजगी व सरकारी आरोग्य सेवेच्या वाईट परिस्थितीच्या विरोधात राज्यात ठिकठिकाणी केलेली आंदोलने, जातीय तसेच महिलांवरील होणाऱ्या अन्याय अत्याचारांविरोधात वेळोवेळी केलेली आंदोलने, जनविरोधी सीएए-एनआरसी सारख्या कायद्यांच्या विरोधातील मोठमोठी आंदोलने, लोकशाही नागरी अधिकारांसाठी आंदोलने तसेच नैसर्गिक आपत्तीवेळी चालवलेल्या मदत मोहिमा व वैद्यकीय मदत शिबीरे, आरटीई अंतर्गत प्रवेश कार्य, कोरोना महामारीच्या वेळी केलेले राशन वाटपाचे व सामूहिक स्वयंपाक घराचे मदतकार्य; विविध क्रांतिकारक आणि समाजसुधारकांच्या जन्म व स्मृतीदिनानिमित्त आयोजित केलेले अनेक कार्यक्रम अशा संघर्षाच्या आणि क्रांतिकारी सुधारकार्यांच्या सर्व कामांचा एकंदरीत आढावा मांडला गेला. त्यानंतर मुंबई शहराचे समन्वयक अविनाश यांनी देशभरातील विविध राज्यांमध्ये नौजवान भारत सभेकडून होत असलेल्या एकंदरीत कामांचा थोडक्यात आढावा मांडला. पुणे कार्यकारिणी सदस्य सुरज यांनी नौभासचे संपूर्ण काम कशापद्धतीने जनसहयोगातून कसे चालते, तसेच आजवरचा आर्थिक ताळेबंद मांडला.

मागील जवळपास 7 वर्षांच्या कामाच्या अनुभवानंतर नौभासला राज्यातील कामाच्या विस्ताराला शिस्तबद्ध पद्धतीने समोर घेऊन जाण्यासाठी कार्यक्रमाच्या सदस्य सत्रात नौभासची लोकशाही पद्धतीने निवडणूक झाली व एकमताने राज्य कार्यकारिणी निवडली गेली. कार्यकारणीच्या सहमतीने साथी रवि यांची महाराष्ट्र राज्य सचिव तर अतुल यांची कोषाध्यक्ष म्हणून निवड केली गेली.

यानंतर झालेल्या आढावा व चर्चेनंतर राज्य पातळीवर सामूहिक कामांच्या वाटचालीसाठी व कामांना गती येण्यासाठी काही महत्वाचे प्रस्ताव पुढीप्रमाणे राज्य कार्यकारणीच्या नेतृत्वात पारित झाले. विखुरलेल्या प्रगतीशील युवक आंदोलनाला क्रांतिकारी कार्यक्रमाभोवती संघटित करणे; फॅसिझम विरोधात तृणमूल स्तरावर अभ्यासवर्ग, शिकवणीवर्ग, जनप्रचार इत्यादी माध्यमांमधून युवकांना संस्थाबद्ध पद्धतीने संघटित करणे; सर्वांना समान व विनामूल्य शिक्षणाच्या अधिकारासाठीचा संघर्ष तीव्र करणे व शिक्षणाचे खाजगीकरण-धार्मिकीकरण आणि भांडवली-बाजारी शिक्षणव्यवस्थेविरोधात संघर्ष तीव्र करत सावित्री-जोतिरावांचा वारसा पुढे नेणे; रोजगार अधिकारासाठी राज्यस्तरावर भगतसिंह रोजगार हमी कायदा पारित करून घेण्यासाठी संघर्ष तीव्र करणे; क्रांतिकारक चळवळीचा इतिहास व क्रांतिकारकांचा वारसा युवकांपर्यंत नेण्याकरिता साहित्याची निर्मिती व प्रचार-प्रसार करणे; नौभासच्या जाहीरनाम्यातील इतर मुद्यांवर प्राथमिकतेने काम वाढवणे हे ठराव पारित करण्यात आले.

कार्यक्रमातील आयोजित केलेल्या दुसऱ्या खुल्या सत्रामध्ये निखिल यांनी बेरोजगारीच्या समस्येवर मांडताना सांगितले की भारत हा जगात सर्वात जास्त बेरोजगारांच्या यादीत मोजला जातो. आकडेवारी सांगते की देशात रोजगार सतत कमी होत आहेत, सामाजिक आर्थिक असमानता वाढत आहे, श्रीमंत आणि गरिबांमधील दरी वाढतच चालली आहे. बेरोजगारीच्या प्रश्नावर भगतसिंह राष्ट्रीय रोजगार हमी कायदा झाला पाहिजे यासाठी व्यापक मोठे आंदोलन उभे करावे लागेल. पूजा यांनी समाजात स्त्रियांवर होणारे अत्याचार आणि स्त्रीला समाजात दिल जाणार दुय्यम स्थान या प्रश्नावर मांडणी करत म्हटले की गेल्या अनेक दशकांपासून स्त्रियांवर होणारे अत्याचार हे दिवसेंदिवस वाढतच चालले आहेत. भांडवली पितृसत्तेची व्यवस्था आहे तिथे स्त्रियांची पूर्ण मुक्ती होऊच शकत नाही. खाजगी मालकीच्या उदयासोबत स्त्रियांच्या गुलामीची असमानतेची सुरुवात झाली आणि खाजगी मालकी जपणाऱ्या भांडवलशाहीच्या नाशाशिवाय स्त्रीमुक्ती शक्य नाही. पुढे अविनाश यांनी जाती प्रश्नावर मांडणी करताना सांगितले की जगण्याच्या प्रश्नांभोवती कामगार-कष्टकऱ्यांना एकजूट करताना जातीअंताचा संघर्ष चालवणारी चळवळच आज खऱ्या अर्थाने जातीअंताची चळवळ बनू शकते. आरक्षणाच्या लढायांच्या निमित्ताने, अस्तित्वातच नसलेल्या संधींच्या एका हिस्श्यासाठी भांडणे लावून, जातींमधील अस्मितांना गोंजारणे चालू आहे. गरज आहे ती सर्वांना समान संधी मिळण्याची! आज प्रत्येक विद्यार्थ्याला पूर्णत: मोफत आणि समान शिक्षणाच्या, आणि रोजगाराच्या कायद्याची मागणी ही जातीअंताच्या लढ्याचा भाग आहे.

यानंतर मुंबईतील कार्यकर्त्यांनी बेरोजगारीच्या प्रश्नावरील "राजाचा वाजला बाजा" या पथनाट्याचे सादरीकरण केले. यावेळी नौजवान भारत सभेच्या सांस्कृतिक पथकाने विविध क्रांतिकारी गीते देखील गायली. आणि संमेलनाच्या समारोपाच्या वेळी शहीद भगतसिंह, सुखदेव , राजगुरू यांच्या स्मृतीला क्रांतिकारी अभिवादन करत अभिवादन फेरीद्वारे कार्यक्रमाची सांगता केली गेली.

# भाजपात सामील व्हा, स्वत:च्या भ्रष्टाचारी चारित्र्यावर प्रामाणिकतेचा मुलामा चढवून घ्या!!

✒ पूजा

भारताच्या 'सत्ताकारणात' आमदारांनी, खासदारांनी स्वतःच्या फायद्यासाठी पक्ष बदलण्याची घटना काही नवीन गोष्ट नाही, परंतु मोदी सरकार सत्तेत आल्यानंतर ज्या प्रकारे 'पक्षबदली' एक 'पॉलिटिकल स्टंट' — राजकीय डावपेच — म्हणून वापरला जात आहे त्यातून जनतेचा पैसा लुबाडून स्वतःचे घबाड बनवलेल्या नेत्यांचे भ्रष्ट चेहरे आणि ह्या सर्व भ्रष्ट नेत्यांना स्वतःच्या पदरात घेणाऱ्या आणि त्यांच्या भ्रष्टाचारावर पडदा टाकणाऱ्या मोदी सरकारचेही भ्रष्ट चरित्र स्पष्टपणे समोर आले आहे. कुठल्याही राज्याची निवडणूक असो, पैशांच्या जोरावर आमदार, खासदारांना विकत घेणे; जे सहज विकत घेता येत नाहीत त्यांच्यावर ईडी, सीबीआय सारख्या यंत्रणांची चौकशी बसवणे व त्यांनी भाजपा मध्ये प्रवेश घेणे आणि लगेच चौकशी गुंडाळली जाणे ही एक सामान्य बाब बनली आहे.

## भारतीय जनता पार्टीत जाऊन स्वच्छ झालेले नेते

भाजपचे मंत्री रावसाहेब दानवे पाटील यांच्या मते भाजपाकडे एक वॉशिंग मशीन आणि गुजरातहून आणलेली निरमा आहे! ही त्या निरमाचीच 'जादू' म्हणावी लागेल ज्यामुळे असे नेते ज्यांच्यावर भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप लागले, ईडी ची चौकशी बसली, त्यांचे आरोप, त्यांनी केलेला भ्रष्टाचार भाजपा मधे जाताच छू-मंतर होतो! 2014-15 ह्या वर्षभरात विविध निवडणुकांच्या काळात तब्बल 177 आमदार, खासदार ह्यांनी काँग्रेस मधून भाजपात प्रवेश घेतला. तसेच तृणमूल काँग्रेस, बसपा ह्या पक्षांतून देखील पलायन करत भ्रष्टाचाराचा आरोप लागलेले किंवा आरोप लागण्याची शाश्वती असलेले, धमकी मिळालेले नेते भाजपमध्ये जाऊन सामील झाले आहेत. मध्यप्रदेशातील ज्योतिरादित्य सिंधिया, आसामचे हिमंता बिस्वा सरमा, महाराष्ट्रातील नारायण राणे, राधाकृष्ण विखे पाटील, कालिदास कोळंबकर, शिवेंद्रसिंह भोसले, संदीप नाईक, वैभव पछाड, बंगालमधील तृणमूल काँग्रेस चे मुकुल रॉय, दीपक हल्दार, सुवेंदू अधिकारी, राजीव बॅनर्जी, वैशाली दालमिया, प्रबीर घोषाल, रथिन चक्रोबर्ती, रुद्रनील घोष, अपरुपा पोद्दार, हरियाणाचे राव इंदरजीत सिंग, एन. डी. तिवारी, अशा अनेक राज्यांमधील नेत्यांवर लागलले भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप भाजपा मध्ये प्रवेश घेताच धुवून निघाले आहेत!

2017 च्या हिमाचल प्रदेश विधानसभेच्या निवडणुकीपूर्वी माजी दूरसंचार मंत्री सुखराम, ज्याच्यावर दूरसंचार घोटाळ्या प्रकरणी आरोप सिद्ध देखील झालेत, याचा मुलगा अनिल शर्माने भाजपा मध्ये प्रवेश घेतला. सुखराम देखील 2017-2019 ह्या काळात भाजपा मध्ये राहिला व आता भाजपालाच अनौपचारिक समर्थन करत आहे. जुलै 2015 मध्ये गुवाहाटी पाणी घोटाळा (2010) प्रकरणी भाजपने आरोप लावलेल्या आसाम मधील काँग्रेसचे नेते हिमंता बिस्वा सरमाने पुढच्याच महिन्यात म्हणजे ऑगस्ट 2015 मध्ये भाजपात प्रवेश घेतला आणि आता तो आसामचा मुख्यमंत्री आहे! तृणमूल काँग्रेस सोबत अगदी सुरुवातीपासून असणाऱ्या मुकुल रॉय आणि इतर 12 नेत्यांवर नारदा स्टिंग केस, 2014 च्या आरोपात ईडी कडून चौकशी सुरु झाली त्यांनतर 3 नोव्हेंबर 2017 ला त्यांनी भाजपात प्रवेश घेतला. अरुणाचल प्रदेशात जनता पक्षाच्या पेमा खंडू (ज्याच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप आणि फौजदारी गुन्हे देखील दाखल आहेत!) आणि 32 आमदार भाजपात गेलेत. कर्नाटकात तर भाजपा ने आमदार-खासदारांच्या खरेदीत शेकडो कोटी रुपये खर्च केलेत. जमीन आणि खाणी घोटाळ्यात अडकलेल्या, भ्रष्टाचारात अव्वल असणारा बी.एस. येडियुरप्पा पुन्हा कर्नाटकाचा मुख्यमंत्री बनला असून त्याच्या घरात भाजपा नेते, वकील, न्यायाधीश यांना भरपूर लाच खाऊ घातल्याचे पुरावे सापडले असूनही आज तो ताठ मानेने, दोषमुक्त होऊन फिरत आहे. कर्नाटकात 2018 च्या निवडणुकीच्या वेळी बेल्लारीच्या रेड्डी ब्रदर्सची देखील 16,500 कोटीच्या घोटाळ्यात निर्दोष मुक्तता करण्यात आली. व्यापम घोटाळ्यातील मध्य प्रदेशचे भाजपाचे मुख्यमंत्री शिवराज सिंग चौहान देखील 2017 मध्ये निर्दोष मुक्त झाले.

जनतेप्रती कर्तव्याची कुठलीही भावना नसणाऱ्या, जनतेचा पैसा लुटून स्वतःच्या आणि मालकांच्या तिजोऱ्या भरण्यात कुशल असणाऱ्या ह्या भांडवली निवडणूकबाज पक्षाच्या नेत्यांनी

पान 12 वर

# श्रीलंका: नवउदारवादाच्या आगीत होरपळतोय आणखी एक देश

पान 16 वरून

औद्योगिकीकरण वाढवण्यासाठी राबवल्या गेलेल्या आयात प्रतिस्थापन धोरणाची जागा आता बाजाराभिमुख, निर्यात-प्रधान धोरणांनी घेतली. दोन दशकातच, 1997 मध्ये आशियाई वित्तीय संकट आले, आणि 2001 उजाडता उजाडता कर्जाच्या संकटाच्या रूपाने श्रीलंकेत देखील येऊन ठेपले. ह्या संकटाने देखील पुन्हा एकदा सिंहली-तामिळ संघर्ष चिघळला. लिट्टेच्या दहशतवादी कारवायांमुळे पर्यटनाला मोठा फटका बसला होता. 2002 मध्ये श्रीलंकेच्या सरकारने लिट्टेशी शस्त्रसंधी केली. परंतु 2004 पासून श्रीलंकन सेना व लिट्टे दोघांकडूनही लष्करी कारवाया वाढल्या. 2006 मध्ये श्रीलंकेच्या सरकारने लिट्टेचा खात्मा करायला घेतला. पुढच्या तीन वर्षात श्रीलंकेच्या सैन्याने लिट्टेचे प्रभावक्षेत्र पिंजून काढले व लिट्टेची निर्णायक हार झाली. ह्या तीन वर्षांत लिट्टे व श्रीलंकन सेनेने लाखो सामान्य श्रीलंकन नागरिकांची हत्या केली, व निर्दोष नागरिकांवर, महिलांवर, लहान मुलांवर अनेक प्रकारे जुलूम व अत्याचार केले. 33 वर्षे चाललेल्या नागरी युद्धाची अखेर झाली.

लिट्टे कोणत्याही अर्थाने क्रांतिकारी तर सोडाच, प्रगतिशील देखील नव्हती. श्रीलंकेत तामिळ राष्ट्रीयतेचे दमन होते आले आहे हे सत्य आहे. तामिळ लोकांच्या अनेक कत्तली श्रीलंकेच्या सिंहली लोकांनी घडवून आणल्या आहेत हे देखील सत्य आहे. परंतु लिट्टे कधीही कामगार वर्गीय संघटना नव्हती आणि लिट्टेने लिट्टेच्या प्रभावक्षेत्रातील मुसलमानांवर दडपशाही व अत्याचारही केले आहेत. लिट्टे ही एक तामिळ अस्मितावादी सैन्यवादी संघटना होती, जी तामिळ भांडवलदार वर्गाच्या एका हिस्स्याची प्रतिनिधी होती, जिचा सिंहली भांडवलदार वर्गासोबतच्या लढ्यात पराभव झाला आहे. श्रीलंकेतील तामिळ राष्ट्रीय प्रश्न हा एक जिवंत प्रश्न आहे; परंतु तामिळ भांडवलदार वर्गाच्या एका हिस्स्याने सिंहली भांडवलदार वर्गासमोर शरणागती पत्करल्याने आता त्याची सोडवणूक तामिळ भांडवलदार वर्गाच्या नेतृत्वात होणेसुद्धा दुरापास्त आहे. श्रीलंकेत कामगार वर्गीय आंतरराष्ट्रीयतावादी चळवळच आता तामिळ राष्ट्रीय दमनाच्या प्रश्नाला खऱ्या अर्थाने न्याय देऊ शकते.

## लिट्टेनंतर श्रीलंका : नवउदारवादी विकासाच्या मृगजळामागे धावणारा देश

लिट्टेविरोधातील तीस वर्षांच्या प्रदीर्घ युद्धाने, आणि 2008 मध्ये आलेल्या जागतिक मंदीमुळे श्रीलंकेची अर्थव्यवस्था पुन्हा एकदा संकटाच्या भोवऱ्यात सापडत होती. भारताचे सध्याचे विदेश सचिव शिवशंकर मेनन ह्यांनी 2016 च्या एका मुलाखतीत श्रीलंकेच्या अंतर्गत युद्धाची श्रीलंकेला 20 हजार कोटी डॉलर इतकी किंमत मोजावी लागल्याचे म्हटले होते. 2016 मध्ये श्रीलंकेचा जीडीपी 8 हजार कोटींच्या घरात होता. 2009 मध्ये श्रीलंकेच्या सरकारने भरमसाठ विदेशी कर्जे घेऊन अर्थव्यवस्थेची गती हलती ठेवण्याचे निवडले. 2004 मध्ये आलेल्या त्सुनामीच्या संकटातून बाहेर पडण्याकरिता अगोदरच श्रीलंकेने इतर देशांकडून आर्थिक मदत घेतलेली होती. 2009 पर्यंत पुन्हा एकदा मोठ्या प्रमाणावर इतर देशांकडून, व विशेषतः चीनकडून कर्जे घेण्यात आली. चीन हा आज श्रीलंकेचा सर्वात मोठा कर्जदाता आहे. ह्या कर्जामधून उभ्या केलेल्या निधीचा एक भाग शिक्षण इत्यादी सुविधा वाढवण्यासाठी केला गेला. त्यातून श्रीलंकेचा दरडोई जीडीपी 2014 पर्यंत तिपटीने वाढून युक्रेनसारख्या युरोपीय देशाच्या देखील पुढे गेला. पण, दुसरीकडे 2006 पासून 2012 ह्या सहा वर्षांत श्रीलंकेवरचे विदेशी कर्ज देखील तिप्पट झाले, व जीडीपीच्या 119% च्याही पुढे गेले. श्रीलंकेची अर्थव्यवस्था प्रामुख्याने चहा, कॉफी, नारळ, मसाले इत्यादींच्या निर्यातीवर, पर्यटनावर व त्यानंतर काही प्रमाणात कापड व इतर उत्पादनावर अवलंबून आहे. श्रीलंका खाद्यान्नाच्या बाबतीत स्वावलंबी नाही, आयातीवर अवलंबून आहे. औद्योगिक विकासामध्ये मागे पडलेल्या, आणि अर्थव्यवस्थेमध्ये पुरेसे वैविध्य नसलेल्या श्रीलंकेकरिता त्यामुळेच नव-उदारवादी धोरणे जास्तच अनर्थकारी ठरणार होती.

कोविडची सुरुवात होण्याअगोदरच श्रीलंकेची विदेश व्यापार तूट (trade deficit) आणि विदेशी कर्जाचा डोंगर वेगाने वाढत होता, व श्रीलंका एका मोठ्या वित्तीय संकटाकडे वाटचाल करीत असल्याचे भाकीत सर्व अर्थशास्त्री करतच होते. कोविडने श्रीलंकेला वाऱ्याच्या वेगाने त्या संकटात ढकलले आहे. कोविडमुळे निर्यात व पर्यटन ही श्रीलंकेच्या अर्थव्यवस्थेतील दोन्ही प्रमुख क्षेत्रे जवळजवळ 2 वर्षे ठप्पच होती. त्यात कोविडचे थैमान सुरु होण्यापूर्वी, 2019 मध्ये उत्पादनाला चालना देण्याच्या हेतूने सरकारने मोठी करकपात केलेली होती. त्यामुळे सरकारी तिजोरीत देखील खडखडाटच आहे. 2020 मध्ये श्रीलंकेच्या विदेशी कर्जाचे केवळ व्याज भरण्यासाठीच सरकारला एकूण महसुलातील 72 टक्के रक्कम खर्ची घालावी लागली होती. ह्यामुळे श्रीलंकेची परकीय चलन गंगाजळी धोकादायक पातळीपर्यंत खालावली आहे. त्यामुळे दुधासारख्या अनेक जीवनावश्यक वस्तूंच्या आयातीवर निर्बंध घालावे लागले आहेत. दोन वर्षांपूर्वीच, 2019 मध्ये, ह्या संकटावर उपाय करण्याच्या हेतूने श्रीलंकेने रासायनिक खतांची आयात बंद केली व 100 टक्के जैविक (organic) शेती करण्याचे बंधनच देशातील शेतकऱ्यांवर घातले. ह्याचा पर्यावरणवाद्यांनी कितीही गवगवा केला असला तरी आज ह्याच निर्णयामुळे अनेक पिकांचे उत्पादन 40 ते 65 टक्क्यांनी घटले आहे! त्यातच रशिया-युक्रेन युद्धाने ह्या सर्व आगीत तेल ओतण्याचेच काम केले आहे. युद्धामुळे तेल, गहू व इतर अनेक वस्तूंची आंतरराष्ट्रीय बाजारातील किंमत कडाडली आहे. त्यामुळे श्रीलंकेतील कामगार कष्टकऱ्यांवर अक्षरशः उपासमारीची वेळ आली आहे!

## नवउदारवाद : प्रचंड मंदी-महागाई आणि आर्थिक संकटांना जन्म देणारी व्यवस्था

नवउदारवादी धोरणांतर्गत देशाची अर्थव्यवस्था जागतिक भांडवलदारांच्या गुंतवणूकीकरिता खुली केली जाते. नव-उदारवाद म्हणजे देशातील कामगारांच्या श्रमशक्तीच्या शोषणाची जागतिक भांडवलाला दिलेली परवानगी. जर एखादा देश स्वयंपूर्ण होण्याच्या स्थितीत नसेल, देशामध्ये एक शक्तिशाली औद्योगिक-वित्तीय देशी भांडवलदार वर्ग अस्तित्वात नसेल, तर या धोरणांचा परिणाम होतो जागतिक भांडवलाचे देशाच्या अर्थव्यवस्थेवरचे वाढते नियंत्रण आणि जास्त आयात व कमी निर्यात यामुळे निर्माण होणारी तुट भरुन काढण्यासाठी सतत वाढते विदेशी कर्ज. सोबतच भांडवली विकासाला मिळणाऱ्या गतीमुळे कामगारांच्या श्रमशक्तीचे शोषण आणि गरीब-श्रीमंत दरी वाढणेही होत जाते.

श्रीलंकेचा इतिहास व आजची परिस्थिती हे विशेषतः तिसऱ्या जगातील कमजोर देशांतील आणि व्यापक अर्थाने जगभरातील सर्वच देशांसमोर व कामगार-कष्टकऱ्यांसमोर नवउदारवादाच्या कार्यपद्धतीचे एक प्रातिनिधिक उदाहरण आहे. पंचेचाळीस वर्षे देशातील सर्व कामकरी जनतेला नवउदारवादी धोरणांना झुंजल्यानंतर आज श्रीलंकेतील जनतेची काय परिस्थिती आहे? नवउदारवादी धोरणांचा सर्वात खंदा पुरस्कर्ता असणाऱ्या आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्याच अहवालानुसार 2006 मध्येच आशियातील सर्व देशांपैकी श्रीलंकेतच गरीब-श्रीमंत दरी सर्वात भीषण होती. शहरी-ग्रामीण असमानता देखील वेगाने वाढत असल्याचे ह्याच अहवालात नमूद केले आहे. 2009 च्या एका आकडेवारीनुसार श्रीलंकेच्या संपूर्ण अर्थव्यवस्थेतील 62 टक्के कामगार अनौपचारिक स्वरूपाचे काम करत होते.

1997, त्यानंतर 2009, व पुन्हा 2019 मध्ये भयानक आर्थिक संकटांचा सामना श्रीलंकेतील जनतेला करावा लागला आहे. इतकेच नव्हे, जनतेमध्ये धार्मिक जातीय तेढ वाढवत राहणे हे देखील आता नवउदारवादी धोरणांचा केवळ साईड इफेक्ट नाही, तर एक महत्त्वाचे उद्दिष्ट असते असेच म्हटले पाहिजे. श्रीलंकेत देखील 30 वर्षे चाललेल्या सिंहल विरुद्ध तामिळ गृहयुद्धात श्रीलंकन जनता सपशेल होरपळून गेली आहे. लाखो निष्पाप लोकांना आपला जीव गमवावा लागला आहे. जनतेच्या कष्टातून उत्पन्न झालेली हजारो कोटींची संपत्ती धुळीत मिळाली आहे. पुनरुज्जीवनवादी सिंहल अंधराष्ट्रवादाला पद्धतशीरपणे खतपाणी घातले जात आहे. समाजातील अतिउजव्या शक्तींचा व संस्कृतीचा प्रादुर्भाव गेल्या काही वर्षात प्रचंड प्रमाणात वाढला आहे.

दुसरीकडे देशी व विदेशी भांडवलदारांची मात्र श्रीलंकेतील जनतेच्या श्रमशक्तीच्या आणि नैसर्गिक संपत्तीच्या लुटीच्या जोरावर चांदी झाली आहे. 2006 पासून 2016 ह्या दहा वर्षांच्या काळात, जेव्हा लंकन जनता गृहयुद्ध आणि त्या युद्धांच्या परिणामांमधून सावरत होती, तेव्हा श्रीलंकेतील अब्जाधीशांची संख्या 1300 वरून 5000 वर गेली आहे. श्रीलंकेतील सर्वात श्रीमंत 1 टक्का लोकसंख्येकडे श्रीलंकेच्या एकूण संपत्तीच्या 30 टक्के पेक्षा जास्त हिस्सा आज जातो, तर दुसरीकडे सर्वात गरीब 50 टक्के जनतेकडे देशाच्या संपत्तीतील 5 टक्केपेक्षा कमी वाटा आहे! जगभरातील साम्राज्यवादी शक्तींनी देखील श्रीलंकेच्या निर्यातीवर अवलंबून असलेल्या अर्थव्यवस्थेतून गडगंज लाभ मिळवला आहे. केवळ आर्थिकच नाही, तर राजकीय-सामरिक लाभ देखील. चीनने तर श्रीलंकेला मदत व कमी दराने कर्ज देण्याच्या बदल्यात श्रीलंकेतील एका बंदरावर ताबा मिळवला आहे, आणि चिनी सैन्याच्या काही तुकड्या श्रीलंकेत कायमच्या नियुक्त केल्या आहेत. प्रत्येकच वेळी आर्थिक संकट आल्यावर जागतिक बँक असेल, नाणेनिधी असेल किंवा चीन असेल, ह्या सर्व साम्राज्यवादी शक्तींनी श्रीलंकेला संकटातून बाहेर काढण्यासाठी कर्जे देऊ केली आहेत व त्या बदल्यात आपल्या सोयीची धोरणे बनवण्यास श्रीलंकन सरकारला भाग पाडले आहे.

तिसऱ्या जगातील अनेक देशांची परिस्थिती कमीअधिक फरकाने अशीच आहे. एका संकटातून बाहेर पडण्यासाठी दुसऱ्या, त्याहीपेक्षा मोठ्या संकटाला आवताण द्यायचे व हेच चक्र दशकानुदशके चालवत राहायचे हेच समान सूत्र जवळपास सर्वच तिसऱ्या जगातील देशांच्या इतिहासावर नजर टाकल्यास दिसून येईल. नवउदारवादाकडे आज केवळ संकटे आणि त्याहीपेक्षा मोठी संकटेच आहेत, कोणत्याही संकटावर मात करण्याची क्षमता वा उपाययोजना देखील नाही हे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे.

## श्रीलंकन जनतेचा आक्रोश : बलस्थाने व मर्यादा

श्रीलंकेवर आज आले असलेले संकट अभूतपूर्व आहे असे श्रीलंकन सरकारनेच म्हटले आहे. श्रीलंकन जनतेत ह्या संकटाची प्रतिक्रिया देखील अभूतपूर्व अशीच आहे. लाखो श्रीलंकन नागरिक राष्ट्रपती गोटाबाया राजपक्षे ह्यांच्या राजीनाम्याची मागणी करत रस्त्यावर उतरले आहेत. ह्या निदर्शनांमध्ये हिंसा व जाळपोळ देखील झाली आहे. ह्या हिंसेचे निमित्त करून सरकारने आणीबाणी व कर्फ्यू लावला आहे. पेट्रोलचे रक्षण करायला लष्करी फौजफाटा प्रत्येक पेट्रोल पंपावर लावला आहे! तरीदेखील कर्फ्यू झुगारुन आजदेखील निदर्शने सुरुच आहेत. आता सरकारने समाजमाध्यमांवर देखील बंदी घातली आहे. श्रीलंकन जनतेने देशाच्या दुरावस्थेवर आपला आक्रोश रस्त्यावर येऊन व्यक्त केला आहे, व इतक्या मोठ्या संख्येने, तेही सरकारच्या व लष्कराच्या दडपशाहीला न जुमानता आपली निदर्शने सुरूच ठेवली आहेत.

परंतु ह्या आंदोलनाच्या दोन प्रमुख मर्यादा आहेत. एक म्हणजे ह्या आंदोलनाकडे कोणताही सकारात्मक कार्यक्रम नाही. जर ह्या आंदोलनासमोर झुकून गोटाबाया राजपक्षे ह्यांनी राजीनामा दिलाच, तर त्यांच्याजागी दुसरे कोण आल्याने किंवा काय केल्याने श्रीलंका ह्या संकटातून बाहेर येईल, ह्या प्रश्नाचे उत्तर ह्या आंदोलनाकडे नाही. त्यामुळेच, गेल्या अनेक स्वयंस्फूर्त आंदोलनांचा अनुभव लक्षात घेतला तर जरी गोटाबायांनी राजीनामा दिला, तरी सत्तेत त्यांच्यापेक्षा जास्त प्रतिक्रियावादी शक्ती येण्याचीच शक्यता जास्त आहे. 2011 मध्ये इजिप्त मध्ये झालेल्या उठावामुळे होस्नी मुबारक सत्ताच्यूत झाला असला तरी त्याच्या जागी मुस्लिम ब्रदरहूड सत्तेत आले. 2011 च्या अमेरिकेतील ऑक्यूपाय वॉल स्ट्रीट आंदोलनाने ओबामांना व्हाईट हाऊस मधून बाहेर काढण्यात महत्त्वाची भूमिका पार पाडली असली तरी ते करतानाच ट्रम्पसाठी मार्ग प्रशस्त करण्याचे देखील काम केले. तसेच काहीसे ह्या आंदोलनाचे होईल, ह्याची बरीच शक्यता आहे.

दुसरे म्हणजे, हे आंदोलन स्वयंस्फूर्तपणे सुरु झाले आणि विरोधी पक्षांतर्फे त्याचा फायदा उचलत त्यावर नियंत्रण मिळवण्याचे प्रयत्न चालू आहेत. आंदोलनाकडे वैचारिक एकतेचा अभाव

# रशिया-युक्रेन युद्धात भारताची भुमिका

पान 1 वरून

स्वस्तात खनिज तेल विकत घेतले आहे, आणि जागतिक 'दबाव' असूनही प्रधानमंत्री मोदी 1 एप्रिल रोजी रशियाचे परराष्ट्रमंत्री लावरोव यांना भेटले सुद्धा. अमेरिकेने सौम्य शब्दांमध्ये भारताच्या भुमिकेवर टीका करणे चालू ठेवले असताना, आणि अमेरिकाप्रणीत चीनविरोधी ऑस्ट्रेलिया, जपान, अमेरिका, भारत या 'क्वाड' समुहाचा भारत हिस्सा असताना सुद्धा भारताने अमेरिकेच्या टीकेकडे आणि इशाऱ्यांकडे दुर्लक्ष करत युद्धखोर रशियाशी संबंध टिकवले आणि वाढवले आहेत. रशियाला जागतिक बँकिंगच्या 'स्विफ्ट' या व्यवस्थेतून बाहेर काढलेले असताना, भारताने रशियासोबत व्यापार चालू ठेवण्यासाठी 'स्विफ्ट' शिवाय काम करण्याच्या, आणि प्रत्यक्षपणे रुपया-रुबल देवाणघेवाणीच्या मार्गांवर चर्चा चालू केली आहे. दुसरीकडे रशियाने अनुपस्थित राहू नये असा स्पष्ट इशारा दिलेला असतानाही रशियाला मानवाधिकार परिषदेतून काढण्याच्या प्रस्तावावर अनुपस्थित राहून प्रस्ताव पास होण्यास मदतच केली आहे (कारण तेथे अनुपस्थितांची मते गृहीत धरली जात नाहीत), शिवाय युक्रेनमधील बुचा शहरात सामान्य नागरिकांच्या हत्याकांडाचाही भारताने निषेध केला आहे.

या सर्व घडामोडी स्पष्टपणे दाखवतात की भारत सरकारने, म्हणजेच पर्यायाने भारतातील राज्यसत्तेवर काबीज असलेल्या भांडवलदार वर्गाने, अमेरिकेच्या दबावाला न स्विकारता, आपले स्वतंत्र "राष्ट्रीय हित" केंद्रस्थानी ठेवून निर्णय घेतले आहेत. काही प्रमाणात रशियाचाही दबाव झुगारलेला आहे.

## 'दलाल' भांडवलदार वर्ग म्हणजे काय?

माओ-त्से-तुंग यांनी चिनी भांडवलदार वर्गाच्या एका हिस्स्याकरिता 'कॉंप्रोडोर' किंवा 'दलाल' भांडवलदार असा उल्लेख केला होता. चीन हा एक प्रामुख्याने सामंती उत्पादन व्यवस्था असलेला देश होता, जिथे भांडवली उत्पादन मुख्यत्वे अमेरिकन, रशियन, जपानी, ब्रिटीश, इत्यादी साम्राज्यवादी भांडवलाद्वारे केले जात होते. या साम्राज्यवादी भांडवलदारांचे चीनमधील हस्तक हे मुख्यत्वे व्यापारी आणि नोकरशाही चरित्राचे होते, ज्यांचे अस्तित्वच साम्राज्यवादी भांडवलावर अवलंबून होते. या वर्गाकरिता माओंनी 'दलाल' भांडवलदार हा शब्द वापरला होता.

परंतु स्वातंत्र्यलढ्याच्या काळात विकसित झालेला टाटा-बिर्ला-मफतलाल-ठाकूरदास, इत्यादी प्रणित भारतातील भांडवलदार वर्ग हा औद्योगिक-वित्तीय भांडवलदार वर्ग होता, ना की वाणिज्यिक-नोकरशाही भांडवलदार वर्ग. ओद्योगिक भांडवल हे मालाची निर्मिती करते, तर वाणिज्यिक भांडवल त्याची विक्री. त्यामुळेच औद्योगिक भांडवलाला नेहमी हक्काच्या बाजाराची गरज भासते आणि त्याकरिताच राजकीय-आर्थिक स्वातंत्र्याची सुद्धा. म्हणूनच फक्त वाणिज्यिक-नोकरशाह भांडवलदार वर्ग हा 'दलाल' असू शकतो, ना की औद्योगिक-वित्तीय भांडवलदार वर्ग.

भारतातील भांडवलदार वर्ग हा साम्राज्यवादी भांडवलाचा कनिष्ठ साथीदार ('ज्युनिअर पार्टनर') आहे, ना की त्याचा दलाल. भारतातील आर्थिक धोरणे, परराष्ट्र धोरण भारतातील भांडवलदार वर्ग ठरवतो, ना की अमेरिकन वा ब्रिटीश भांडवलदार. नक्कीच भांडवली भागिदाऱ्यांमध्ये कनिष्ठ साथीदार कधी पडती बाजू घेऊ शकतो, कधी जास्त झुकूही शकतो, परंतु तो कधी नाते ताणूही शकतो, शक्ति वाढवता आली तर भागीदारीचे गणित बदलवूही शकतो आणि कधी नाते तोडूही शकतो; पण आपले स्वातंत्र्य तो त्यागत नाही. तेव्हा भारतातील भांडवलदार वर्ग आणि त्याचे आर्थिक व परराष्ट्र धोरण हे नेहमी एक स्वतंत्र धोरण राहीले आहे, ना की दलालीचे.

## 'तटस्थ'तेचे धोरण: एक संक्षिप्त आढावा

नेहरुंच्या काळापासून चालत आलेल्या तटस्थतेच्या धोरणाचीच ही अंमलबजावणी आहे असे सर्व 'आधिकारिक' प्रसारमाध्यमे सांगत आहेत. यात काही शंका नाही की मोदी सरकारचे परराष्ट्र धोरण नेहरू काळात सुरू झालेल्या तथाकथित 'तटस्थ' धोरणाचेच पुढचे पाऊल आहे, परंतु यात काही फरकाचेही मुद्दे आहेत जे गेल्या 75 वर्षांमध्ये देशी भांडवलदार वर्गाची वाढती शक्ती दाखवतात.



भारताचे 'तटस्थ'तेचे धोरण हे खऱ्या अर्थाने तत्कालिन साम्राज्यवादी अमेरिका व स्टॅलिनोत्तर सामाजिक साम्राज्यवादी रशिया यांच्यातील कोणत्याही गटाची बाजू न घेण्याचे धोरण नव्हते, तर या दोन साम्राज्यवादी शक्तींमधील संघर्षाचा वापर करत, कधी अमेरिकेकडून तर कधी रशियाकडून लाभ मिळवत, स्वत:चे "राष्ट्रीय" हित साधण्याचेच धोरण होते.

स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळी देशातील भांडवलदार वर्ग शक्तीने कमजोर होता, परंतु 1947 साली मिळवलेले राजकीय स्वातंत्र्य टिकवण्यासाठी तो भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसच्या रुपाने एका पक्षामध्ये सुसंघटीत होता आणि देश चालवण्यासाठी धोरणात्मकदृष्ट्या परिपक्व सुद्धा. टाटा-बिर्लांचा बॉंबे प्लॅन, नेहरु योजना, महालनोबिस प्लॅन, इत्यादी सर्व योजना आणि त्यानुसार लागू झालेली तथाकथित 'मिश्र' अर्थव्यवस्थेची भांडवली धोरणे त्याच्या परिपक्वतेची साक्ष होत्या. स्टील प्रकल्पांमध्ये कधी रशियाची तर कधी अमेरिकेची घेतलेली मदत, भारत-चीन युद्धात अमेरिकेची मदत घेण्यास दिलेला नकार, बांग्लादेश युद्धात रशियन सहकार्याने अमेरिकेसमोर न झुकणे, हरित क्रांतीमध्ये अमेरिकन मदतीद्वारे भांडवली शेतीला चालना, कोका-कोला कंपनीला देशाबाहेर घालवणे, 80च्या दशकाच्या शेवटापासूनच नवउदारवादी धोरणांचे छोटे प्रयोग, 1991 नंतर आय.एम.एम. व जागतिक बँकेचा दबाव असतानाही अर्थव्यवस्थेला पूर्ण खुले न करता टप्प्याटप्प्याने खुले करणे आणि दरवेळी देशी भांडवलाचे हित जपत प्रक्रिया पुढे नेणे, भांडवली शक्तीमत्ता प्राप्त झाल्यानंतर देशी भांडवलदारांची जगभरात गुंतवणूक, गॅट्स करारामध्ये अन्नसुरक्षेवर तडजोडीस दिलेला नकार, अशी अनेक उदाहरणे देता येतील ज्यामधून भारताचे 'स्व'हित समोर ठेवून आखलेले परराष्ट्र धोरण सतत नजरेस पडते. अशा प्रत्येक उदाहरणामध्ये कधी अमेरिकेच्या बाजूने झुकणे, कधी रशियाच्या, कधी लादलेल्या अटी स्विकारणे, हे भारताच्या राज्यसत्तेने केलेले आहे परंतु कनिष्ठ साथीदारासारखेच वागत कधीही आपले राजकीय निर्णय स्वातंत्र्य गहाण टाकलेले नाही. अमेरिकेने लादलेले इराक युद्ध असो वा इतर अनेक युद्धे, भारताने 'तटस्थे'तेच्या नावाखाली युद्धांना विरोध व निषेध करणे टाळले आहे. आज युक्रेन युद्धातही भारताने तथाकथित 'शांतते'च्या, तटस्थतेच्या धोरणाच्या आडूनच युद्धाचे अप्रत्यक्ष समर्थन चालवले आहे.

मोदी सरकारच्या काळात असलेले परराष्ट्र धोरण याच परराष्ट्र धोरणाचे पुढचे पाऊल आहे. गेल्या 2 दशकांमध्ये अमेरिकन साम्राज्यवादाचे कमजोर होणे, भारतासहीत इतर अर्थव्यवस्थांची स्थिती मजबूत होणे, रशिया-चीनचा साम्राज्यवादी अक्ष मजबूत होणे, यासारख्या घडामोडींमुळे आज भारतातील भांडवलदार वर्गाची जगामध्ये मोलभाव करण्याची क्षमता सुद्धा वाढली आहे. जानेवारी 2020 मध्ये अमेझॉनच्या जेफ बेझोस यांना भारताचे व्यापारमंत्री पियुष गोयल यांनी भेट नाकारली होती. असा निर्णय घेणारा व्यापारमंत्री एका स्वतंत्र भांडवलदार वर्गाच्या हिताच्या परराष्ट्र धोरणाची भलावण करत असतो, ना की अमेरिकेच्या दलालाची भुमिका निभावत असतो. कॉंग्रेस काळात ही निती 'दलाल' असण्याची व अमेरिकेसमोर झुकण्याची होती, आणि भाजप काळात ती स्वाभिमानाची झाली आहे ही निव्वळ बाळबोध समजदारी आणि मोदी सरकारची छबी चमकावण्यासाठीचा संघी कुप्रचार आहे. वास्तवामध्ये कॉंग्रेस व भाजप या दोन्ही पक्षांचा प्रमुख पाठिराखा बडा भांडवलदार वर्गच आहे आणि या तुलनेने जास्त शक्तीशाली झालेल्या कॉर्पोरेट भांडवलदार वर्गाचा मुख्य पाठिंबा आज भाजपला आहे, आणि परराष्ट्र धोरणामध्ये नेहरू काळापासून स्वतंत्र निर्णयांची नियमितता मात्र कायम राहीलेली आहे.

## 'राष्ट्रीय' हित म्हणजेच भांडवलदार वर्गाचे हित

रशियन तेल विकत घेताना अर्थमंत्री निर्मला सितारामन यांनी 'राष्ट्रीय हिता'ला प्राधान्य देण्याबद्दल वक्तव्य केले आहे. इतर सर्व शोषणकारी व्यवस्थांप्रमाणे भांडवलशाही सुद्धा शोषक वर्गाचे तत्वज्ञान निर्माण करते आणि पसरवते. भांडवलशाहीचे वैशिष्ठ्य हे आहे की ती भांडवलदार वर्गाच्या हितालाच सर्व जनतेचे, किंवा भांडवलदारांच्या भाषेत 'राष्ट्रीय' हित म्हणून मांडते आणि जनतेच्या गळी उतरवते. कामगार वर्गामध्येही तो हा विचार स्थापित करत जातो की भांडवलदारांच्या हितामध्येच देशाचे आणि पर्यायाने कामगारांचे हित आहे. त्यामुळेच सर्व संपत्ती कामगारच तयार करत असले तरी मोदी लाल किल्यावरून भाषण करताना म्हणतो की संपत्तीची निर्मिती करणाऱ्या भांडवलदारांचा देशाने आदर केला पाहिजे. रशियाकडून तेल विकत घेताना या तेलाच्या पैशातून रशियाच्या युक्रेनवरील युद्ध आघाडीला मदत मिळणार आहे या टीकेकडे दुर्लक्ष करत भारताने तेल विकत घेतले आहे. रशियाचे स्वस्त तेल विकत घेणे ही देशांतर्गत वाढत्या महागाईमध्ये जनतेच्या असंतोषाला नियंत्रित ठेवण्यासाठी देशी भांडवलदार वर्गाची गरज आहे. त्याचप्रमाणे आपले राजकीय आणि आर्थिक स्वातंत्र्य टिकवण्याकरिता शस्त्रास्त्रांची गरज भागवणाऱ्या रशियाशी वितुष्ठ भारताला परवडणारे नाही. यामुळेच युक्रेनी जनतेच्या अधिकारांच्या मुद्द्याला बासनात बांधून ठेवत, 'लोकशाही' आणि 'शांततेचे' गुण गाणाऱ्या भारत सरकारने या युद्धामध्ये हल्लेखोर रशियाला नाराज न करता, उलट संबंध वाढवण्याचे धोरण राबवले आहे.

## रशिया-युक्रेन युद्ध आणि भारताच्या परराष्ट्र धोरणाचे भविष्य

भारताच्या भुमिकेतून तो रशिया-चीन साम्राज्यवादी अक्षाच्या बाजूने झुकत आहे असा जर कोणी निष्कर्ष काढेल तर तो सुद्धा निश्चितच चुकीचा असेल. रशिया-युक्रेन युद्धामध्ये आपले 'राष्ट्रीय हित' जपत भारताने रशियासोबत असलेले शस्त्रास्त्र करार, तेलावरचे अवलंबित्व, देशांतर्गत वाढती महागाई आणि अर्थव्यवस्थेचे संकट, या सर्व मुद्यांना डोळ्यसमोर ठेवून रशिया विरोधात न बोलण्याची भुमिका बनवली आहे. त्याचवेळी अमेरिकेच्या नेतृत्वातील चीनला शह देण्यासाठी बनलेल्या 'क्वाड' गटामध्येही भारताची भुमिका कायम आहे. इतकेच नव्हे तर भारताने 2 एप्रिल रोजी ऑस्ट्रेलिया सोबत व्यापारी करार करत या नात्यालाही पुढे नेले आहे. भारत-चीन सीमावादासंदर्भात रशियाचे चीनवरील वाढते अवलंबित्व आणि त्यापायी भविष्यात उद्भवू शकणारी शत्रू-मित्रत्वाची क्लिष्ट गणितं सुद्धा भारतासमोर भविष्यात उभी राहणारच आहेत. "तटस्थता" तोपर्यंतच टिकवता येते जोपर्यंत अंतर्विरोध परिणाम करतील इतके तीव्र झालेले नसतात. जागतिक साम्राज्यवादी स्पर्धा आज अमेरिका-ब्रिटनचा अक्ष विरोधात रशिया-चीनचा अक्ष असे रूप घेत आहे आणि भविष्यातील बदलत्या परिस्थितीत भारतीय स्वतंत्र राज्यसत्ताही देशी भांडवलदार वर्गाचे तत्कालीन हित ध्यानात ठेवूनच बाजू निवडत राहील.

# श्रीलंका: नवउदारवादाच्या आगीत होरपळतोय आणखी एक देश

✎ निमिष

गेल्या काही दिवसात, आपल्या देशात महागाईने थैमान घातले आहे व कामगारांचे आणि सामान्य जनतेचे जिणे मुश्किल केले आहे. परंतु केवळ आपलाच देश संकटात सापडला आहे असे नव्हे, तर कोविड आणि लॉकडाऊनमुळे संपूर्ण जगाच्याच अर्थव्यवस्थेला मोठा हादरा बसला आहे आणि जगातील सर्वच देश व जगभरातील कामगार-कष्टकरी जनता कमीअधिक प्रमाणात आर्थिक संकटात सापडले आहेत.

आज सर्वात भीषण आर्थिक संकट ज्या देशावर कोसळले आहे तो देश म्हणजे आपला सख्खा शेजारी, श्रीलंका. सुवर्णनगरी, स्वर्गाहून रम्य वगैरे म्हटल्या गेलेल्या ह्या देशात आज परिस्थिती नरकप्राय झालेली आहे. सामान्य कामगार-कष्टकऱ्यांना दोन घास मिळवण्यासाठी वणवण करावी लागत आहे! श्रीलंकेच्या सरकारने हे संकट गेल्या 73 वर्षांतील, म्हणजेच श्रीलंकेच्या आधुनिक इतिहासातील सर्वात भयानक संकट घोषित केले आहे. गेल्या काही दिवसात श्रीलंकेतील पेट्रोलच्या किंमती दुप्पट झाल्या आहेत. वीज निर्माण करायला देखील तेल शिल्लक नसल्याने श्रीलंकेच्या सरकारला दररोज 10 तास वीजकपात करावी लागत आहे. एकापेक्षा एक भयंकर अशा दुष्परिणामांची साखळीच देशातील सर्व जनतेवर कोसळली आहे. वीज कपात केल्याने सर्वच गोष्टींच्या उत्पादनाला मोठा फटका बसला आहे. त्यामुळे कामकरी जनतेला पगार देखील मिळालेले नाहीत. हे संकट इतके सर्वव्यापी आहे की केवळ विजेचाच नाही, तर औषधे, सर्वच जीवनावश्यक वस्तू, इतकेच काय अन्नपाण्याचा देखील अभूतपूर्व तुटवडा आहे. देशातील कागद संपत आल्यामुळे देशभरातील परीक्षा पुढे ढकलण्याची वेळ येऊन ठेपली होती! ह्या संकटामुळे, राष्ट्राध्यक्षांच्या राजीनाम्याची मागणी करत, श्रीलंकेतील कामकरी जनता मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरली आहे. निदर्शनांमध्ये जाळपोळ व हिंसा देखील झाली आहे व ह्या जाळपोळीचे निमित्त करून श्रीलंकेच्या सरकारने आणीबाणी व कर्फ्यू लावला आहे. श्रीलंकेहून भुकेमुळे विस्थापित होऊन शेकडो लोक भारतात शरणार्थी म्हणून येत आहेत व अजूनही लाखो लोक पुढच्या काही दिवसांमध्ये येतील असा अंदाज आहे.

हे संकट काय आहे, ह्याच्या मुळाशी काय कारणे आहेत व ह्या संकटावरील उपाय काय असू शकतात ह्याची चर्चा करण्याअगोदर श्रीलंकेच्या राजकीय-आर्थिक इतिहासावर एक धावती नजर टाकणे आवश्यक आहे.

### श्रीलंकेचा थोडक्यात इतिहास

भारताप्रमाणेच श्रीलंकेत देखील अनेक वर्षे पाश्चिमात्य साम्राज्यवादी देशांची वसाहत होती. 1597 साली पोर्तुगीजांनी श्रीलंकेच्या किनारपट्टीवरील एका भागावर ताबा मिळवला. त्याअगोदर श्रीलंकेवर वेगवेगळ्या सरंजामी राजवटींनी राज्य केले होते. 2000 वर्षांपूर्वीच श्रीलंकेत बौद्ध धर्माचा प्रसार मोठ्या प्रमाणावर झाला. बौद्ध धर्माला श्रीलंकेत हजारो वर्षे राजाश्रय देखील प्राप्त होता, व आजही आहे. ह्या 2000 वर्षांमध्ये कधी श्रीलंकेतील बौद्ध राजांनी तर कधी दक्षिण भारतातील चोलांसारख्या हिंदू घराण्यांनी लंकेवर राज्य केले. श्रीलंकेत तामिळ लोकांचे भारतातून येणे-जाणे हे इतक्या पूर्वीपासून चालत आलेले आहे. ह्या काळात श्रीलंकेतील संस्कृती अनेक बाबतीत भारतीय संस्कृतीशी साधर्म्य सांगणारी होती. 1505 साली पोर्तुगीजांनी श्रीलंकेच्या भूमीवर पहिल्यांदा पाय ठेवले. सुरुवातीला व्यापाराच्या उद्दिष्टाने आलेल्या पोर्तुगीजांनी, काही वर्षांतच किनाऱ्यावरील एका भागावर ताबा सांगायला सुरुवात केली. पोर्तुगीजांचा श्रीलंकेतील कॅन्डियन राज्याच्या राजाने व प्रजेने सर्व शक्तीनिशी व शेवटपर्यंत विरोध केला. 1658 साली पोर्तुगीजांचा बिमोड करण्यासाठी कॅन्डियन राजाने डच ईस्ट इंडिया कंपनीला मदतीला



घेतले. सुरुवातीला कंपनी स्थानिक सिंहली राजाच्या बाजूने व पोर्तुगीजांच्या विरोधात लढली व नंतर त्या राजाच्या देखील विरोधात लढली व श्रीलंकेच्या जवळजवळ अर्ध्या भूभागावर आपला ताबा प्रस्थापित केला. त्यानंतर 1796 साली नेपोलिओनिक युद्धांच्या पार्श्वभूमीवर श्रीलंकेला फ्रेंचांच्या ताब्यात जाण्यापासून रोखण्यासाठी लंकेवर ब्रिटीशांनी चढाई केली, व डच-शासित भागावर ताबा मिळवला. त्यानंतर 1815 मध्ये, पहिल्या कॅन्डियन युद्धात, राजा विमलधर्मसूर्य पहिला ह्याला हरवून ब्रिटिशांनी संपूर्ण लंकेवर ताबा मिळवला. त्यानंतर, 1948 मध्ये स्वातंत्र्य मिळेपर्यंत, सव्वाशे पेक्षा जास्त वर्ष संपूर्ण श्रीलंका ही एक ब्रिटिश वसाहत होती.

लंकेवर वसाहत स्थापन करणाऱ्या तिन्ही युरोपीय शासकांनी श्रीलंकेच्या जनतेवर वेगवेगळ्या मार्गांनी जुलूम केले, व फूट पाडा आणि राज्य करा हे तंत्र अवलंबले. पोर्तुगीजांनी श्रीलंकेतील बौद्ध धर्मियांवर अत्याचार केले. अनेकांना बळजबरीने ख्रिस्तीधर्मात धर्मांतरण करायला लावले. त्यानंतर आलेल्या डचांनी दालचिनी आणि विड्याची शेती तेथील शेतकऱ्यांवर लादली. ह्या शेतकऱ्यांचे शोषण तर केलेच, त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणात करवसुली देखील केली. डचांनी श्रीलंकेतील शेतांवर काम करायला भारतातून देखील वेठबिगार शेतमजूर नेले. त्यानंतर ब्रिटिशांनी संपूर्ण बेटावर आधी दालचिनी व कॉफी, आणि नंतर रबर व चहाची शेती मोठ्या प्रमाणावर करवून घेतली. ब्रिटिशांनी जशी आणि जितकी पिळवणूक भारतातील जनतेची केली तशीच आणि तितकीच श्रीलंकेतसुद्धा केली. ग्रामीण शेतकरी आपले छोटे शेत सोडून ब्रिटिशांच्या मोठमोठ्या मळ्यांमध्ये काम करण्यास तीव्र विरोध करत होते, त्यामुळे मोठ्या संख्येने भारतातील तामिळ कामगारांना श्रीलंकेतील मळ्यांमध्ये काम करायला नेले. सिंहली व तामिळ ह्यांच्यामध्ये फूट पाडा व राज्य करा हे धोरण अवलंबले. श्रीलंकेतील सिंहली-बौद्ध, तामिळ-हिंदू, आणि मुसलमानांमधील आजवर चालत आलेला तीव्र राजकीय-सामाजिक-सांस्कृतिक संघर्ष हा ब्रिटिशांच्या ह्याच धोरणाची निष्पत्ती आहे.

ब्रिटिश राजवटीतच श्रीलंकेत देखील एक छोटा भांडवलदार वर्ग, आणि एक सुशिक्षित मध्यमवर्ग आकार घेऊ लागला. भारतामध्ये उदयास येणाऱ्या भांडवलदार वर्गाचा प्रमुख हिस्सा औद्योगिक भांडवलदारांचा होता, परंतु श्रीलंकेत मात्र मळ्यांचे व्यवस्थापन करणाऱ्या, व निर्यातीत भांडवल गुंतवणाऱ्या अशा दलाल भांडवलदारांचा एक मोठा वर्ग होता. तरीही, औद्योगिक व निम्न-भांडवलदार वर्गातून आणि मध्यम वर्गातून एक स्वातंत्र्याची चळवळ आकार घेऊ लागली. धर्मपाल ह्या सिंहल बौद्ध नेत्याच्या नेतृत्वात एक सर्वजातीय सिंहल-बौद्ध चेतना विकसित होऊ लागली. मध्यमवर्गातील तरुणांना जगभरातील साहित्य वाचायला मिळू लागले. त्यातून श्रीलंकेत देशभरात तरुणांच्या झुंजार, लढाऊ संघटना उभ्या राहिल्या. त्यासोबतच एक मवाळ सिलोन नॅशनल काँग्रेस देखील उभी राहिली. देशभरातील तरुण संघटनांमधून आलेल्या संघटकांनी एक ट्रॉट्स्कीवादी (लंका सम समाज पार्टी) व एक कम्युनिस्ट पार्टी (कम्युनिस्ट पार्टी ऑफ श्रीलंका) देखील बनवली, व पूर्ण स्वातंत्र्याची मागणी केली. एकीकडे हे सर्व चालू असताना दुसरीकडे ब्रिटिशांकडून जनतेची आर्थिक पिळवणूक आणि समाजात फूट पाडणे चालूच होते. ह्यातूनच 1915 साली मुसलमानांच्या विरोधात दंगल उसळली. देशभरात पसरलेल्या दंगलीत हजारो मुसलमान मारले गेले. 1939 मध्ये सिंहली व तामिळ ह्यांच्यामध्ये दंगल झाली. दुसरे महायुद्ध सुरु झाल्यावर ब्रिटिश सरकारने जनतेची पिळवणूक आणखी तीव्रतेने केली, तशी स्वातंत्र्यलढ्याची धार देखील वाढली. अनेक मळ्यांमध्ये संप झाले, ट्राम कामगार, बस कामगार व बंदरांवरील कामगारांनी देशव्यापी संप केले. भारतातील नौसेना विद्रोहामुळे ब्रिटिशांचे धाबे दणाणले होतेच. 1947 साली श्रीलंकेत निवडणूक झाली. निवडणुकीचे निकाल आल्यानंतर डॉन स्टीफन सेनानायकेंच्या संयुक्त राष्ट्रीय पक्षाने सिंहल महासभा व तामिळ काँग्रेस ह्या दोन पक्षांशी युती केली, व ही युती बहुमतात होती. ही उंदरामांजराची युती करण्यासाठी सेनानायकेंना अनेक तडजोडी कराव्या लागल्या. उदा. सिंहली पक्षाची साथ मिळवण्यासाठी तामिळ शेतमजुरांना मतदानाच्या हक्कापासून वंचित ठेवण्यात आले, इत्यादी. ह्या युतीकडे श्रीलंकेच्या सत्तेचे शांततापूर्वक हस्तांतरण करून 1948 साली ब्रिटिशांनी लंकेतून काढता पाय घेतला. हे तिन्ही पक्ष भांडवलदारांच्याच बाजूचे पक्ष होते. श्रीलंकेला देखील स्वातंत्र्य मिळाले ते कोणत्याही झुंजार, मूलगामी लढ्यातून नाही, तर भारताप्रमाणेच तडजोड-दबाव-तडजोड ह्या मार्गानेच श्रीलंकेचा स्वातंत्र्यलढा पुढे गेला.

पुढे 1956 साली लंकेच्या सरकारने केवळ एकाच—सिंहली भाषेला श्रीलंकेची अधिकृत भाषा घोषित केले. ह्यामुळे तामिळ जनतेचे मोठ्या प्रमाणावर राष्ट्रीय, भाषिक व सांस्कृतिक दमन झाले, व आजही होत आहे. तामिळांनी ह्या धोरणाचा विरोध केल्यावर कोलंबोच्या किनाऱ्यापासून तामिळविरोधी दंगली सुरु झाल्या व दऱ्याखोऱ्यांपर्यंत पसरल्या. सुरुवातीच्या काही वर्षांमध्ये श्रीलंकेच्या राज्यसत्तेनेदेखील भारताप्रमाणेच मोठ्या प्रमाणावर मूलभूत व संरचनागत विकास केला. अनेक वर्षे श्रीलंका ब्रिटनच्या अधिपत्याखालीच कारभार चालवत होती. 1971 साली श्रीलंकेतील एका मार्क्सवादी गटाच्या नेतृत्वात कामगारांचा मोठा उठाव झाला. त्यानंतर 1972 मध्ये श्रीलंकेने ब्रिटनचे अधिपत्य नाकारून पूर्ण स्वातंत्र्य स्वीकारले व एक गणतांत्रिक राज्यघटना बनवली. भूमी सुधार कार्यक्रम हातात घेतला. परंतु ह्याच काळात, ब्रेटन वूड्स मानक कोसळल्याने संपूर्ण विश्वच एका भयंकर आर्थिक संकटात ढकलले गेले. श्रीलंका देखील ब्रेटन वूड्स करारात सहभागी होते. 1974 मध्ये श्रीलंकेत देखील भीषण आर्थिक संकट उभे राहिले. अन्नपाण्याची तीव्र टंचाई जाणवू लागली. आर्थिक संकटाने इतरही संकटे जन्माला घातली. सिंहलांनी केलेल्या दडपशाहीविरोधात 1976 पासून लिबरेशन टायगर्स ऑफ तामिळ ईलमच्या (लिट्टे) भोवती सशस्त्र तामिळ प्रतिरोध संघटित होऊ लागला. 1977 मध्ये झालेल्या निवडणुकीत सत्ताधारी श्रीलंका स्वातंत्र्य पक्षाचा धुव्वा उडला व संयुक्त राष्ट्रीय पक्ष मोठ्या फरकाने निवडून आला.

ह्या आर्थिक संकटातून बाहेर पडण्यासाठी संयुक्त राष्ट्रीय पक्षाच्या सरकारने, इतर अनेक तिसऱ्या जगातील देशांच्या पावलांवर पाऊल ठेवत नवउदारीकरणाचे धोरण स्वीकारले. परंतु हे म्हणजे आगीतून फुफाट्यात जाण्यासारखेच होते. सुरुवातीला काही काळ श्रीलंकेच्या विकासाने जोरदार मुसंडी मारली. अल्पशा काळासाठी श्रीलंका आशियातील सर्वात प्रगत देश होता. सुरुवातीपासून श्रीलंकेने अवलंबलेली "कल्याणकारी" धोरणे आणखी काही वर्षे तशीच रेटली गेली. शिक्षण, आरोग्य, दरडोई उत्पन्न, सगळ्याच बाबतीत झपाट्याने सुधारणा झाली. एन.जी.ओ.करणाला जोरदार प्रोत्साहन दिले गेले. परंतु दुसरीकडे खाजगी व्यापार-उद्योग वेगाने उभे राहत गेले.

पान 14 वर

• संपादक मंडळ – निखील एकडे, बबन ठोके • संपादकीय कार्यालय- रूम नंबर 209, हीरानंदानी बिल्डिंग, 7-बी, लल्लुभाई कंपाऊंड, मानखुर्द (वेस्ट) मुंबई 400043
मो. नं. 8669735643 , 9619039793 • जागृति प्रिंटर्स, 12-ए, ग्राउंड फ्लॉर, भायखला सर्विसेज इंडस्ट्रीज, भायखळा, मुंबई - 9820017588 येथे मुद्रित